# संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत प्रकरणात संकलित माहितीच्या विश्लेषणाचा व अन्वयार्थाचा विचार करीत असतांना खालील घटकांना अनुसरुन माहितीचे अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

१) खालील मुद्यांना अनुसरुन स्वामी चिन्मयानंदाच्या साहित्यातून खालील शैक्षणिक तत्वांचा शोध घेण्यात आला आहे.

  १) शिक्षण संकल्पना व शिक्षणाची ध्येय, शिक्षणाची परिभाषा

  २) अध्ययन, अध्यापन पध्दती

  ३) शिक्षण पध्दती व शिक्षण योजना

  ४) गुरुशिष्य संबंध

  ५) शिष्य स्वातंत्र्य संकल्पना

२) स्वामी चिन्मयानंद ह्यांची मूल्यसंकल्पना व मूल्यशिक्षणाबातचा शोध.

३) स्वामी चिन्मयानंद ह्यांनी केलेल्या व्यक्तिमत्व विकास संकल्पनेचे विवेचन.

४) आधुनिक शिक्षण पध्दती वरील प्रभाव पडताळून पाहण्याकरिता खालील प्रकारे साहित्य संकलन करण्यात आले आहे.

  अ) राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा २००५ नुसार पडताळा सूची.

  ब) स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या शैक्षणिक विचारांवर आधारीत पडताळा सूची.

५) आधुनिक युगात स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या विचारांचे महत्व.

६) स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या इंग्रजी ग्रंथाची योग्यता सिध्द करण्यासाठी.

७) स्वामी चिन्मयानंदाच्या विचारांतून नवीन संकल्पनाचा शोध घेणे.

वरील प्रकारे साहित्य संकलनासाठी वापरण्यात आलेली साधने -

१) प.पू. स्वामी चिन्मयानंद ह्यांची ग्रंथसंपदा

२) प.पू. गुरुदेवांच्या विचारावर आधारित मतावली

३) N.C.F. २००५ वर आधारित एक मतावली

४) चिन्मय मिशनच्या आचार्याच्या मुलाखतीचे प्रारुप

वरील प्रमाणे संकलित केलेल्या माहितीचा तपशील पुढीलप्रमाणे

## ४.१ प.पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथाच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारी शैक्षणिक तत्वे:-

प.पू. गुरुदेवांची लिहिलेली तसेच त्यांच्या व्याख्यानावर आधारीत विपुल ग्रंथ संपदा उपलब्ध आहे. ह्या ग्रंथसंपदेचा शोध घेऊन त्यातून शैक्षणिक तत्वांचे नवनीत काढण्याचे कार्य म्हणजे अक्षरश: महासागर ढवळण्याचे कार्य व महासागरातून शैक्षणिक संपत्ती बाहेर काढण्याचे कार्य होते. वास्तविक पाहता अनौपचारिक शिक्षणाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास संपूर्ण साहित्यच हे शैक्षणिक आहे. कारण उत्कृष्ट मानण्याची निर्मिती ह्या साहित्यातून होते. त्या आशयाने संपूर्ण साहित्यच शैक्षणिक ठरते. पण शैक्षणिक तत्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून विचार करता ह्यातील काही शैक्षणिक तत्वांवर प्रकाश झोत निश्चितपणे आपणास टाकता येतो. त्यातील वर नमूद केल्याप्रमाणे हा विचार पुढीलप्रमाणे मांडण्यात येत आहे.

### १) शिक्षण

प.पू. गुरुदेव हे मूलत: अध्यात्मवादी तर आहेत पण प्रामुख्याने ते अद्वैत तत्वज्ञानाचे पुनर्भाष्यकार आहे. त्यांच्या अनेक पुस्तकातून शिक्षणाबाबतची त्याची दृष्टी स्पष्ट होते. ''मानवनिर्माण की कला'' ह्या पुस्तकात स्वामी चिन्मयानंदांनी शिक्षणाबाबतचे पुढील विचार व्यक्त केले आहे व शिक्षणाबाबत खंत व्यक्त केली आहे ते म्हणतात, ''आजकाल आमच्या देशात चहुकडून शिक्षणामुळे सामान्य योग्यतेत वाढ झाली आहे पण आपल्या कर्माच्या क्षेत्रात ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता ही वृध्दींगत झाली नाही. ज्ञानानेच योग्यतेची निर्मिती झाल्यास त्या ज्ञानाला व्यवहारात उपयोग करण्याची क्षमता म्हणतात.'' ह्या विधानातून ही बाब लक्षात येते की, केवळ पुस्तकी ज्ञान प्राप्त करणे ही बाब प.पू. गुरुदेवांना मान्य नव्हती पण ह्या ज्ञानातून त्या ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता मानवाची निर्माण व्हावी हे त्यांना अभिप्रेत होते. नेमकी हीच बाब NCF २००५ मध्ये नमूद करण्यात आली आहे. आधुनिक शिक्षणात जीवन व शिक्षण ह्यांची फारकत झाली आहे व जीवन अनुभवांशी जोडण्यात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले नाही.

ह्याच पुस्तकात त्यांनी व्यक्तिमत्वाच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेला महत्वाचे स्थान दिले आहे. (Process of personality reconstruction) ह्या व्यक्तिमत्व पुन: निर्माणाच्या दोन प्रक्रिया त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

१) सम्यक जीवन आदर्शात बुध्दीचे शिक्षण

The reeducation of the intellect in the right values of life

२) मनाची पुनर्व्यवस्था (Re aligning the mind)

शरीर, मन आणि बुध्दी ह्यात सातत्याने परिवर्तन होत असते. पण ह्यांना प्रकाशित करणारे तत्व मात्र अपरिवर्तनीय आहे. मन आणि बुध्दीच्या स्थानाला आपण हृदय म्हणतो. हृदयाचे शिक्षण आवश्यक आहे. म्हणजेच आपल्या आसपासचे पदार्थ, प्राणी घटनांच्या ह्या संपूर्ण योजनेत आपले स्थान काय आहे व आपल्या आसपासच्या घटनांबद्दल आपला दृष्टिकोन काय असावा ह्याची माहिती घेणे, जीवनाच्या ह्या परिवर्तनीय क्रिडेच्या मागे विनाश मृत्युपासून अप्रभावीत अशी अव्यक्त सत्ता आहे. ह्याचे ज्ञान जीवनाबाबत नवीन दृष्टी प्रदान करतात. हेच हृदयाचे शिक्षण आहे. बौध्दिक रुपात आम्ही नैतिक जीवन मूल्यांची प्रशंसा करतो, त्याचे गुणगान करतो. पण जेव्हा त्याची कर्मात परिणिती करण्याची वेळ येते तेव्हा आमची कृती ही इतकी निम्नस्तरावर असते की जणूकाही आम्ही अशिक्षित आहोत. हा विरोधाभास आहे. ज्ञान आवश्यक आहेच पण त्याचसोबत पर्याप्त शिक्षणाचीही आवश्यकता आहे. कधी कधी शिक्षक व सुसंस्कृत व्यक्ती अशिक्षित व असंस्कृत व्यक्तीपेक्षाही निकृष्ट वर्तन करतात. ह्याचाच पुढे प.पू. गुरुदेवांनी ज्ञान व कृती ह्यांचा सहसंबंध व्यक्त केला आहे. अनुदेशन व शिक्षण ह्यांचाही सहसंबंध व्यक्त केला आहे. ज्ञान आत्मसात करण्याचा मार्ग हा मानव आहे. ''जेव्हा शास्त्र ज्ञानाला मननाच्या माध्यमातून आत्मसात केले जाते व त्याचा काही काळ अभ्यास केला जातो. तेव्हा ते आपल्या कृतीला नवीन आभा निर्माण करतात''. ह्याचा अर्थ केवळ ज्ञानप्राप्ती महत्वाची नाही तर त्याचे मनन व त्याचा अभ्यास ह्या बाबी महत्वाच्या आहेत. त्या जेव्हा आपल्या कृतीत उतरतात तेव्हाच खरी शिक्षण संकल्पना सार्थ होते. ह्यापुढे त्यांनी शिक्षण व अनुदेशन ह्यातील फरक अतिशय प्रभावीपणे स्पष्ट केला आहे.

"निर्देशन म्हणजे शिक्षण नाही. निर्देश आवश्यक आहे तो सहज उपलब्धही होते पण शिक्षण आमचे ध्येय आहे. ह्याची प्राप्ती आपल्या मननाद्वारा शक्य आहे. निर्देश दिले जातात शिक्षण हे प्राप्त केले जाते. निर्देश बाहेरुन प्राप्त होतात. पण शिक्षण शिष्याच्या हृदयातील प्रज्वलीत व गुरुद्वारा संरक्षीत आंतरिक वस्तु आहे. आज आमच्याकडे निर्देशनात्मक संस्था आहे पण शैक्षणिक विद्यालय नाही. निर्देशक खूप आहे पण शिक्षक थोडे आहेत. स्वत:ला शिक्षित करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. (Instruction does not constitute education Instruction is necessary and it is easily available. But education is he goal to be reached; and it is to be gained by ones own reflection. Instruction is given; eduation is achieved. Instruction is objective, education is a subjective phenomenon kindled in the students and maintained by the teacher. In modern times we have instructional institute no educational schools. Therefore we have many instrctors, but hardly any teachers.)

आजपर्यंत जेवढ्या तत्वज्ञांनी शिक्षणाच्या परिभाषा केल्या त्यापेक्षा ही परिभाषा परिपूर्ण आहे. व्यक्तिच्या सर्वोत्कृष्ट गुणांच्या अभिव्यक्तीवर अद्वैतवादी तत्वज्ञांनी भर दिला पण हे सर्वोत्कृष्ट गुण हे गुरुद्वारा संरक्षित अशी आंतरिक वस्तु आहे. अशी संकल्पना शिक्षणाबाबत देऊन शिक्षण विषयक संकल्पनेत गुरुदेवांनी टाकलेली भर अतिशय मोलाची आहे. शिक्षण ही प्राप्त करण्याची अशी बाब आहे ती बाहेरुन लादता येत नाही, ती मिळवावी लागत नाही ह्या दृष्टिकोनातून शिक्षण ही नैसर्गिक प्रक्रिया आहे.


संधी प्राप्त करण्याच्या क्षमतेशी शिक्षणाचा संबंध प.पू. गुरुदेवांनी जोडला आहे. Spiritual Signpost ह्या लेखात स्वामीजींनी परिभाषा केली. ती पुढील प्रमाणे, "Education is nothing if it does not train our faculties to capture all our opportunities, to be useful to all other and to be always happy in ourselves" संधी प्राप्त करणे, त्याचा फायदा इतरांना देणे व त्याच्या माध्यमातून स्वत: आनंद प्राप्त करणे ह्या संकल्पनेच्या माध्यमातून शिक्षणाला एक नवीन आयाम प्राप्त झाला आहे. ह्यातून आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाला जगाशी जोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. NCF २००५ मध्येही हा मुद्दा

आलेला आहे. शिक्षणाचा बाहेरील ज्ञानाशी, जगाशी संबंध जोडणे ही बाब महत्वाची मानली आहे. ह्या बाबत प.पू. गुरुदेव म्हणतात, "If we are proving ourselves more and more joy in ourselves then certainly these are the daily tests of our growth and progress and of our open eyed adventures in the living of these sacred pages." जेव्हा प्रत्येक दिवशी आम्ही इतरांकरिता जास्तीत जास्त उपयोगी ठरतो. त्यावेळी आमचे शिक्षण हे योग्य दिशेने होत आहे, असे समजण्यास हरकत नाही. ह्या दृष्टीने शिक्षण म्हणजे to give, to share, to serve ही अभिवृत्ती निर्माण होणे.

Journey of Master ह्या आत्मचरित्रात प.पू. गुरुदेवांच्या व्याख्यानाचा संदर्भ आलेला आहे. शिक्षकांच्या परिषदेत प.पू. गुरुदेवांनी जे भाषण दिले त्यातून त्यांची शिक्षणाची दृष्टी अतिशय स्पष्ट होते. खऱ्या शिक्षणाची परिभाषा करतांना ते म्हणतात, "Real education means the transformation of knowledge in to wisdom which is then used to curve out a strong character" शिक्षणातून चारित्र्याची निर्मिती व्हायला हवी. तसेच ज्ञान हे शहाणपणात परिवर्तीत व्हायला हवे. NCF २००५ मध्ये नमुद करण्यात आले आहे की, ज्ञाननिर्मितीच्या क्षमतेपासून दूर असणाऱ्या प्रक्रियांनाच आपण ज्ञान म्हणतो. ह्या विचाराचे मूळ गुरुदेवांच्या विचारसरणीत आढळते. ज्ञानाचे रुपांतराची प्रक्रिया महत्वाची आहे व ह्या प्रक्रियेतून निर्माण होणारे चारित्र्य हे मजबूत असेलच ह्यात शंकाच नाही.

'On true Education' ह्या लेखात शिक्षण ही संकल्पना गुरुदेवांनी एका प्रसंगाच्या आधारे अतिशय प्रभावीपणे रेखाटली आहे. गुरुदेवांचा मित्र त्यांना रस्त्यात भेटला. रस्त्यात पडलेला दगड त्या मित्राला आपल्या घरी न्यायचा होता. हा मित्र शिल्पकार होता. गुरुदेवांच्या मदतीने तो दगड त्याने स्टुडिओत नेला. चारपाच दिवसानंतर गुरुदेव त्या स्टुडिओत गेले. त्यांच्या लक्षात आले की त्या दगडातून त्या शिल्पकाराने अतिशय सुंद असे शिल्प बनविले आहे. त्या सुंदर मुर्तीचे रहस्य जेव्हा गुरुदेवांनी विचारले तेव्हा तो उत्तरला, ''ही सुंदर मुर्ती त्या दगडात होतीच. त्या खडबडीत व आकाररहीत दगडाचा फक्त अनावश्यक भाग त्याने दूर केला होता. पण ह्यापुढील वाक्य महत्वाचे होते तो म्हणाला, ''जेव्हा हा दगड रस्त्याच्या बाजूला पडला होता तेव्हाच मी त्यात कृष्णाची मुर्ती पाहिली होती''. ह्या

कलाकाराला Vision होते. त्याने दगडातही ते सुंदर शिल्प बघितले होते. गुरुदेव म्हणतात. हेच खरे शिक्षण होय. मुलांना जास्तीत जास्त माहिती पुरविणे, जास्तीत जास्त सुचना देणे म्हणजे शिक्षण नव्हे. ह्या चांगल्या अनुदेशन असू शकते''. ह्यापुढे जाऊन ते शिक्षणाची परिभाषा देतात. "Not merely adding one more instruction to the students giving more and more data that is not education. It can be best become instuction. There where instructions are imparted that will be called an institute and not a school. A school is where we bring out from the student the beauty that was already there which we even as parents never suspected to remove that which covers what is already there in the students is true education." प्रत्येक व्यक्तीमध्ये आंतरिक सौंदर्य दडले असते. ही मानवाची शक्ती असते. हे सौंदर्य शिक्षणाच्या माध्यमातून अभिव्यक्त व्हायला हवे. सौंदर्य अभिव्यक्त करण्याची क्षमता शिक्षणात हवी. शिक्षणाचे हे सर्जनशील कार्य आहे. ही संकल्पना NCF २००५ मध्ये विस्ताराने मांडण्यात आली आहे. प्रत्येक गोष्ट आज शाळेत शिकविली जाते. ह्यावर NCF मध्ये आक्षेप घेण्यात आला आहे. त्यामुळे मुलांची सर्जनशीलता मारली जाते. नवीन निर्माण करण्याची क्षमता हे त्यांचे मानसिक सौंदर्याची अभिव्यक्ती असते. पण ही अभिव्यक्ती स्वाभाविक क्रियेतून व्हायला हवी. केवळ डोक्यात माहिती कोंबून ही बाब साध्य होणार नाही. ह्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्वातील काही बाबी ह्या पुसून टाकायला हव्यात पण कोणत्या ह्याबाबत पुढील आकृतीच्या सहाय्याने ही बाब स्पष्ट होते.




## ४.१) व्यक्तिमत्व

बालकाच्या व्यक्तिमत्वातील वरील बाबीचे उच्चाटन हे आध्यात्मिक शिक्षणातून होऊ शकते. ही बाब जर लवकरात लवकर अर्थात प्राथमिक अवस्थेतच झाली पाहिजे तरच व्यक्तीचे जीवन सुंदर बनू शकते. त्यांचे व्यक्तिमत्व सुंदर बनू शकते.

''आपली मदत स्वत:'' करा ह्या लेखात प.पू. गुरुदेव ह्यांनी साक्षरता, सुशिक्षितपणा ह्या गोष्टींवर विशेष प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात, ''जगाच्या संपर्कात असतांना कित्येक वेळा आपण अडचणीत सापडतो व इतरांकडून मदतीची अपेक्षा करतो. लहान सहान अडचणीत इतरांची आपल्याला मदत होते व आपणही इतरांना मदत करतो पण अशा अनुभवावरुन आपण असा दृढ विश्वास करुन घेतो की आंतरिक समायोजनातही इतरांची आपल्याला मदत होऊ शकेल. आपल्या बाहेर असणाऱ्या एखाद्या स्त्रोतामुळे होणाऱ्या आपल्या विकासाला शिक्षण म्हणता येणार नाही. शिक्षक, पुस्तके, प्रयोगशाळा इ. सर्व आवश्यक असतील कारण त्यांच्यामुळे मनाला ज्ञान मिळविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण होते. पण हे पुरेसे नाही. शाळा आणि महाविद्यालये जर शिक्षण देऊ शकले असते तर सर्वच पदवीधर सुशिक्षित झाले असते. पण दुर्दैवाने तसे नाही आहे. ते सर्व साक्षर असतील पण सुशिक्षित नाही. शिक्षणाचे अंतीम लक्ष आत्म परिवर्तन आहे. Transfusion of Idea नको तर Transformation आवश्यक आहे. ह्यासाठी मानवाने स्वत:चा उध्दार स्वत:च करावा लागेल. इतरांवर विसंबून चालणार नाही. पण ह्यासाठी त्यांनी ध्यानाचा मार्ग सांगीतला आहे. ते म्हणतात, ''बाहेरच्या जगात आपले कोणी मित्रही नाहीत आणि शत्रूही नाहीत. ते आहे आपल्या आतच. जेव्हा आपल्यातील अहंकार व्यक्तित्व आपल्या बुध्दी व्यक्तित्वाच्या मार्गदर्शनाप्रमाणे कार्य करुन शिस्तीत राहण्याचे नाकारते तेव्हा ते आपल्या आध्यात्मिक आकांक्षाचे शत्रू बनते. ह्या उलट जर आपला अहंकार बुध्दीच्या कल्याणकारी निर्देशाचा आणि कृपापूर्ण मार्गदर्शाचा सहज अनुसरण करेल तर ते व्यक्तीत्व आपल्या आत्मविकासामध्ये मदत करणारा मित्रच ठरेल म्हणून ध्यानाला महत्व देण्यात येते. ध्यानानेच बंगालच्या विश्वविद्यालयाचा एक साधारण बालक नरेंद्र हा स्वामी विवेकानंद झाला. अठरा वर्षांच्या अज्ञातवासानंतर दैदिप्यमान मानव म्हणून प्रकट झालेत. ध्यानामुळेच कपील वस्तुचा राजकुमार शांती व दयेची प्रतिमूर्ती भगवान बुध्द म्हणून प्रसिध्द झाला. ध्यानाने जीवन ज्योती प्रज्वलीत होते. त्यामुळे व्यक्तिमत्वात एका नवीन जोमाचा नवनिर्मितीचा एका नव्या उत्साहाचा व जनशक्तीचा संचार होतो. ध्यान

माणसाच्या थकलेल्या भंगलेल्या आंतरिक व्यक्तिमत्वाचे पुनर्घटन करुन त्याला स्वत:चा भाग्यविधाता बनविते. एक असे व्यक्तिमत्व बनते की जे ह्याच्य भोवतालच्या जगाच्या सर्व घटनांवर पूर्ण नियंत्रण गाजविते.''

वरील विवेचनावरुन एक बाब लक्षात येते की, आत्मपरिवर्तन म्हणजे शिक्षण हा शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन मांडत असतांना हे आत्म परिवर्तनाचे ध्येय साध्य करण्यासाठी ध्यानाचा एक मार्ग गुरुदेवांनी सांगितला आहे. 'अपयशी लोकांची संख्या जास्त का?' (चिन्मय चैतन्य मार्च २००५) ह्यालेखात हाच मुद्दा प.पू. गुरुदेवांनी पुढील शब्दात मांडला आहे. फक्त ज्ञान असणे पुरेसे नाही ते ज्ञान जीवनात उतरविता आले पाहिजे. नैतिक जीवनमूल्यांची केवळ प्रशंसा करुन उपयोग नाही. त्याप्रमाणे जगले पाहिजे एका बाजूला आपण शास्त्राच्या गप्पा मारतो तर दुसऱ्या बाजूला आपण जनावरांसारखा व्यवहार करतो. ह्याचाच अर्थ केवळ पुस्तकी ज्ञान संपादन करणे म्हणजे शिकणे हात नाही तर त्याचे व्यावहारिक आचारणही महत्वाचे आहे. केवळ शास्त्र येऊन भागत नाही तर त्याचा उपयोग केव्हा, कोठे, कसा कराव याचेही ज्ञान महत्वाचे ठरते. पण हे आचरण करण्यासाठी तीव्र मेहनतीची आवश्यकता आहे. ह्यासाठी ते संगीतक्षेत्राचे उदाहरण देतात. केवळ संगीताची जाण असेल तर संगीत आपल्याला उत्तम येते असे म्हणता येणार नाही तर यासाठी प्रदीर्घ असा रियाजही आवश्यक आहे. त्याच लेखात ते पुढे म्हणतात, ''पुस्तकातून मिळालेले ज्ञान मनन चिंतनाने आत्मसात करावे लागते. त्यानंतर त्यावर काही काळ सराव करावा लागतो. फक्त सूचना म्हणजे शिक्षण नव्हे.

वरील सर्व बाबींवर उपाय म्हणून प.पू. गुरुदेवांनी Spiritural Edcation चा मार्ग सुचविला आहे. ते म्हणतात, "Spiritual Education would help the student to unveil his beauty. If it is done early in life it becomes a permanant and beautiful personality. Change your thoughts (Chinmaya Sandesh - Sept. 2006) ह्या लेखात गुरुदेवांनी शिक्षणाची आणखी एक परिभाषा सांगून फार मोठा दृष्टिकोन मांडला आहे. माणूस हा त्यांच्या मनामुळे चांगला अथवा वाईट ठरतो. मन चांगले तर माणूस चांगला. मन वाईट तर माणूस वाईट मन हे स्वत: चांगले अथवा वाईट असत नाही. मानवाचे विचार हे मानवाच्या मनाला चांगले अथवा वाईट बनवितात. जर विचार चांगले तर

मन चांगले व मन चांगले तर माणूस चांगला असे समिकरण आहे. भांड्यात आपण जी वस्तु ठेवतो त्या वस्तुच्या नावे त्या भांड्याचा आपल्याला परिचय होतो. एकच भांडे साखर ठेवल्यास साखरेचे भांडे, मिठ ठेवल्यास मिठाचे भांडे ठरते. त्याचप्रमाणे जर मन हे चांगल्या विचारांनी भरले असेल तर ते चांगले मन म्हणून ओळखले जाईल व ती व्यक्ती चांगली व्यक्ती म्हणून ओळखली जाते आणि जर मन वाईट विचारांनी भारले असेल तर त्याचे मन त्याचसोबत ती व्यक्तीही वाईट ठरते आणि म्हणूनच गुरुदेव शिक्षणाची व्याख्या ह्या लेखात म्हणतात, "To make the thoughts good is called good education". पण ही बाब घडून येण्यासाठी ''विद्याभ्यासा''ची अर्थात सरावाची आवश्यकता आहे. पण आज दुर्दैवाने असे घडत नाही तर आज शाळा व महाविद्यालये केवळ माहिती देणाऱ्या संस्था बनल्या आहेत. प.पु. गुरुदेव म्हणतात, "The schools and colleges have become instruction giving institutions. The teachers there only give instructions to the children hence they are only instructor. They only stuff the mind of children with more and more data and information." ह्या सर्व शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याला सुंदर आकार देण्याचा निरंतर प्रयत्न करायला हवा. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास, विचारांचे सौंदर्यीकरण करायला हवे. मानवाचे विचार परिवर्तन झाले तरच व्यक्तीत परिवर्तन घडते. अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त शैक्षणिक संस्थांनी बालकाच्या चारित्र्य विकसनाच्या ध्येयाकडे लक्ष द्यायला हवे. ह्यासाठी प्रेरित शिक्षकांची गरज प.पु. गुरुदेवांनी व्यक्त केली आहे. We must have teachers who must be inspired and feel pride and joy about school. Because education is not in the text books and exercise book or in the class rooms only. The living examples of right types of teachers and the mighty men of the status of sant Dnyaneshwar curve out the charachter of the children. विद्यार्थ्यांना अशा महान संतांचा परिचय होणे आवश्यक आहे व ह्यासाठी शाळेच्या परिसरात संताचे statue असणे आवश्यक आहे. जेणे करुन विद्यार्थी जेव्हा शाळेत प्रवेश करेल तेव्हा ह्या संताच्या दर्शनाने व त्यांच्या विचारांच्या आठवणीनी त्याच्या कुरुप विचारांचे सुंदर विचारात रुपांतर व्हायला मदत होईल. आपण विद्यार्थ्यांना केवळ चांगले काय आहे ह्याबाबत केवळ विवेचन करतो पण त्यांच्यासमोर चांगले उदा. आपण आपल्यातूनच

अभिव्यक्त करीत नाहीत. गुरुदेवांनी खंत व्यक्त केली आहे. लहान बालके तेव्हाच ऐकतात जेव्हा आपण स्वत: त्यांच्यासमोर उत्तम वर्तनाचे उदाहरण प्रस्तुत करतो. हे कार्य अर्थातच शिक्षकांनी करायला हवे. शिक्षकांनी त्यांच्यासमोर उत्तम वर्तनाचे उदाहरण प्रस्तुत करायला हवे. Children remember digression more than main lession. They will remember these digressions and learn to change themselves. व्यक्ती विचारामध्ये परिवर्तन घडून आल्यास व्यक्तीत परिवर्तन होते व ह्याच मार्गाने भारताची नियती बदलल्या शिवाय राहणार नाही. म. गांधी साउथ आफ्रिकेत राहून बदलले. त्यांनी सातत्याने चांगल्या विचारांचा पाठपुरावा केला आणि ते महात्मा झाले. Real education starts with such cultural activities. ह्याचा अर्थ आधुनिक विज्ञानाचा अभ्यासच करु नये असा होत नाही. नवीन विज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास विस्तृत व व्यापकपणे करायलाच हवा. पण त्याच सोबत We do not forget that character depends on the quality of human beings. ह्यासाठी मंदिरांचा सुध्दा आपणास चांगला उपयोग होईल.

वरील विवेचनाचा विचार केल्यास आपल्या लक्षात येते की, चांगले विचार घडविते ते शिक्षण. शिक्षणातून चांगले विचारांचे संस्कार मानवावर होऊन त्यातून त्यांच्या सुंदर मनाची निर्मिती व्हायला हवी व त्यातून त्याचे चारित्र्य निर्माण व्हायला हवे व ही बाब केवळ पुस्तकातून, अभ्यासक्रमातून साध्य होणार नाही तर त्यासाठी शिक्षक, व्यक्ती हे बालकांचे आदर्श ठरायला हवे. उदाहरणातून व अनुकरणातून ही बाब साध्य होईल. 452nd Geeta Gnana yagna 1988) Bonvav Bombay. Value Based Education ह्या सोव्होनेअरच्या foreword मध्ये प.पु. गुरुदेवांनी आधुनिक शिक्षण प्रणालीबद्दल पुनश्च विचार करण्याचे आवाहन केले आहे व ह्या ताबडतोब परिवर्तन घडवून आणण्याबाबत विनंती केली आहे. कारण आजही शिक्षणाची परिस्थिती अशी आहे की, आज व्यावसायिक आव्हाने स्विकारण्यास जरी आजची शिक्षण प्रणाली सक्षम असली तरी जीवनाचा दर्जा उंचावण्यास ती सक्षम नाही, असे त्यांचे मत होते. १९८८ साली मत व्यक्त केलेले आहे पण आजही ती परिस्थिती कायम आहे, असे आपणास म्हणावयास हरकत नाही. अशा परिस्थितीत शिक्षण हे Value Based असावे असे त्यांनी सुचविले. वास्तविक शिक्षणातून मूल्य संस्कार अभिप्रेतच आहेत. मूल्यशिक्षणाचा विचार करतांना ह्या बाबीवर ह्याच प्रकरणात विस्तृत विचार

मांडण्यात आला आहे. N.C.F. 2005 मध्ये गुरुदेवांच्या ह्या विचारांचे प्रतिबिंब आढळते. त्यात नमूद करण्यात आले आहे की, समानतेचे सहअस्तित्वाचे मूल्यसंस्कार शिक्षणातून व्हायला हवेत. शांती, मानवता, सांकृतिक विविधता ह्या मूल्यांचे विकसन करणारी शिक्षणप्रणाली आवश्यक आहे. ह्यासाठी संस्कृती परंपरा ह्याचा समावेश शिक्षणात असावा.

शिक्षकांच्या परिषदेत प.पु. गुरुदेवांनी शिक्षणाबाबत काढलेले उद्गार पुढील प्रमाणे आहेत, ''अलीकडच्या शिक्षण पध्दतीत शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात एखाद्या विषयाची माहिती कोंबून परिक्षेच्या वेळी ती बाहेर काढण्याचे साधन झाला आहे. हे काही शिक्षण नव्हे. ज्यामुळे माणसाजवळ असलेल्या ज्ञानाने तो शहाणा होतो ते खरे शिक्षण आहे. ज्यामुळे शीलसंवर्धन होते ते खरे शिक्षण आहे. शिक्षण प्रणालीत शिक्षकाच्या शीलाला व व्यक्तिमत्वाला महत्व असते. त्याने विद्यार्थ्यांचे प्रेम व आदर संपादून चालत नाही तर त्याच्या जवळ भावनेचा ओलावा व बौध्दिक पात्रता असेल तरच तो खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या प्रेमास व आदरास पात्र होतो. हा आदर नसल्यास त्याने जे काही शिकविले असेल त्याचा परिणाम दीर्घकाळ टिकणारा असत नाही. प.पु. गुरुदेवांचा विविध वयोगटाच्या मानसिकतेचा अभ्यासही अतिशय दांडगा होता.

Our children - Their education - A National Challenge - Tapovan Prasan June 1996 Page no. 06 ह्या लेखात त्यांचा हा अभ्यास प्रकर्षाने आढळतो. ह्या लेखात ते म्हणतात, ''हल्लीची मुले ही वेगळीच वाटतात. ती एखादी गोष्ट आकलन लवकर करतात. आपल्या वर्तमान युगातील गतीमान जीवनाशी झुंज देण्यासाठी त्यांनी आपल्यामध्ये अनेक खास गुण जमा केले आहेत. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान वेगाने प्रगत होत आहे. त्याचा प्रसार होत आहे. त्यामुळे आपल्या मुलांना जगण्यासाठी आणि झुंज देण्यासाठी वातावरण पूर्ण बदलले आहे ती सुध्दा ह्या नवीन वातावरणात घडत आहेत. सभोवताली असलेल्या ह्या जगाशी सामना करण्यासाठी त्यांच्या सामर्थ्यात निसर्गानेच वाढ केली आहे.'' पुढे ह्याच लेखात त्यांनी बालकांच्या विविध वयोगटानुसार शिक्षणाची संकल्पना मांडली आहे. आजचा बालक हा राष्ट्राचा उद्याचा नागरिक आहे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन त्यांनी प्रस्तुत लेखात विवेचन केले आहे.

आपल्या व्यक्तीच्या शिक्षणाचा ज्यावेळी तो ह्या जगात प्रवेश करतो तेव्हाच प्रारंभ होतो. ही जन्मपूर्व शिक्षणाची अवस्था आहे. ह्यावेळी आपल्या आगमनाचे आपल्याला ज्ञानही असत नाही. जन्माला आल्यानंतर आपल्या ज्ञानेंद्रीयांच्या अनुभवांच्या माध्यमातून संघर्षाला सुरुवात होते. ह्या प्रयोगातूनच मग आपल्याला आपल्या योग्यतेचा शोध लागतो व ह्यातूनच ज्ञानेंद्रियांमध्ये समन्वय निर्माण होतो. ही बालकाची शिशु अवस्था आहे. ज्यावेळी बालक पहावयास व निरिक्षण करावयास लागते ती त्याच्या स्वयं शिक्षणाची अवस्था असते. बालक हे सातत्याने वस्तुंच्या शोधात असते. ह्या अवस्थेबाबत गुरुदेवांनी पुढील विधान केले आहे, "The child's endless wonderment at things its steady sense of inquistiveness it silent but very thoughtful attention to every things said and done arround it is world. Its experiments with love affection, anger, jealoucy, instincts of acquisition, grabbing, fighting, kindness. The entire gamut of emotional life is the next stage. During this time education starts and this highly impressive period is the most crucial time in building up the childs entire future."

ही बालकाची पूर्वप्राथमिक अवस्था आहे. (Nursary Level) या अवस्थेत त्याला आनंदी व उत्साही वातावरण, प्रेमळ वातावरण अशी परिस्थिती त्याच्या आसपास निर्माण करायला हवी. उच्च उदात्ततेची स्वीकार्यता, प्रशंसा, सौंदर्याची ओळख, व्यक्तीमधील हे त्याच्याकरिता आदर्श असायला हवे. अमुर्ताला स्विकारण्याची ग्रहणक्षमता कमी असते. म्हणून उदात्ततेचे प्रगटीकरण त्याने करायला हवे. "Touch the children tell them that they love you, that they are beautiful intelligent, and noble." ह्यात वारंवारिता ठेवा! त्याग करण्याच्या तुमच्या वृत्तीने दिग्दर्शन करा. तुम्ही इतरांना मदत करण्याकरिता उत्सुक आहात हे मुलांना पाहू द्या. ह्यातून एका उदात्त चारित्र्याची घडण हायला सुरुवात होईल.

अध्यापन हा २४ तास ३६५ दिवसांचा व्यवसाय आहे. विद्यार्थी हे उत्तम निरिक्षक आहे. विशेषत: ते अशा शिक्षकांचे सूक्ष्म निरिक्षण करतात ज्या शिक्षकावर ते

मनापासून प्रेम करतात. अशा शिक्षकांची कोणतीही कृती ही विद्यार्थ्यांकरिता अर्थहीन नसते. ते पाहतात व अनुकरणातून शिक्षकांच्या कृती आपल्या वर्तनात प्रतिबिंबीत करतात.

जेव्हा बालक ५ वर्षाचा होतो तेव्हा तो शाळेत जाण्यास सक्षम होतो. ह्या वयाचे वैशिष्ट्य सांगतांना प.पु. गुरुदेव म्हणतात, "Now his limbs are steady. A healthy child has enormous energy to burn up and it needs therefore frequent refreshment to replenish the energy drained away in play fight, in more running and also in studies howing and screaming." ह्या कालखंडात त्याच्या सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनातून त्याच्या वर्तनाला आकार देण्याचा प्रयत्न करायला हवा. तसेच त्याचे ज्ञान व क्षमता वृध्दिंगत करण्याच्या दृष्टिकोनातून त्याला प्रोत्साहित करायला हवे. कला व हस्तकला यांचे वर्ग म्हणजे विद्यार्थ्यांचे वर्तनास चकाकी आणण्यासाठी जे वातावरण आवश्यक आहे त्या वातावरणाची निर्मिती करतात. एखाद्या खोडकर विद्यार्थ्याला दया व प्रेमानेच वागवायला हवे. अतिशयोक्तीच्या प्रसंगी व सर्व मुलांना बेशिस्तीच्या परिणामाचा धडा मिळावा व शिस्त राखली जावी म्हणून सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत शिक्षा करावयास हरकत नाही. पण त्याचा उद्देश केवळ उदाहरण निर्मिती हाच असावा.

५ ते १० वर्षाच्या कालखंडात त्याला उदात्त जीवनमूल्यांचे शिक्षण द्यायला हवे. कारण In this age child is stretching his emotional and intellectual abilities into ever widening fields. कथांच्या माध्यमातून ही जीवन मूल्ये त्याच्यासमोर मांडता येतील. ह्या कथामधून तो आदर करु शकेल असे आदर्श निवडेल. पौराणिक कथांना ह्यासाठी त्याच्या आकलनाच्या कक्षेत आणावे लागतील. संताच्या थोर नेत्यांचा, कार्यकर्त्यांच्या गोष्टीचा अंतर्भाव ह्यासाठी आपणास करता येईल. पंचतंत्र सारख्या कथांचा वापरही ह्या काळात अतिशय उपयुक्त ठरेल. ह्या व्यतिरिक्त Reciation, mass chantings, group songs हे पण ह्या वयात अतिशय उपयुक्त ठरतील.

१० ते १४ वर्ष वयोगटात त्यांच्या मनामध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारे साहित्य त्यांना देण्यात यावे. Geeta for Children, I love you अशा प्रकारच्या

साहित्याचा ते आनंदही घेऊ शकतात व त्याच सोबत ते स्वत:ला समृध्दही करु शकतात.

१५ ते १८ वर्षाचा कालखंड ह्या काळात help them to sink their ideas in to their own minds. त्यांनी जास्त अभ्यास केला त्याबाबत त्यांच्या अभिव्यक्तीस प्रोत्साहन द्यावयास हवे. त्यांच्या मधील लाजाळूपणा हा काळजीपूर्वक दूर करायला हवा. Encourage them through noisy complements and real rich presents for what they have tried to express. त्यांच्या चुकांबद्दल त्यांच्यावर टिका करु नका. Leave them alone to grow up. Do not hasten them.

१८ ते २० वर्षाच्या काळात जेव्हा शारिरीक व मानसिक वाढ पूर्ण झाली असते ह्या काळात त्यांना सखोल आकलनाची आवश्यकता असते. साधनेच्या दृष्टिकोनातून ह्या वयात पावले उचलायला हवीत. ह्याचा उद्देश असा की, all by themselves come to discover that they can with diligence and practice control the mad on rush of their own wild and crazy mind. दिवसभरातून थोडा जप हा ह्या वयात अतिशय उपयुक्त ठरेल व त्यांच्या मनात ही भावना दृढ होईल की, "Man needs self control if he is to control his own mind." मनाला अशा पध्दतीने वळण दिल्या शिवाय त्यांच्या कृतीत सौंदर्य निर्माण होणार नाही.

जेव्हा हे युवक २० ते २५ वर्षांच्या वयोगटात प्रवेश करतील तेव्हा त्यांना उच्चतर बाबीकडे न्यायला हवे. ह्या वयात त्यांना उपनिषदे शिकवायला हवीत. ह्यात प्रामुख्याने इश, कनोपनिषद व कठोपनिषद शिकवायला हवे. त्याचसोबत गीता अध्याय २, ३, ५, ९, १२ व १३ अध्याय शिकवायला हवा.

अशा पध्दतीने शिक्षणाचा आकृतीबंध ठरविल्यास आपण आपल्या वाढत्या बालकाचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करु शकू. दोन्ही बाबतीत त्याच्या जीवनमूल्यांच्या दृष्टिकोनातून व बाह्यसायन्सच्या दृष्टिकोनातून (inner values of life and outer objective science) व्यवसायातील आव्हानांना स्विकारण्यासाठी व त्यांना सामोरे जाण्यासाठी क्षमता Secular Education च्या माध्यमातून निर्माण होईल आणि जीवनमूल्यांचे संस्कार

त्यांना समाजातील एक उत्तम नागरिक बनविण्यास मदत करतील. आपण अशाप्रकारे शिक्षणची योजना आखू शकू का?

प्रस्तुत लेख ह्या ठिकाणी मुद्दाम विस्तृतपणे देण्यात आला आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे प.पु. गुरुदेवांनी त्यांच्या संपूर्ण साहित्यात औपचारिक शिक्षणाबाबत दिलेला हा एक संक्षिप्त आराखडा आहे. ज्याप्रमाणे प्लेटोने आदर्शवाद मांडत असतांना वयोगटानुसार शिक्षणाची एक योजनाच दिली होती. प.पु. गुरुदेवांनी सुध्दा अशी एक योजना अत्यंत संक्षिप्त पण व्यापक स्वरुपात ही योजना प्रस्तुत केली आहे. वयोगटानुसार व्यक्तिच्या गरजा दृष्टिकोन बदलतात. जाणीवा व्यापक होतात. ह्याबाबतचा त्यांचा अभ्यास हा दांडगा होता. त्याचे प्रतिबिंब ह्या लेखात आढळते. ह्या लेखातून त्यांनी मानवाच्या पुढील अवस्था सांगितल्या आहेत व त्यानुसार शिक्षण योजना दिली आहे.

१) जन्मपूर्व अवस्था

२) अवस्था शिशु ० ते ३

३) नर्सरी अवस्था ३ ते ५

४) ५ ते १० वर्ष - प्राथमिक अवस्था

५) १० ते १४ वर्ष - माध्यमिक अवस्था

६) १५ ते १८ वर्ष - उच्च माध्यमिक

७) १८ ते २० वर्ष - उच्च शिक्षण

८) २० ते २५ वर्ष - उच्च शिक्षण

ह्या प्रत्येक अवस्थेची त्यांनी वैशिष्ट्ये सांगितली व त्यानुसार विविध काही त्यांनी सुचविले. भारतीय तत्वज्ञान व आधुनिक विज्ञान ह्यांचा समन्वय त्यांचा शिक्षण विषयक ह्या विचारात आढळतो. व्यक्ती Knowledge Master तर असावाच पण तो Wisdom Master ही असावा. ह्या दोहोंचा समन्वय व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात असावा.

आजच्या शिक्षणपध्दतीचे वर्णन त्यांनी अत्यंत समर्पक शब्दात केले आहे. आज आपण ज्ञानाच्या नावाखाली बालकांना केवळ माहिति पुरवितो, ह्याची त्यांना अत्यंत खंत

होती. ते म्हणतात, "In our Teaching Centres knwoledge is pushed into the students, Proficiency is attained but can not rise out of the gutters of poverty and inefficiency" ह्यातून आपण कसे बाहेर पडू ह्याबाबत खंत होती. आपण राजकीय स्वातंत्र्य मिळविले पण आपण आपल्या अंतर्गत व्यक्तिमत्वामध्ये पुनर्समन्वय निर्माण करु शकलो नाही. ह्याचे दु:ख होते. हा शिक्षणपध्दतीचा दोष आहे, असे त्यांचे मत होते. शिवाय शिक्षणातून युवकाच्या व्यक्तिमत्वात सुसंगती निर्माण होत नाही. Symmetry the of Beauty ह्या लेखात म्हणतात, "In modern education, intelligence necessary and some develop intellectually very high and yet the individual is an ugly person because though he is intellectually highly developed there is no emotional development one side is developed head is developed, heart is shrunk ugly. If heart is developed every sentimental fool intellectually zero" ही आजच्या शिक्षण पध्दतीची दुरावस्था आहे. ह्यावर उपाय म्हणजे head & heart ह्यांचा समतोल होणे हा आहे. अशा व्यक्तिला गीता युक्त पुरुष अर्थात Integreted म्हणते.

आजच्या शिक्षण पध्दतीची जी दुरावस्था आहे. ह्याचे वर्णन तैतरीय उपनिषदाचे विवेचन करतांना अतिशय परखडपणे त्यांनी विवेचीत केली आहे. ते म्हणतात, "कोणत्याही विश्व विद्यालयाच्या सभागृहात जाताच आपण निश्चितपणे पहिल्या क्रमांकाचे विद्यार्थी ओळखून काढू शकू कारण ते निरापवादपणे निस्तेज व अगदी हाडांचा सापळा झालेला परंतु केवळ जीवंत आहे असे दिसेल. कारण कदाचित आपले आयुष्य संपविण्या इतकी व शांतपणे मनुष्याला सामोरे जाण्या इतकी सुध्दा ताकद त्यांच्यात नसते. त्याच विश्व विद्यालयातील धष्टपुष्ट व सुदृढतेमुळे रसरसलेला असा खेळाडू विद्यार्थी निरपवादपणे केवळ नशिबाने तिसऱ्या वर्गात उत्तीर्ण होणारा किंवा अधिक करुन हमखासपणे नापास होणारा म्हणून निवडून काढता येईल.

अशी परिस्थिती होण्याचे निश्चित कारण म्हणजे आपल्या शिक्षण पध्दतीतील दु:खावर गैरव्यवस्था व असंतुलन होय. हा मंत्र त्यातील सूचकार्थाने आपणास अशी आशा दाखवितो की, आरोग्य व बौध्दिक विकास हे हातात हात घालून एकत्रपणे विकसित होतील. अशी अधिक चांगली शिक्षण पध्दती असणे शक्य आहे आणि हे पूर्णतया सिध्द सुख घडवून

आणणे हीच कोणत्याही देशातील शिक्षणतज्ज्ञांची दृष्टी असावयास हवी.

शिक्षणाबाबतची ही त्यांची दृष्टी स्वामी विवेकानंदांच्या दृष्टिकोनाशी मिळतीजुळती आहे. स्वामी चिन्मयानंदांना एक व्यक्तिने म्हटले, "I have read the Bhagvad Geeta but nothing has happend" ह्यावर प.पु. गुरुदेवांनी उत्तर दिले, "You have gone through the Bhagvad Geeta, but has the Bhagvad Geeta gone through you?" प.पु. गुरुदेवांच्या ह्या उत्तरावरुन लक्षात येते की, शिक्षण हे व्यक्तिमध्ये मुरले पाहिजे व ते त्याच्या कृतीतून अभिव्यक्त झाले पाहिजे आणि म्हणूनच केवळ निर्देशन म्हणजे शिक्षण नाही कारण निर्देश दिले जातात व शिक्षण प्राप्त केले जाते. ''जगत और आप'' ह्या पुस्तकात प.पु. गुरुदेवांनी आजच्या शिक्षणाबाबत खंत व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''आज आपल्या देशात शिक्षणाच्या माध्यमातून कार्यकुशलता आली आहे. पण आपल्या ज्ञानाचा वापर आपल्या कार्यक्षेत्रात कुशलतापूर्वक करण्याच्या युक्तीची कमतरता आहे. हे अर्जित ज्ञानाचा योग्य वापर करण्याला क्षमता म्हणतात''. आज युवकांमध्ये योजना बनविण्याचा स्वभाव आहे. कार्य करण्याची इच्छा आहे. ते नवनवीन कल्पना करतात व आपल्या आसपास दिसणारे दोष दूर करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या ह्या साहसिक कार्याच्या शक्तीला योग्य वळण देण्याची आवश्यकता आहे. जीवनातील विविध समस्यांचे अध्ययन करुन त्याचे आकलन करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करावी लागेल. त्यामुळे त्यांच्यात मानसिक संतुलन निर्माण होईल व ज्याठिकाणी ते कार्य करतील त्या ठिकाणी त्रुटी निर्माण होणार नाही. मन व बुध्दीच्या संतुलनाने युवक रचनात्मक योजना बनवू शकतील.

गीतेच्या अध्याय २ अध्यायात मध्ये (सांख्ययोग) प.पु. गुरुदेवांनी मनाच्या पुनसंस्करणासंबंधी भाष्य केले आहे व आजच्या शिक्षणपध्दतीतून नेमकी हीच बाब दुर्लक्षित झाली आहे. ह्याबाबत खेद व्यक्त केला आहे. मनाचे पुन:संस्करण (Re-edition) हा मानसशास्त्रातील ही बाब अजून पाश्चात्यांना शोधायची व मान्य करायची आहे पण पौर्वात्यांनी मात्र ही बाब जगाला कितीतरी आधी पटवून दिली आहे. आजच्या शिक्षण प्रणालीवर टिका करतांना प.पु. गुरुदेव म्हणतात, ''परकीयांच्या फायद्यासाठी भारतीयांनी कसे शिकावे हे पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांनी ठरविण्या आधीही हे शैक्षणिक धोरण भारताने स्विकारले होते

आणि पिढ्यानपिढ्या हे अत्यंत यशस्वीपणे आमच्या राष्ट्रीय शिक्षणाचा पाया होऊनन राहिले होते. मेकॅलेचा शैक्षणिक प्रयोग भारतीयांवर केला जाऊन त्यातून आजची दुबळी पिढी तयार होण्या आधीपासून येथे गुरुकुलांमधून प्रत्येकास त्याच्या बालवयातच मानवतावादी संस्कार करुन हिंदु संस्कृतीचे सुवर्ण युग जोपासले गेले. तिला वळण दिले गेले आणि ह्या देशांच्या शिक्षण पध्दतीत पक्के झाले. तीच शिक्षण पध्दती आपल्या मुलांना आपले दिव्य स्वरुप समजावून देत असे. त्यामुळे आपल्या शालेय वा व्यावसायिक शिक्षणक्रम पूर्ण करुन बाह्य जगात पाऊल टाकतांना विश्वाच्या स्थापनेत आपले नेमके स्थान काय ह्याचे पूर्ण ज्ञान मुलांना असे. आयुष्यात ती फसली जात नसत आणि जीवन म्हणजे चमत्कारपूर्ण संपत्तीने भरलेली आणि आपली वाटत होते. थांबलेली एखादी गुप्त गुहा आहे अशीही अपेक्षा ते करीत नसत. हल्लीचे विद्यार्थी जेव्हा विश्वविद्यालयातून बाहेर पडतात तेव्हा त्यांना अशी जाणीव होते की त्यांना शिक्षण मिळाले आहे. पण ज्ञान नाही. अशा हल्लीच्या अर्धवट शिकलेल्या परंतु चुकीचे मार्गदर्शन मिळालेल्या विद्यार्थ्यांची त्या काळातील पूर्वीच्या सुशिक्षित शिकलेल्यांशी तुलना केली तर त्यातील फरक लक्षात येतो. Spiritual Culture ह्या पुस्तकात प.पु. गुरुदेव म्हणतात, ''आजच्या सुशिक्षित लोकांचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी आजच्या पिढीला केवळ Factual Knowledge किंवा wandrous theories शिकवू नये तर जीवनाची आदर्श शिकवावी. व ही आदर्श जीवनात कशी उतरावयाची ह्याचेही शिक्षण द्यावे. पूर्वी ऋषींनी ह्यासाठी वेगळे प्रशिक्षण घेतले नव्हते अथवा गृहस्थी आपल्या घरात ह्यासाठी वेगळा वेळ काढत नसत.''

गीतेच्या आठव्या अध्यायाच्या विवेचनात प.पु. गुरुदेवांनी सुशिक्षित माणसाची परिभाषा दिली आहे. ''खरा सुशिक्षित मनुष्य आपले संस्कार कधीच विसरत नाही. ते त्याच्या व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य बाब बनते आणि त्याचा प्रत्येक विचार, शब्द व कृती ह्यामध्ये त्याच्यामधीलच संस्कारांचा सुगंध आणते.''

वरील विवेचनाचा विचार केल्यास प.पु. गुरुदेवांना शिक्षण जे अपेक्षित आहे ते बाहेरुन लादलेले शिक्षण नाही तर ज्ञान ह्या दृष्टिकोनातून ते शिक्षणाकडे बघतात. केवळ शाळांमध्ये मुलांना पाठविणे म्हणजे शिक्षण नाही. मुलभूत अध्ययन कौशल्य विकसित करणे म्हणजे शिक्षण नाही. एखाद्या क्षेत्रात चांगले गुण प्राप्त करणे म्हणजे शिक्षण नाही. कारण

ह्यातून मुलांना ज्ञान प्राप्त होते आहे, असे आपण म्हणू शकत नाही. ते केवळ माहिती गोळा करीत आहे. ज्ञानाचा विकास ह्यातून होत नाही. ह्यातून ज्ञान, अवबोध व मर्मदृष्टी विकसित होत नाही. आजचे शिक्षण हे Job Oriented जरुर असेल, पण जीवन जगण्याची कला त्यातून विकसित होत नाही. केवळ डीग्री संपादन केली म्हणजे माणूस जीवन जगायला शिकला असे होत नाही. आणि म्हणूनच शिक्षणातून बालकाची जीवन जगण्याची क्षमता विकसित व्हायला हवी. त्यांना उच्च आदर्श जगण्याची प्रेरणा त्यांच्यात निर्माण व्हायला हवी. आपले आदर्श निर्धारीत करण्यात शिक्षणाचा वाटा असायला हवा. नैतिक सौंदर्य सांस्कृतिक महानता राष्ट्रीय संघटन, रचनात्मक उत्पादन क्षमता, अनुशासीत उन्नती हे गुण शिक्षणातून विकसित व्हायला हवेत. सर्व साक्षर झाले म्हणजे सुशिक्षित झाले असे म्हणता येणार नाही. बाह्य उपचारांनी नवीन विचारांचे पोषण होऊ शकते पण शिक्षणाचे अंतिम लक्ष Transformation आहे.

Education and Religion ह्या लेखात (Tapovan Prasad Aug., 2003 पृष्ठ क्र. ६) प.पु. गुरुदेवांनी शिक्षण व धर्म ह्यांचा सहसंबंध जोडला आहे. ते म्हणतात, ''कोणतीही जबाबदारी पार पाडायची असेल तर चारित्र्याची आवश्यकता असते. चारित्र्यहीनता ही स्वातंत्र्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. आणि म्हणूनच "Education in country must help to rebuild the character of its people". ह्या वाक्याचा पुनर्विचार केलयास, ''चारित्र्याची पुनर्बांधणी म्हणजे शिक्षण ही परिभाषा गुरुदेवांना अभिप्रेत होती, ही बाब लक्षात येते. व्यक्ती ही कोणीही असो तिच्या करिता चारित्र्य ही बाब अत्यंत महत्वाची ठरते. चारित्र्य बांधणीची क्रिया ही विविध प्रक्रियेतून जाते व त्या प्रक्रिया पुढीलप्रमाणे -

1) Doing, 2) Feeling, 3) Knowing, 4) Becoming

चारित्र्य बांधणीचे वरिल चार स्तरांचे वर्णन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**1) Doing :-**

External disciplines in our movements and contact with the world of objects around (the civic law) and the ordinary rules of conduct

etc. bring about rhythem in our doings our physical movements and personal relationship with other physical bodies both things and beings are harmonised thereby to create a happy society.

**2) Feelings :-**

On Individuals emotional life is so educated in cherishing love, kindness and tolerance towards others round that be develops an emotional balance in himself and creats a sort of collective harmony around him.

**3) Knowing :-**

Ones intellectual equanimity is developed and mantained without which right character building is impossible. Discipline at the level of thinking is the goal to be achieved by every national educational scheme. विचार क्षमता ही अतिशय आदर्श व स्वतंत्र वातावरणात विकसित होते. If the nation is given a goal that can inspire the national genius of the country, at once there is feltan all round electrifying influence under which we shall find a mighty flare of constructive doing of progressive feeling and creative thinking from the most unexpected corners.

धर्म जेव्हा अचूक अवलोकिला व योग्य अर्थ निर्वाचित केला जातो. तेव्हा बाह्य Physical doing, mental feeling आणि Intellectual thinking ची योजनाच कार्यान्वित करतो. कोणतीही शिक्षणप्रणाली जी तात्विक सत्यावर आधारीत नाही तसेच धार्मिक तत्वावर आधारीत नाही ती खालील बाबींचे संस्कार विद्यार्थ्यांवर करु शकत नाही. Polish of culture, the nobality of heart, alertness of intelligence.

धर्म व शिक्षण ह्यांचा सहसंबंध स्पष्ट करतंना प.पु. गुरुदेव म्हणतात, "Education sans religion and philosophy is but a technical training that

may bring out trained hands, hearts and heads but not educated men who alone can count in the rediscovery of nation".

ह्या सर्व बाबतीत शिक्षणतज्ज्ञांची भूमिका ही अत्यंत महत्वाची असते. तैत्तरीय उपनिषदाच्या भाष्या मध्ये प.पु. गुरुदेव म्हणतात, ''उच्च दर्जाच्या परिस्थितीची योजना आपल्या भोवती आणि आपल्या सभोवार तसेच जनतेमध्ये निर्माण करण्याकरिता विकसनशील पिढ्यांना काही वस्तुनिष्ठ ज्ञान किंवा काही चमत्कृती पूर्ण सिध्दांत आपण देणे एवढेच नव्हे तर शुध्द जीवनाचे काही आदर्श त्यांच्या मनावर ठसविणे आणि त्याचा व्यक्तिगत जीवनात ते उतरविण्यास प्रशिक्षीत करणे हे शिक्षण तज्ज्ञांचे कर्तव्य असले पाहिजे.

Youth Fortification ह्या लेखात त्यांची शिक्षणाबाबत भूमिका अधिक स्पष्ट होते. (Chinmaya Udghosh - Sept., 2005) मानव हा स्वत:ला अतिशय हळूहळू तयार करणारा प्राणी आहे. आईच्या गर्भात ९ महिने, आईच्या कुशीत एक वर्ष, त्यानंतरही त्याच्या अध्ययनात आईची भूमिका महत्वाची ठरते. तो जेव्हा १२ वर्षाचा होतो तेव्हा त्यांच्या लक्षात येते, He can come to his own judgement but he does not know how? Without a standard of judgement ह्यावेळी निर्णय कसा घ्यावा हे त्याला शिकवायला हवे. कारण ह्याचवयात त्याला त्याच्या नवीन उपकरणाचा शोध लागलेला असतो. ते उपकरण म्हणजे बुध्दी. २० ते २२ वर्षपर्यंत त्याचे बौध्दिक शिक्षण झाल्यावर त्यलाा व्यावसायिक सराव द्यायला हवा. It is only by 25 years that the student really becomes equipped with the right understanding in a Particular profession in life. ह्या वयात त्याला आपल्या बुध्दीचा वापर कसा करावा हे कळायलाच पाहिजे. कारण जेव्हा तो जीवनात प्रवेश करतो तेव्हा त्याच्या भोवती चहुकडून आव्हाने उभे असतात. त्यांना कोणी रोखू शकत नाही. आज बाहेरील जग आपल्याला आनंद देण्यास सक्षम आहे अशी धारणा झाली आहे. ही चुकीची धारणा १५ व्या शतका पासून पाश्चात्यांमध्ये रुजली आहे. आणि ही संकल्पना आपल्या कडेही फोफावली आहे. In the modern education system. We have developed the world at the expense of Individual. व्यक्ती जसजसा वाढतो तसा त्याच्या समोर तीन समस्या उभ्या राहतात.

1) How to meet the problem.

2) When it is solved then it is morally right or wrong.

3) Is it beautiful or ugly?

आजच्या शिक्षणप्रणालीत फक्त पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे. समस्या कशा सोडवायच्या मग त्या आर्थिक असो, तांत्रिक असो, राजकीय असो ह्या बाबी सर्वत्र विद्यापीठात अध्यापन करण्यात येतात. पण मनाची संवेदनशीलता ही आहे की, ती नैतिक दृष्ट्या योग्य आहे की अयोग्य हे शिकविल्या जात नाही. अनैतिक काय आहे हे आपणास माहित नसते. आणि म्हणून आपण जे करतो ते योग्यच आहे, असा विश्वास मानवाचा असतो. पण चांगले काय ह्याबाबत संवेदनाच हरविली आहे. आणि जेव्हा समस्या आपल्यासमोर उभी राहते तेव्हा आपल्याजवळ ती सोडविण्याचा एकच मार्ग असतो तो म्हणजे भ्रष्टाचार आणि मग आपण भ्रष्ट बनतो.

आपल्या अवती भोवती सर्वत्र घाणीचेच साम्राज्य आहे. गाव, शहर, रस्ते, घर, शाळा, महाविद्यालये सर्व ठिकाणी घाणीचे साम्राज्य आहे. सौंदर्य विषयक दृष्टिकोनाचे अध्यापन होतच नाही आणि म्हणून कला आणि साहित्य रसातळाला जात आहेत. टागोर, रमण ह्यांना पर्यायी व्यक्ती कोण आहेत. असे व्यकती घडवू शकतो का? हे प्रत्येक क्षेत्रात दारिद्र्य आहे असे का? How can we revive and bring about the old beauty and genius of this country! पाश्चात्य राष्ट्रात genius हा एक अपघात आहे. Newton हा पाश्चात्य राष्ट्रातील अपघात आहे. पण भारताच्या बाबतीत हा अपघात नाही. एक सर्वसामान्य राजपुत्र बुध्द झाला. कलकत्यातील नरेंद्र हा विवेकानंद झाला. पण आज त्यांना पर्याय ह्या देशात उपलब्ध का होऊ शकत नाही? ह्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे Nobody has got vision. Everybody wants a little money. A little house and somehow. Nobody abroad want to buy Indian goods because the third batch of goods are not up to the standards. They think the whole world can be cheated. व्यक्तीच्या प्रत्येक कृतीत नैतिकता आवश्यक आहे. You cant be secularty successful without moral integrity. I am wandering how we exist as a nation. हे

आजच्या युगाचे आव्हान आहे. आव्हान पेलण्यासाठी त्यांनी युवकांना आव्हान केले आहे. व्यक्तिमत्वाच्या पुन एकात्मतेवरच व्यक्तिची आधुनिकता अवलंबून आहे आणि eindegration of personality हा घटक शिक्षणाने दुर्लक्षित केला आहे.

शिक्षण आणि सुसंस्कार ह्याचा सहसंबंध निकटचा असतो. हा संबंध व्यक्त करतांना आठव्या अध्यायाच्या विवेचनात गुरुदेव म्हणतात, ‘‘थरा सुशिक्षित मनुष्य आपले संस्कार कधीच विसरत नाही. ते त्याच्या व्यक्तिमवाचा एक भाग बनते आणि त्याचा प्रत्येक शब्द व कृती ह्यामध्ये त्याच्या मधील सुसंस्काराचा सुगंध आणते व असा मनुष्य श्रेष्ठ मानव म्हणून (Master Mind) वावरु शकतो. त्याच्या प्रत्येक कृती ह्या निस्वार्थी असतात. त्याचे विचार प्रेमाने सुगंधीत झालेले असतात. त्याच्या भावना दयेमध्ये परिवर्तीत झालेल्या असतात. ज्या क्षणी आपण हे विसरलो त्या क्षणी संस्कृतीला उतरती कळा लागली. अर्जुनासारखे वीर सुध्दा विकृत मनाचे बनतात. मानसिक दृष्ट्या भग्न व बौध्दिक दृष्ट्या अकार्यक्षम होऊन जीवनातील आव्हानांना तोंड देण्यास असमर्थ होतात.

वरील सर्व विवेचनाचे तात्पर्य पुढीलप्रमाणे.

स्वामी चिन्मयानंद हे वर्तमान शिक्षणाबाबत असमाधानी होते. कारण शिक्षणाने ज्ञान वाढले पण ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता विकसित झाली नाही. अर्थात शिक्षणात उपयोजन क्षमता राहिली नाही ही फार मोठी खंत त्यांना होती. शिक्षणातून त्यांना व्यक्तिमत्वाचा केवळ सर्वांगीण विकास अपेक्षित नव्हता तर व्यक्तिमत्वाचा एकात्मिक विकास त्यांना अभिप्रेत होता. व्यक्तिमत्वाची पुनर्रचना त्यांना अपेक्षित होती व ह्यासाठी त्यांनी बुध्दीचे पुनर्शिक्षण व मनाची पुनर्व्यवस्था महत्वाची मानली आणि हृदयाचे शिक्षणाची शिफारस केली. शिक्षणाच्या दृष्टिकोनातून केवळ अपरिसराचे ज्ञान मिळविणे ही बाब जेवढी महत्वाची आहे त्यापेक्षाही अधिक ह्या आजूबाजूच्या सर्व परिसरात आपले मानव म्हणून काय स्थान आहे ह्याचे ज्ञान प्राप्त करण्यावर त्यांनी भर दिला. ह्यालाच त्यांनी हृदयाचे शिक्षण म्हटले आहे. नैतिक जीवन मूल्याची केवळ बौध्दिक चर्चा करणे त्यांना मान्य नव्हते तर त्याला कृतीच्या पातळीवर आणण्याबाबत ते आग्रही होते व नेमकी हीच बाब आज शिक्षणातून निसटते आहे. आज समाजातील सुशिक्षितांचे वर्तन हे निष्कृष्ट दर्जाचे झाले आहे. त्याबाबत त्यांनी आपला रोष

प्रगट केला आहे. शिक्षण आणि सुसंस्कार ह्यांचा समन्वय त्यांनी आपल्या विचारात निर्माण केला आहे. आज ज्ञान आणि कृती ह्याची जी कारक झाली आहे त्याबाबत समन्वयात्मक दृष्टिकोन त्यांनी मांडला आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत त्यांनी मनन व चिंतनाला विशेष प्राधान्य दिले आहे. ज्ञान प्राप्त करणे हे जसे महत्वाचे तसेच त्याचा अभ्यास व त्यानुसार कृती ह्यावरही त्यांनी भर दिला आहे. आणि म्हणूनच ज्ञान + कृती शिक्षण = शिक्षण ही संकल्पना त्यांना मान्य आहे. शिक्षण व अनुदेशन ह्यात त्यांनी फरक केला आहे. कारण निर्देशन बाहेरुन देण्यात येतात तर शिक्षण ही अंतरंगातून प्रस्फुटीत होणारी बाब आहे, असे ते मानतात. त्यामुळे खऱ्या शिक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे. आज शिक्षण संस्थांच्या बदलत्या भूमिकेवर त्यांना तीव्र रोष आहे. आजच्या शिक्षण संस्था ह्याखऱ्या अर्थाने शिक्षण देणाऱ्या संस्था राहिल्या नाही तर त्या निर्देश देणाऱ्या संस्था झाल्या आहेत. ही वास्तविकता त्यांनी अचूक हेरली होती. इतर अद्वैतवादी तज्ज्ञाप्रमाणे त्यांनी शिक्षण ही सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती आहे ह्या संकल्पनेवर भर दिला पण त्यांचे वेगळेपण हे की शक्ती गुरुद्वारा संरक्षित असते. ह्या ठिकाणी गुरुची जबाबदारी अधिक वाढते. शिक्षणाच्या माध्यमातून मानवाच्या विविध क्षमता विकसनावर त्यांनी भर दिला. शिवाय आनंद निर्मितीवर त्यांनी भर दिला आहे. शिक्षणाचा सर्व जगाशी संबंध जोडण्यावर त्यांनी भर दिला आहे. अर्थात इतरांना सुध्दा आपले शिक्षण उपयोगी ठरावे ही भावना त्यामागे आहे. To Give, To Serve, To Share ही अभिवृत्ती महत्वाची आहे. Knowledge चे रुपांतर Wisdom मध्ये व्हावे असे त्यांनी नमूद केले आहे. निर्मितीवर त्यांनी शिक्षण संकल्पनेत भर दिला आहे. आज शिक्षणात विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त माहिती पुरविली जाते. आजचे शिक्षण Information Oriented झाले आहे. पण केवळ Information देऊन चालणार नाही. ह्याला ते शिक्षण समजत नाही. मानवाचे आंतरिक सौंदर्य शिक्षणातून अभिव्यक्त होण्यावर त्यांनी भर दिला आहे. व्यक्तीच्या अभिव्यक्तीवर त्यांनी भर दिला आहे. शिक्षणातून मानवी व्यक्तिमत्वात शिरलेल्या नकारात्मक बाबी निघायला हव्यात. आंतरिक समायोजनावर त्यांनी शिक्षण संकल्पनेत भर दिला आहे. केवळ शाळा महाविद्यालयात सक्तीचे शिक्षण घेऊ शकत नाही तर शिक्षणातून आत्मपरिवर्तनावर त्यांनी भर दिला आहे. व्यक्तीने स्वत: स्वत:शी परिचय करुन घ्यावा. अर्थात ह्यासाठी त्यांनी Meditation चा मार्ग सुचविला आहे. कारण ध्यानानेच खरे आत्मपरिवर्तन शक्य आहे असा

त्यांना दृढविश्वास आहे.  ध्यानानेच मानवाच्या आंतरिक व्यक्तिमत्वाचे पुनर्घटन होते.

शिक्षणातून नैतिक जीवन मूल्यांचे आचरण घडायला हवे, असे त्यांना अभिप्रेत होते.  जी बाब आज समाजात आढळत नाही आणि म्हणूनच केवळ पुस्तकी ज्ञान संपादन करणे म्हणजे शिक्षण नाही तर ह्याज्ञानाचे प्रत्यक्ष जीवनात उपयोजन महत्वाचे आहे.  केवळ संगीताची जाण असून चालत नाही तर त्याचा रियाजही असावा लागतो.  त्यांनी आपल्या शिक्षण विषयक विचारसरणीत Spiritual Education चा मार्ग सुचविला आहे.  शिक्षण संकल्पनेत त्यांनी मनाला अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे.  जसे मन तसा माणूस ह्या संकल्पनेवर त्यांचा विश्वास आहे.  ह्या मनाला चांगले अथवा वाईट बनविणारे व्यक्तिचे विचार हे अत्यंत महत्वाचे असतात. आणि म्हणून शिक्षणातून विचारांना वळण देणे ह्या बाबीवर त्यांनी विशेष भर दिला आहे.  ह्यालाच ते चांगले शिक्षण म्हणतात. मानवाचे विचारपरिवर्तन हे सकारात्मक दिशेने होणे ह्यालाच ते शिक्षण म्हणतात.  विचारांचे सौंदर्य व त्यातून चारित्र्य विकसन त्यांना अपेक्षित होते.  ह्यासाठी तशा सक्षम शिक्षकांची आवश्यकताही त्यांनी विषद केली आहे.  चांगल्या गुणांचे आचरण करणारा शिक्षक हा शिक्षण संस्कारातील महत्वाचा घटक त्यांनी मानला आहे.  व्यक्ती शिक्षणातून भारताची नियती बदलण्यावर त्यांनी भर दिला आहे.  प.पू. गुरुदेव हे प्रखर राष्ट्रभक्त होते.  त्यांच्या प्रत्येक विचारात त्यांचे राष्ट्रप्रेम तीव्रतेने प्रगट होते.  शिक्षणात त्यांनी विविध विषयांवर भर दिला तसेच संस्कृती शिक्षणाला त्यांनी प्राधान्य दिले तसेच आधुनिक विज्ञानालाही त्यांनी स्थान दिले आहे.  अर्थात शिक्षणातून चांगल्याच विचारांची निर्मिती व्हावी ह्याबाबत त्यांचा कटाक्ष होता.  आजचे शिक्षण मानवाला पदव्या प्राप्त करुन देते पण जीवानाचा दर्जा उंचावण्याचे सामर्थ्य आजच्या शिक्षणात नाही आणि म्हणून शिक्षण हे Value based असावे, असे त्यांनी सुचविले आहे.  आजची शिक्षण पध्दती ही विद्यार्थ्यांच्या डोक्यात माहिती कोंबते व परिक्षेच्या वेळी ती बाहेर काढते एवढेच आहे. ह्यातून मूल्य विकास होत नाही.  आधुनिक पिढी ही अत्यंत हुशार आहे तीची आकलन शक्ती जबरदस्त आहे.  ह्या मुद्यांकडे त्यांनी लक्ष वेधले आहे व बालकांमध्ये वयोगटानुसार कोणते शिक्षण द्यावे, कोणते संस्कार रुजवावेत ह्याबाबतही त्यांनी विस्तृत विवेचन केले आहे. शिक्षणाचा एक आकृतीबंधच त्यांना दिला आहे.  हा आकृतीबंधात Inner values of life व Outer objective science ह्या दोहोंचाही विचार केला आहे.  Secular Education

चाही प्रस्ताव त्यांनी आपल्या तत्वज्ञानातून मांडला आहे. सुशिक्षित माणूस कोण? ह्याची परिभाषा त्यांनी 'सुसंस्कारीत आहे तो सुशिक्षित' अशी केली आहे. Factual Knowledge किंवा Wandrous Theories त्यांना मान्य नाहीत. तर जीवनाच्या आदर्शावर त्यांचा भर आहे व त्यासाठी त्यांनी धर्म शिक्षणाचा मार्ग सांगितला आहे. Four Pillars of Character त्यांनी सांगितले आहे. Doing Feeling Knowing आणि Becoming हे चार Pillars होय. धर्म शिक्षणाच्या संदर्भात त्यांनी ह्या Pillars चा विचार केला आहे. धर्म व शिक्षणाचा संबंध त्यांनी जोडला आहे. धर्म शिक्षणातून सुंदर मनाची निर्मिती करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

## २) जीवनाचे ध्येय :-

शैक्षणिक तत्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास जीवनध्येयाचे प्रतिबिंब हे शिक्षण विषयक ध्येयामध्ये प्रतिबिंबित होते. विविध तत्वज्ञ, विविध उपशाखा ह्यांचा विचार केल्यास त्यांनी जी जी जीवनाची ध्येय सांगितली ती ती ध्येय शिक्षण विषयक ध्येयात प्रतिबिंबित झालेली आढळतात. कालखंडानुसार जरी आपण शिक्षणाचा विचार केला तरी विविध कालखंडात प्राचीन मध्य युगीन आधुनिक कालखंड ह्या कालखंडात जी जी जीवन ध्येये समाजात प्रसुत झाली त्या सर्वांचे प्रतिबिंब आपणास त्या त्या कालखंडातील शिक्षण प्रणालीत पडल्याचे आढळते.

प.पु. गुरुदेवांनी जीवनाची ध्येयेय मांडली आहेत. वास्तविक पाहता गुरुदेवांच्या साहित्याच्या प्रत्येक शब्दातूनच जीवन विषयक ध्येयाचे मार्गदर्शन प्राप्त होते पण ह्या ठिकाणी केवळ अशाच जीवन ध्येयांचा विचार करण्यात आला आहे ज्याचे प्रतिबिंब त्यांच्या शिक्षण विषयक विचारामध्ये पडले आहे.

''ध्यान आणि जीवन'' ह्या पुस्तकात जीवनाचे संकुचित ध्येय मांडतांना ते म्हणतात, संपादनात आणि खर्च करण्यात आपण आपल्या शक्ती व्यर्थ खर्च करीत असतो. आपणापैकी प्रत्येक जण एकाच ध्येयाच्या मागे असतो. इंद्रीय सुख प्राप्त करुन देणाऱ्या वस्तुंनी भरलेल्या आपल्या ह्या जागृतावस्थेतील जगात आपणासर्वांना केवळ निर्भेळ असा परिपूर्ण आनंद आणि शांती याशिवाय दुसरे काहीही नको असते. इंद्रीय सुख प्राप्त करुन देणाऱ्या

वस्तुमध्ये आनंदाची केवळ खोटी लकाकी असते. ही लवकरच संपुष्टात येते. हा आनंद गमावल्यानंतर ती धावती सुखे मिळविण्याकरिता अंध संसारी लोक त्या सुखाची कमाई करण्याची आपली कुवत द्विगुणित करण्यासाठी अधिक धडपड करीत असतात. पूर्ण सुखावस्था प्राप्त करुन घेण्याला त्याच अनादी सार्वत्रित प्रेरणेने एका कामनेनंतर दुसऱ्या कामनेकडे हाकलले जाणारे हे दुर्दैवी जीव सुख संपादन करणे आणि त्याचा व्यय करणे या घाम गाळावयाला लावणाच्या झटपटीत थकतात. दु:खी होतात आणि निराश होऊन अंती हजारो आंतरिक कामनांच्या अतृप्तीच्या कोलाहलात एक दिवशी जागृत जगाचा उपभोग घेण्याचे साधन असणारे हे शारीरिक कोष सोडून जातात.''

बाह्य वस्तुमध्ये आनंद देण्याची खरी क्षमताच नसते. आनंद वरवरचा असा आनंद असतो. हा जसा प्राप्त झाल्यासारखा वाटतो पण तेवढाच तो क्षणिकही असतो. पण ह्या आनंदाचे क्षणभंगुरत्व मानवाच्या लक्षात येत नाही व अशा अनेक क्षणभंगुर आनंदाच्या पाठीमागे लागून मानव थकतो व ज्या साधनाच्या आधारे त्याने ह्या संपूर्ण जगाचा उपभोग घेतला असतो तोच कोष सोडून जाते. हे जीवनाचे अत्यंत संकुचित असे ध्येय आहे. पण हे ध्येय जरी संकुचित असले तरी ह्या ध्येयाने अखिल मानवजात व्यापली आहे. संपूर्ण मानव ह्याच आनंदाच्या मागे लागला आहे. हे मात्र प.पु. गुरुदेवांना मान्य नाही. ह्याचे कारण मानवाच्या भौतिक समृध्दीच्या पलीकडे त्याची सांस्कृतिक व आध्यात्मिक उन्नती ही महत्वाची असते. ह्यलाच प.पु. गुरुदेवांना 'आत्मोन्नती' हे नाव दिले आहे. गीतेच्या तिसऱ्या अध्यायाच्या विवेचनात त्यांनी नमूद करुन ठेवले आहे की, ''संपत्तीचे उत्पादन मिळकत साठा व त्याचा व्यय म्हणजे जीवनाची इतिकर्तव्यता नाही. आपल्याला संस्कृतीच्या जगात एक महान जीवितकार्य पूर्ण करायचे आहे आणि भौतिक समृध्दी किंवा यश ही केवळ साधने म्हणून उपभोगाची आहेत. ती काही जीविताचे ध्येय किंवा परिसमाप्ती नाही. प्राप्त परिस्थितीचा जास्तीत जास्त चांगला उपयोग कशा प्रकारे केला म्हणजे आपली सांस्कृतिक उन्नती व आध्यात्मिक पूर्णता तो साधू शकला पाहिजे''. ही सांस्कृतिक उन्नती व आत्मिक उन्नती साधण्यासाठी मानवाच्या योग्य कर्माची (Right Action) आवश्यकता आहे. ''योग्य कर्मानेच मानव आपल्या निर्माण झालेल्या व अस्तित्वात असलेल्या संस्काराचे निर्मूलन योग्य कर्मानेच करु शकतो. कर्माच्या माध्यमातून हे संस्काराचे ओझे कमी झाले की, मनावरचे दडपण बरेच

कमी होते व हे दडपण कमी झाले तर मानवाची आत्मोन्नती होते.'' ही बाब केवळ मानवाच्याच बाबतीत शक्य आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे विवेक शक्तीमुळे मानवाचे वेगळेपण. मानव आपल्या विवेक शक्तीच्या माध्यमातून श्रेयस-प्रेयस, खरे-खोटे, सत्य-असत्य ह्यातील भेद समजू शकतो. सतत विवेक शक्तीच्या ह्या वापरातून मानवाची बुध्दी ही बळकट बनते व ही बळकट झालेली बुध्दीच मानवाच्या आत्मोन्नतीचे साधन बनते. ह्या विवेक शक्तीचा विकास करणे हे जीवनाचे ध्येय बनते. त्याचप्रमाणे योग्य कर्म करण्याची पात्रता निर्माण करणे हे जीवन ध्येय असायला हवे.

गीता अध्याय ४ वर विवेचन करतांना प.पु. गुरुदेवांनी आत्मसाक्षात्कार हे जीवनाचे परमध्येय मानले आहे. ते म्हणतात, "आत्मसाक्षात्कार हे जीवनाचे ध्येय आहे. आपला मानसिक समतोल बिघडविणारी आसक्ती व तद्नुषांगिक विकास ह्याचा त्याग केल्या शिवाय कोणतीही मानवाची प्रगती शक्य नाही. ज्यावेळी अशा प्रकारची मनाची शिस्त प्राप्त केली जाते. तेव्हाच आत्मसाक्षात्काराच्या विचारात मग्न होऊन मानवाला हा विजय प्राप्त होतो. म्हणून आत्मसाक्षात्कार मिळविणे त्याची उत्कट भावना व जीवनातील रोमांचकारी आनंद बनतो.'' अर्थात आत्मसाक्षात्कारासाठी आसक्तीचा त्याग महत्वाचा ठरतो. त्याच प्रमाणे मानसिक शिस्त महत्वाची ठरते. म्हणून आसक्तीचा त्याग महत्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे मानसिक शिस्त महत्वाची ठरते. म्हणून आसक्तीचा त्याग करणे व मानसिक शिस्त प्राप्त करणे हे जीवनाचे ध्येय ठरते. ह्या आत्मविकसनासाठी भारतीय संस्कृतीने सांगितलेले जे ५ प्रकारचे यश आहेत. द्रव्ययज्ञ, तपयज्ञ, योगयज्ञ, स्वाध्याय यज्ञ, ज्ञान यज्ञ ह्या कृतीला त्यांनी मान्यता दिली आहे.

गीता अध्याय क्र. ४ मध्ये प.पु. गुरुदेवांनी परमशांती प्राप्त करणे हे जीवनाचे ध्येय विषद केले आहे. जीवनाचे अंतिम ध्येय परमशांती. ज्याला ऱ्हास नाही अशी परमशांती. येथे शांती ह्या शब्दात समृध्द मानसशास्त्रीय सूचकता अभिप्रेत आहे. प्रत्येक सजीव प्राणी आपल्या जीवनातील सर्व कर्मापासून अधिकाधिक सुख मिळावे असा प्रयत्न करतो. श्वासोच्छवास व अन्न घेण्यापासून ते थेट युध्द व विनाशाच्या मार्गे जागतिक बाजारपेठ ताब्यात घेण्याच्या संघटीत प्रयत्नापर्यंत जी कर्मे केली जातात ते ह्या दीनदुबळ्या मानवाचे अधिक सुख व आनंद

शोधण्याचे प्रयत्न होत. हे मानवाच्या बाबतीत नव्हे तर पशुपक्षी व वनस्पती जगत ह्यांच्या बाबतीतही खरे आहे. थोडक्यात आपल्याला अधिक आनंद, अधिक समाधान मिळविण्याच्या आपल्या आंतरिक वासनाच्या प्रेरणेशिवाय मनुष्याच्या हातून कोणतेही कर्म होणे शक्य नाही. अशाप्रकारे सर्व जग जर शक्य तितके श्रेष्ठ सुख मिळविण्याचा प्रयत्न करीत असेल व ते मिळाल्यावर ते कायम टिकविण्याचा प्रयत्न करीत असेल तर मग जीवनाचे ध्येय परिपूर्ण सुख असलेच पाहिजे की जेथे सर्व संघर्ष संपुष्टात येतात. सर्व इच्छा पूर्ण होतात. सर्व विचार व विक्षेप संपतात. सुखोपभेगच्या इच्छेने विचारांना चालना मिळते ते विचार बाह्य जगात पूर्ण होण्याचा प्रयत्न करीत असतांना कर्माच्या रुपाने रोजच्या जीवनात प्रगट होतात. जेव्हा पूर्ण आनंद प्राप्त होते तेव्हा मनाची अस्वस्थता व शरीराचा थकवा नाहीसा होतो. म्हणून पूर्ण आनंद म्हणजे पूर्ण शांती अशी परमशांती प्राप्त करणे हे जीवनाचे ध्येय आहे.''

मानवाच्या मनाची अशी अवस्था यायला हवी ज्या अवस्थेत मानवाच्या मनाचे विक्षेप संपले असतील. हे विक्षेप केवळ आनंदाच्या प्राप्तीतूनच संपुष्टात येतात. मानवाला सर्वोत्तम ध्येयाच्या प्राप्तीतून आनंद प्राप्त होतो व ह्या आनंदातून विक्षेप मिटतात व मानव परमशांतीची अनुभूती प्राप्त करतो. पण ही बाब मूलतः त्याच्या वासनांवर अवलंबून असते. त्याच्या वासनांनुसार त्याची कर्म घडतात.

वरील विवेचनाचा विचार केल्यास खालील जीवनाची ध्येये आपणास सांगता येतील. १) वासनांना संस्कारीत करणे, २) उच्च कोटीच्या कर्माची प्रेरणा, ३) विक्षेपांचा शेवट करणे, ४) शांतता प्राप्त करणे. तात्पर्य ह्या शांतीचक्राच्या माध्यमातून परमशांती प्राप्त करणे हे जीवनाचे ध्येय आहे.

## दिव्यत्वाचा शोध घेणे :-

मानवाने आपल्यातील दिव्यत्वाचा शोध घेणे एक जीवन ध्येय मानले आहे. मानवाचे मुळ रुप दिव्य आहे. प.पु. गुरुदेव हे अध्यात्मवादी आहे. त्यांचे विचार हे अद्वैतवादाचा पुरस्कार करणारे आहे. त्यामुळेच त्याचा मानवाच्या शुध्द दिव्य स्वरुपावर विश्वास आहे. पण आपल्यातील ह्या शुध्द स्वरुपाची ओळख मानवाला नसते. हे शुध्द स्वरुप त्याला शोधावे

लागते. गीता अध्याय ४ मध्ये गुरुदेवांनी विद्युतशक्तीचे उदाहरण देऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, "विद्युतशक्ती शाश्वत आहे, हे जसे आपण म्हणू शकतो. कारण शास्त्रज्ञांनी जेव्हा वीज प्रथम शोधून काढली त्याच्याही पूर्वी विद्युत शक्ती अस्तित्वात होती. आणि जरी तिच्या अस्तित्वाचा आपणाला विसर पडला तरी विद्युत शक्ती संपणार नाही. त्याचप्रमाणे मनुष्यातील दिव्यत्व ही गोष्ट आपण जरी मानली नाही तरी त्याचे अस्तित्व नाहीसे होत नाही. अशा ह्या दिव्यत्वाचा शोध घेणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे.

## परिपूर्ण आनंदाची प्राप्ती :-

परिपूर्ण आनंदाची प्राप्ती करुन घेणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे. हा परिपूर्ण आनंद मानवाला केव्हा प्राप्त होऊ शकतो. ह्याबाबत गीता अध्याय ५ मध्ये प.पु. गुरुदेवांनी पुढील प्रमाणे आपल विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात, "मानवाने स्वत:च्या ठिकाणी केवळ आवश्यक ते समायोजन केल्यानंतरच ह्या जगात तो मनुष्य पूर्ण आनंदी जगण्यास समर्थ होतो. परिपूर्णतिचे गीत गाणारी मनबुध्दीरुपी वाद्ये जी अनादीकाळापासून दुर्लक्षित झाली आहेत. त्यातून आनंदाची सुरावट बाहेर पडण्यापूर्वीच त्याचे समायोजन करणे आवश्यक आहे.'' प.पु. गुरुदेवांनी ह्या ठिकाणी खंत व्यक्त केली ती ही की, आजपर्यंत मानवाचे मन आणि बुध्दी ही अनादी काळापूसन दुर्लक्षित आहे. प्रत्येक कालखडात मन बुध्दीचा विकास महत्वाचा मानला गेला. त्या विकासावर भर ही देण्यात आला. आनुषंगिक प्रयत्नही करण्यात आले. पण आज जो मानवजीतीचे व्यवहार आपण पहात आहोत. त्यावरुन मानवाच्या मन आणि बुध्दीचा परिपूर्ण विकास झाला. सकारात्मक विकास झाला असे आपणास म्हणता येणार नाही. मानव मन आणि बुध्दीच्या परिपूर्ण विकासातून जेव्हा बाह्य जगात समायोजन करावयास शिकतो तेव्हाच त्याला आनंदाची प्राप्ती होते. आणि म्हणून परिपूर्ण आनंदाची प्राप्तीसाठी मानवाच्या मन व बुध्दीमध्ये समायोजाची क्षमता निर्माण होणे हे जीवनाचे महत्वाचे ध्येय आहे व हे ध्येय साध्य होण्यासाठी मानवाला आपल्या रागद्वेषादि विकारांचा त्याग करणे महत्वाचे असते. कारण ही मानवाच्या व्यक्तिमत्वाची एक प्रकारे घसरणच आहे. गुरुदेव म्हणतात, "इच्छा, कामना म्हणजे आपल्या बुध्दीच्या उत्तुंग शिखरावरुन खाली घसरणारा अंत:करणाच्या दऱ्याखोऱ्यातून बाह्य विश्वातील विषयवस्तुकडे वेगाने जाणारा विचारांचा जणू हिमनग आहे. जेव्हा विचारांच्या

ह्या हिमनगाला त्याच्या घसरणाऱ्या वेगात तो त्याच्या नियोजीत स्थानी जाऊन पोहोचण्यापूर्वीच जोरदार अडथळ्यांनी प्रतिबंध होतो तेव्हा त्या अडथळ्यावर आपटून त्याचे तुकडे होतांना जो स्फोट होतो, त्याला क्रोध म्हणतात, जितक्या तीव्र कामनेचे आपण एखाद्या विषयाचे चिंतन करतो तितक्याच तीव्र प्रमाणात आपल्यात आणि आपल्या इच्छीत वस्तुमध्ये येणाऱ्या अडथळ्यां विरुध्द आपणास क्रोध येतो. ज्याने आपल्या सुखदु:खावर विजय मिळवला आहे आणि ज्याने स्वत:च्या ठिकाणी बाह्य विषयवस्तुपासून बरीचशी अनासक्ती मिळविली आहे त्याला सुखकारक किंवा दु:खकारक गोष्ट प्राप्त करण्याची इच्छा ही भावनाच असत नाही. ज्या अंत:करणात इच्छा नाहीत तेथे द्वेषाची भावना ही अपरिचित, परकीय घटक ठरते. नि:संशय शक्तीमान व प्रतिकार करण्यास जवळ जवळ कठिण असलेल्या ह्या दोन विकारांवर ज्याने जय मिळविला आहे तोच ह्या विविधतेच्या आणि अपूर्णतिच्या जगात खरे व स्थीर सुख मिळविणारा स्वतंत्र एकच एक मनुष्य म्हणून जीवन जगू शकतो. म्हणून जो आध्यात्मिक उत्क्रांतीच्यामध्ये रागद्वेषादी विकारांचा त्याग करण्यास शिकला असेल तोच जीवनात पूर्णपणे सुखी होईल.'' सुखी व आनंदमय जीवनाचा हा महामंत्र आहे. हा महामार्ग व राजमार्ग आहे. आनंदाच्या ह्या महामार्गातील षड्‌रिपू हे मोठे अडथळे होत. ह्या षड्‌रिपूंची साखळीच ह्या महामार्गात तयार होते पण ही साखळी तोडून जो ह्या मार्गावरुन वाटचाल करतो त्याचे जीवन केवळ यशस्वीच नाही तर सार्थक बनते.

**आत्मसंयम :-**

''मानव निर्माण की कला'' हे प.पु. गुरुदेवांचे प्रवचनावर आधारीत पुस्तक आहे. ह्या पुस्तकात त्यांनी आत्मसंयम हे जीवनाचे ध्येय सांगितले आहे. ते म्हणतात, ''मानवात अनेक स्वैर प्रवृत्ती असतात. ही निसर्गाची देणगी आहे पण त्यावर विजय प्राप्त करणे, हे आपल्या विकासाच्या प्रती अग्रेसर होण्यासारखे आहे. आत्मसंयम हा कार्यकुशलतेला गती देण्यासाठी दृष्टिकोनास साह्य प्रदान करण्यासाठी करणे आवश्यक आहे. इंद्रीयांच्या माध्यमातून आमच्यातील बऱ्याच शक्तीचा ऱ्हास होतो. आत्मसंयमी व्यक्तीच्या माध्यमातून त्याचा संचय करुन त्याचा उपयोग रचनात्मक कार्याकरिता केला जाऊ शकतो. ह्यामुळे व्यक्तीची विचार शक्ती, इच्छाशक्ती ह्याचे संवर्धन होते. परिणामी कार्यकुशलता विकसित

होते.''  मानवातील स्वैर वृत्ती ह्या जरी निसर्गाची देणगी असल्या तरी त्यावर विजय प्राप्त करणे हा पुरुषार्थ आहे.  गुरुदेवांना आत्मसंयमन हा कार्यकुशतेला गती देण्यासाठी महत्वाचा वाटतो.  आत्मसंयमी व्यक्तीची संचित शक्ती रचनात्मक कार्याकडे वळविल्यास सामाजिक विकास पर्यायाने राष्ट्राचाही विकास घडून येईल.  नवीन धोरणानुसार समाजाच्या उत्पादन क्षमतेत वाढ करायची असेल, राष्ट्राचे उत्पन्न व उत्पादन वाढवायचे असेल तर अशा आत्मसंयमी लोकांची फौज निर्माण करावी लागेल व त्याची संचयीत शक्ती ही राष्ट्राच्या विधायक व उत्पादक कार्याकडे वळवावी लागेल.

पण आज आधुनिक काळात विशेषत: युवकांमध्ये आत्मसंयम नाही ह्याबाबत ह्याच पुस्तकात गुरुदेवांनी खंत व्यक्त केली आहे.  वास्तविक आजच्या काळात आत्मसंयमाची अतिशय आावश्यकता आहे.  कारण आजचे युग हे अंतर्बाह्य संषर्घाचे युग आहे.  ह्या युगात युवकांनी आत्मसंयम वाढविण्यासाठी काय करावे ह्यावर उपाय सांगतांना प.पु. गुरुदेव म्हण्तात, ''मनावर संयम ठेवणे हे जीवनाचे ध्येय आहे. आज आधुनिक काळात युवकांनी ह्यासाठी काय करायला हवे? कारण त्यांना सदैव मोहक गोष्टीमध्येच रहावे लागते.  ह्यासाठी निरंतर मनाला अंतर्मुख करण्याचा सराव द्यावा लागेल.''  मनाच्या अंतर्मुखतेचा हा मार्ग अतिशय प्रभावी आहे. प.पु. गुरुदेव हे द्रष्टे होते.  २१ व्या शतकात निर्माण होणाऱ्या आकर्षणच्या स्फोटाबद्दल त्यांना कल्पना आलेली होतीच.  अशा ह्या आकर्षणाच्या स्फोटात युवकांचे मन जास्त बहिर्मुख होऊन त्यांची कार्यकुशलता नष्ट होण्याचा संभव नाकारता येत नाही.  हे त्यांनी जाणले होते आणि म्हणूनच त्यांनी अंतर्मुखतेचा उपाय सांगितला.

आत्मसंयम न ठेवल्याने मानवाचे पतन घडून येते.  प.पु. गुरुदेव म्हणतात, ''ज्या व्यक्तिमध्ये आत्मसंयमन नाही त्याचे जीवन पतनशील बनत निरंतर विषय चिंतनातून आसक्ती, आसक्तीतून कामना, कामनेतून क्रोध, क्रोधातून मोह, मोहातून स्मृतीनाश व ह्या स्मृतीनाशातून विवेकशीलता नष्ट होते.

ह्या दुष्टचक्रावर उपाय म्हणजे आत्मसंयम आहे.  आत्मसंयमनाने आपण आपले कल्याण साधू शकतो.  आपल्या आंतरिक व्यक्तिमत्वाला आपण शक्तीशाली बनवू शकतो.  ह्यामुळे मानव एक श्रेष्ठ विचारक बनतो.  ज्याने आपले संस्कार शुध्द बनविले आहेत

त्यांच्याकडून इंद्रीय नियंत्रण शक्य आहे. इंद्रीयांचे नियंत्रण म्हणजे त्याचे दमन नाही. तर मनाच्या पुनर्शिक्षणाच्या द्वारा स्थायी व कल्याणकारी आत्मसंचयाची प्राप्ती होऊ शकते व आत्मसंयमनाने शांतीप्राप्त होते.'' मानवाबाबतचा मानवी विकासाबाबतचा एक कल्याणकारी दृष्टिकोन ह्याठिकाणी प.पु. गुरुदेवांनी मांडला आहे. आज मानव वासनेच्या आहारी जातो आहे. वासनांध लिंगपिसाट बनतो आहे. मानवाने इंद्रीयांना स्वैर सोडले आहे. मानवी इंद्रीयांना आज योग्य प्रशिक्षणच दिल्या जात नाही. त्याचा परिणाम इतर पीढ्यांवर त्या होऊन अनियंत्रित बनत चालल्या आहेत. अशा परिस्थितीत परमपूज्य गुरुदेवांचे विचार हे अतिशय महत्वपूर्ण ठरतात. Vedanta in action ह्या पुस्तकात ते म्हणतात, "There is duty towards yourself to live inself control to eat and sleep properly, to exercise your body to maintain a loving and peaceful attitude towards all and to educate yourself more and more in your Shastra knowledge. This alone can bring sweetness into your words.

## आत्मानुभव प्राप्त करणे :-

आत्मानुभव प्राप्त करणे हे जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे. आत्मानुभवाचा विचार व्यक्त करतांना "मानवनिर्माण की कला'' ह्या पुस्तकात गुरुदेव म्हणतात, "आत्मानुभवाचा अर्थ केवळ उच्च चैतन्य जाणणे एवढाच नाही तर अशी दैदिप्यमान ज्योत जागविणे ज्यामुळे आजूबाजूचे वातावरण दैदिप्यमान करते. ह्यामुळे आमचा जीवन विषयक दृष्टिकोन बदलून जातो. आत्मानुभवानंतर जीवन दृष्टिकोन अहंकार केंद्रीत रहात नाही. आपल्यात विश्वव्यापी आपलेपणा व एकत्वाचा भाव निर्माण होतो. एकत्वाची ही ओळख म्हणजे आनंदाचा प्रसाद, शांतीच घर, तृप्तीचे मंदीर आहे. नित्य अनंत अविनाशी तत्वाची आत्मतत्वाची प्राप्ती हे जीवनाचे परमध्येय आहे. चैतन्याच्या ह्या अवस्थेच्या प्राप्तीनंतर मानव स्वार्था करता, कामवासना, लोभ, आसक्ती ह्या भावनांकडे पुन्हा वळत नाही.''

आत्मानुभवाचा विचार जेव्हा गुरुदेव मांडतात तेव्हाच त्यांची अनुभूतीची उंची आपल्या लक्षात येते. आत्मिक स्तरावरील ऐक्याची अनुभूती माणसाला वैश्विक बनविते व ह्यातून त्याच्यात सहअस्तित्वाची भावना निर्माण होते. माझ्यातील आत्मतत्वाचा शोध हा

विश्वाशी अद्वैत साधतो व त्यामुळे हीन भावनांना मनामध्ये स्थान रहात नाही. जीवनाचा दृष्टिकोन मानवाची वाट बदलून जातो. आत्मानुभवाचे ध्येय साध्य करण्यासाठी तीन घटक महत्वाचे मानले आहेत ते पुढीलप्रमाणे

१) दृढनिश्चय आणि संकल्प

२) ध्येयप्राप्तीबाबत अनन्य निष्ठा

३) साफल्यासाठी आत्मसंयम

वरील तीनही गुणांची सातत्याने कास धरली व पाठपुरावा केला तर मानवाला आत्मानुभव तर प्राप्त होईलच पण त्याच्या ठिकाणी विश्वप्रेमाची भावना निर्माण होईल. कारण आपल्यातील आत्मतत्व हे त्या एकमेवद्वितीय सर्वव्यापी जाणीवतत्वाहून वेगहे नाही. अशी ज्याला अनुभूती आलेली असते. त्याला तत्क्षणी शोध लागतो की, तेच त्याच्या भोवतालच्या वैविध्यपूर्ण नामरुपाचा गाभा होय. असा पुरुष एकतेच्या निकटच्या जाणीवेने सतत जीवन व्यतीत करीत असल्यामुळे दुसऱ्यावर स्वत:च्याच आत्मतत्वाइतकेच प्रेम केल्याशिवाय रहात नाही. ह्याच्याबाबत विश्वप्रेम ही काही संपादन करण्याची कला नाही. अथवा अनुसरावयाचा औपचारिकपणा नसतो. अथवा ते साध्य करावयाच`नसते. तो त्याचा नित्याचा विश्वास असतो.'' अर्थात विश्वप्रेम ही जीवन शैली बनते हेच ह्यातून अभिप्रेत होते. असा मानव हा विश्वमानव असतो.

## शांती व आनंद प्राप्त करणे :-

आनंदाची प्राप्ती करणे व परमशांतीचा अनुभव घेणे हे जीवनाचे ध्येय आपण यापूर्वी पाहिले आहे. ह्या दोहोंचा एकत्रित विचार ''ध्यान आणि जीवन'' ह्या पुस्तकात करण्यात आला आहे. प.पु. गुरुदेव ह्यांच्या मते, परमशांती परमानंद प्राप्त करणे हेच जीवनाचे ध्येय आहे. शांती ह्याचा अर्थ वयक्तिने अनुभवलेली आणि केवळ निरपेक्ष दु:खरहित अंतर्गत शांतता म्हणून जाणलेली मानसिक अवस्था. ह्या शांतीचे अन्वेषण फक्त अशाच व्यक्तिकडून केले जाते. ज्याने बाह्य जगतापासून मन पराङ:मुख करुन अंतर्मुख होऊन विविध मानसिक अवस्थेत घडून येणाऱ्या गोष्टीचे निरीक्षण केले आहे. पण जोवर माणूस म्हणून आपल्या वैषयिक गरजा पुरविण्यात दंग राहतो व त्याचाच जीवनमूल्य म्हणून स्विकार करतो तोपर्यंत

तो हे करु शकत नाही. आपली एकच वैषयिक कामना ही असंख्य दु:खाचे मूळ असते. शिवाय आपल्या आत्मक्लेशाच्या साखळीची ती सुरवात असते. वस्तुच्या कामना मनात खळबळ निर्माण करतात. ही अस्वस्थता आपल्या मानसिक शांतीचा ऱ्हास घडवून आणतात. ह्या कामना विचारांना जन्म देतात, विचार कर्मांना जन्म देतात. ह्या कर्माची फलश्रृतीत पूर्तता होते. तेव्हा व्यक्तीमध्ये आनंदाची भावना व शांती निर्माण होते. म्हणून जेवढ्या कामना अधिक तेवढे विचार अधिक. कर्म अधिक तेवढे मन अशांत. ह्या उलट कामना कमी, विचार कमी, कर्म कमी, मन शांत आणि म्हणून शाश्वत शांतता प्राप्त करायची असेल तर कामनांचा त्याग करावा लागेल. बाह्य विषयवस्तुवर अवलंबून नसणारे पूर्ण समाधान व आनंदाची प्राप्ती करुन घेणे हे जीवनाचे खरे ध्येय आहे. ही भावना जगल्या गेली पाहिजे. ह्यासाठी आवश्यकता आहे ती विवेकाची, समंजसपणाची, अंतर्मुख मनाची. आज मानवी जीवनातील अनेक आव्हानांपैकी भौतिक आव्हान हे सर्वात मोठे आव्हान आहे. पण त्या आव्हानाला उत्तर हे भारतीय तत्वज्ञानाकडे आहे. सामान्य जीवन हे शांतता आणि युध्द ह्यामध्ये खेळत आहे. जगाने दीर्घकाळ पुढे पुढे वाटचाल केली आहे. पण त्याचे वयोमान ठरविणे ह्याबाबत मानवाचे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. जगाची पुनर्रचना करण्याकरिता आपले जीवन समर्पण करणे हा अपयशी प्रयत्न आहे. रामराज्य जर निर्माण कायचे असेल तर चीरस्थायी असणारी आध्यात्मिक मूल्य मानवाला प्रत्यक्षात जगायला लावण्याची जरुरी आहे व त्याकरिता वेदांताच्या शिकवणुकीचा समान कार्यक्रम देणे आवश्यक आहे. तेव्हाच विनाश करण्याची हमी देणारे ॲटमबॉम्ब आणि जलप्रलय करण्याची खात्री देणारे हायड्रोजन बॉम्ब आपल्यासाठी एकत्र येऊन मुर्तीमंत आनंद शाी प्रदान करु शकतील. प्रत्येकाने स्वत:च्या स्वयं शिक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करायला हवा. जेव्हा शंभर लोक आणि ते आहेत तेथेच राहून सत्यतत्वाची अनुभूती प्राप्त करुन घेण्यासाठी आणि तसे जगण्यासाठी पुढे येतील तेव्हा तेच शंभर लोक जगाचा उध्दार करणारा तारणहारांचा संच होऊ शकतील. त्यांचे आध्यात्मिक सामर्थ्य हेच केवळ ॲटम व हायड्रोजन बॉम्ब ह्यांच्या भौतिक आव्हानाला एकमेव उत्तर होय. ह्यासाठी लालसा, लोभ, स्वार्थ, बहिर्मुख कामना, रक्तबंबाळ मूल्ये बदलायला हवीत व त्या ऐवजी प्रेम, दानशुरता, सहिष्णुता आणि अंतर्मुख ध्यान धारणा ही तेजस्वी मूल्ये अंगिकारायला हवी. आपल्यातील मूल्य दुर्बलता झुगारुन आपल्याला देवत्वापर्यंत उन्नत होता येते. हा मार्ग

आहे. World perfection through self perfection.

वरील संपूर्ण विवेचनाचा विचार केल्यास स्वामी चिन्मयानंदांनी शांतता आणि आनंद ह्या बाबी परस्परावलंबी मानल्या आहेत, हे लक्षात येते व शांतता व आनंद हे मानवी जीवनाचा गाभा आहेत पण ही शांती व हा आनंद केवळ बाह्य वस्तुवर अवलंबून नाही तर ही मानवी मनाची अवस्था आहे. ही अंतर्गत अवस्था आहे. आजच्या अत्यंत धकाधकीच्या काळात मानवाने ही शांतता व आनंद गमावला आहे व तो सातत्याने त्याचा शोध बाह्य जगात घेत असतो. पण बाह्य जगाकडून नित्य व शाश्वत आनंद प्राप्त होऊ शकत नाही. आजच्या भौतिक जगात हे फार मोठे आव्हान आहे. आजच्या हायड्रोजन बॉम्ब, ॲटमबॉम्बच्या युगात शांतता हे आव्हान आहे व हे आव्हान पेलण्याची क्षमता केवळ धर्मिक व आध्यात्मिकतेत व उच्च जीवन मूल्यामध्ये आहे.

N.C.F. 2005 मध्ये शांततेसाठी शिक्षण ह्या प्रकरणाचा अभ्यास केल्यास ह्या विचारांचे मूळ गुरुदेवांच्या विचारात आहे, ह्याची खात्री पटते. प्रकरण ३.८ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, ''असहिष्णुता, धर्मांधता, झगडे आणि वैमनस्याने ग्रस्त एका अपूर्व हिंसक काळात आपण जगतो आहोत. नैतिक व्यवहार शांतता आणि कल्याण ह्या मूल्यासमोर मोठी आव्हाने आहेत. जगभरातच नव्हे तर देशात अगदी स्थानिक पातळीवरही वाढत्या हिंसाचाराच्या व तो आणखी वाढावा असे वाटणाऱ्यांची संख्याही वाढत असलेल्या काळात राष्ट्रीय शालेय अभ्यासक्रमाच्या मसुद्याच्या आराखड्यामध्ये शांततेच्या शिक्षणासाठी नेमकी जागा व वेळ निश्चित करण्याची कधी नव्हे ती इतकी गरज निर्माण झाली आहे.''

व्यक्तिच्या शांतीच्या अवस्थेची आवश्यकता आज शिक्षण तज्ज्ञांनाही वाटते आहे आणि म्हणूनच National Core Group ने Education for Peace ही स्वतंत्र योजना शिक्षण क्षेत्राला दिली. ह्या योजनेचे मूळ भारतीय तत्वज्ञानाचे उपासक प.पु. गुरुदेव ह्यांच्या विचारात आपणास आढळते. शांतता प्रस्थापनेसाठी तेजस्वी मूल्य अंगिकारण्याचा मार्ग जो प.पु. गुरुदेवांनी सांगितला ह्याचेच प्रतिबिंब N.C.F. 2005 मध्ये पहावयास मिळते. मुलांच्या नैतिकतेचा विकास घडवून आणूनच ही शांतता प्रस्थापित करता येईल. मूल्य संस्कारात शिक्षकांची भूमिकाही महत्वाची मानण्यात आली आहे. गीतेमध्ये अर्जुनाची दृष्टी

बदलली व त्याचे मन शांत झाले परिणामी बाह्य संकटाबाबत त्याची भिती कमी होते व त्यातून त्याला आनंद प्राप्त झाला.

## जीवनातील दु:खापासून निवृत्ती :-

जीवनात आनंद प्राप्त करायचा असेल तर दु:खापासून त्याला निवृत्ती घ्यावी लागेल. ध्यान आणि जीवन ह्या पुस्तकात ह्याबाबत विवेचन करतांना गुरुदेवांनी आपले विचार मांडले आहेत. ते म्हणतात, ''संसारिक जीवन म्हणजे बंधने. भौतिक जीवन जगत असतांना माणूस किती विभत्स विषयासक्त आणि विकासवश झालेला दिसतो. त्याचे डोळे हे सदा दु:खाच्या वेदनेमुळे येणाऱ्या अश्रूंच्या पुराने डबडबलेले असतात. स्वत:च्या व्यक्तिगत अपूर्णतिशी झगडत असतांना झालेल्या श्रमांनी तो सतत घामाघुम झालेला असतो आणि त्याच्या कपाळावर असमाधानाच्या आठ्या पडलेल्या असतात. सतत भेडसावणाऱ्या विपत्तीच्या म्हणजेच मृत्युच्या सतत अस्तित्वात असलेल्या स्वत:च्या भीतीमुळे संभ्रमात पडलेला आणि विद्रुप केला गेलेला हा जीव संसारिक व्यथेत आणि दु:खात कंठीत असतो. व्यक्तिने बाह्य जगतात केलेली प्रत्येक क्रिया म्हणजे केवळ तिने आपल्याला स्वत:ला अधिक पूर्ण व्यक्त करण्याचा केलेला प्रयत्न होय. त्याची प्रत्येक उत्कंठा आणि संघर्ष, प्रत्येक कामना आणि कृती ह्याचा प्रत्येक विचार आणि शब्द हे त्याने स्वत:ची पूर्णावस्था पुन्हा प्राप्त करुन घेण्यासाठी नकळत केलेला प्रयत्न असतो. पण दु:खाची गोष्ट ही की अनिष्ट वस्तु व प्राणी असलेले हे जग अनंतत्वाचा शोध घेण्याचे क्षेत्र नसते आणि म्हणूनच तो आनंद मिळावा म्हणून निरंतर प्रयत्न करीतच असतो. संसारातील सर्व कर्म मग ते वैयक्तिक असो की सामुदायिक, ती मानवातील असो की प्राण्यामधील, त्याचा फक्त एकच हेतू असतो व तो म्हणजे आनंदाची प्राप्ती आणि दु:खाची निवृत्ती. दु:खाची ही धास्ती इतकी स्वाभाविक असते की, व्यक्तिसुध्दा ह्यापासून चुकत नाही. वेदनेतून सुटण्याचा एक मार्ग तो म्हणजे माझ्या ''मी पणाच्या'' जोखातून स्वत:ला मुक्त करुन घेणे व उच्चकोटीच्या अवस्थेची प्राप्ती करुन घेणे. ह्या उन्नयनीकरणामुळे शिवोहंम ही अनुभूती व्यक्तिला येते व तो बाह्य परिस्थितीच्या अतित होतो. त्यानंतर मात्र तो त्या परिस्थितीचा बळी घेत नाही व त्याला परिपूर्ण आनंदाची प्राप्ती होते. या ठिकाणी ते प्रश्न करतात, ''अर्थार्जन करणे, खर्च करणे, संचय करणे आणि ढकलणे, रडणे आणि ओरडणे, खोड्या अतृप्त कामना सफल प्रेम, फुकट

गेलेल्या भावना, धुळीस मिळविलेल्या अपेक्षा ह्या कंटाळवाण्या फेऱ्यात ढोंगी जीवनाचा तुम्हाला कंटाळा आला नाही का? अनिष्ठ संसारिक विषयवस्तुमध्ये अनंतत्व शोधण्याचा प्रयत्न तुम्ही किती काळ करणार आहात? थांबवा आपला शोध. तुमच्या भावना उद्रेकाला आवर घाला. तुमचे नैराश्य विसरुन जा. समचित्त व्हा! एकदा तरी जीवनाचा शोध घ्या. ह्या शोधामुळे तुमची दु:खे संपतील. ही दु:ख निवृत्ती म्हणजेच जीवन होय. आत्मतत्वाशी ऐक्य साधणे म्हणजेच जीवन होय. आपणच आपला लावलेला पुनर्शोध म्हणजे आपणास परमसुख शांती ज्ञान आणि प्रकाश ह्याकडे जाण्याचा मार्ग दाखवितो हेच आपले जीवन ध्येय आहे.''

वरील विवेचनावरुन लक्षात येते की, स्वत:ला स्वत:ची ओळख ते हा दु:ख निवृत्तीचा मार्ग आहे. ह्यालाच स्वत:बद्दलचा पुनर्बोध असेही म्हणता येईल. ह्या पुनर्बोधानंतर मानवाला स्वत:च्या खऱ्या स्वरुपाची ओळख होते व मानवाचे खरे स्वरुप हे आनंद स्वरुप आहे. ह्याबाबत जेव्हा त्याला अनुभूती येते तेव्हाच खऱ्या अर्थाने दु:खापासून मानवाची निवृत्ती होते. म्हणजेच स्वत:चा पुनर्शोध व ह्या पुनर्शोधातून झालेला स्वत:बाबतचा पुनर्बोध हे जीवनाचे परमध्येय आहे, असे प.पु. गुरुदेवांचे म्हणणे आहे. नवीन शिक्षणच्या अभ्यासक्रमाच्या आराखड्यात रविंद्रनाथ टागोरांच्या एका वाक्याचा समावेश करण्यात आला आहे. ते वाक्य असे की, आपण इतरांमधून स्वत:ला प्राप्त करतो तेव्हाचा आनंद हा सर्वश्रेष्ठ असतो.'' स्वत:बाबतचा हा पुनर्बोध हे ह्या अखिल जगताशी एक प्रकारची बांधिलकी प्रस्थापित करतो ही बाब मानवी विकासाकरिता महत्वाची ठरते.

## ईश्वरी जीवन प्राप्त करणे :-

ईश्वरी जीवनाची प्राप्ती करुन घेणे ह्याचा अर्थ उदात्त व दीव्य जीवनाची प्राप्ती करुन घेणे असा होतो. ध्यान आणि जीवन ह्या पुस्तकात प.पु. स्वामीजींनी ह्याबाबत पुढील विचार व्यक्त केले आहेत. ''प्रत्येक मर्त्य मानवात ज्ञानी मुक्ती मिळालेला मानव सुज्ञ रितीने वास करीत असतो. याप्रमाणे दुधात लोणी असते. त्याचप्रमाणे मानवात ईश्वरत्व असते. बुध्दीमान चिंतकाला इंद्रीय विषयाच्या बाह्य जीवनाची मोहकता जेव्हा वाटेनाशी होते तेव्हा दही धुसळविण्यासाठी तयार असते. दिव्य जीवन हे व्यक्तीचे अपूर्णत्वाचे जीवन घुसळून ते त्याच्याकरिता लोणी म्हणजेच सारतत्व बाहेर काढतो. The devine life is a systematic

way of living certain noble values of head and heart. It is a steady process of renouncing the negative values of the material life now being lived and accepting the possitive values of devine life. हे दिव्य जीवन जगूनच प्राप्त करता येईल? ह्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे हे दिव्य जीवन जगूनच प्राप्त होईल. ह्यासाठी Start by Starting हा सिध्दांत गुरुदेवांनी सांगितला आहे. ह्यासाठी मन आणि बुध्दी ह्यापासून विरक्त राहून स्वत:कडे पहावे लागेल.''

प्रत्येक व्यक्तिमत्वात दिव्यत्व असतेच पण त्याचे भान व्यक्तिला नसते हे भान त्याला येण्यासाठी त्याला स्वत:मधील साक्षीभाव वाढवावा लागेल. स्वत:ला स्वत:कडे तटस्थवृत्तीने पाहिल्याशिवाय आपल्यातील दिव्यत्वाची ओळख आपल्याला होणार नाही. पण त्यासाठी अंतर्मुखतेकडे मानवाला वळावे लागेल हे जीवनाचे ध्येय आहे.

## योग्य मार्गाची निवड करणे :-

योग्य मार्गाची निवड करता येणे हे मानवाचे महत्वाचे असे जीवन ध्येय आहे. ''जीवनज्योत'' ह्या पुस्तकात प.पु. गुरुदेवांनी नमूद केले आहे की, ''जीवनात सुस्पष्ट व स्वतंत्र असे दोन मार्ग असतात. सुखाचा मार्ग प्रेयस व कल्याणाचा मार्ग श्रेयस. जीवनात प्रत्येक क्षणी मानवाला एकच मार्ग निवडणे भाग पडते. सुखाचा मार्ग त्याला सुखावतो, आकर्षित करतो आणि त्याच मार्गाने जाण्यास भुरळ पाडीत असतो. ह्या उलट निकोप धर्माज्ञा आणि धर्म प्रतिबंध ह्यावर आधारलेला कल्याणाच्या मार्गाला मानवाचे मन विरोध करीत असते. सुखाचा मार्ग हा मानवाला तात्कालिक आत्मतृप्ती प्राप्त करुन देत असतो. पण अंती मात्र तीव्र दु:ख आणि निराशा त्याच्या पदरी पडते. ह्या उलट श्रेयस मार्गाचा सुरवातीला तिरस्कार केला जातो. परंतु त्यानंतर तो अधिक श्रेष्ठ सुखाप्रत व कृतकृत्यतेला भावनेप्रत घेऊन जातो. चंचल मन हे प्रेयसाचा मार्ग निवडते. पण निश्चयी आणि विवेकी पुरुष योग्य श्रेयसाच्या मार्गाची निवड करतात आणि मानवजातीला शाश्वत शांती व सुखाप्रत घेऊन जातात.''

अखिल मानव जातीसमोर हा प्रश्न नेहमी पडतो. त्याच्या समोर नेहमी दोन मार्ग असतात. श्रेयसाचा व प्रेयसाचा. सर्वसामान्य व्यक्ती ह्यापैकी प्रेयसाचा अर्थात क्षणिक

सुखाचा मार्ग निवडतो व अंती दु:खी होतो. पण श्रेयसाचा मार्ग व प्रेयसाचा मार्ग ह्याच्यात विवेक करण्याची पात्रता व्यक्तिमध्ये येणे आवश्यक असते. श्रेयसाचा मार्ग निवडणाऱ्या व्यक्ती आपले जीवन शांती व सुखाप्रत नेतात. ही निवड करण्याची पात्रता अंगी येणे व त्यानुसार मार्गाची निवड करणे हे जीवनाचे महत्वाचे ध्येय आहे.

## व्यक्तिमत्वाचे पुनर्वसन :-

जीवन ध्येयाचा विचार करीत असतांना व्यक्तिमत्वाच्या पुनर्वसनाचा एक आगळा वेगळा विचार मांडला आहे. ''जीवनज्योत'' मध्ये प.पु. गुरुदेव म्हणतात, ''मानवाचे व्यक्तिमत्व हे चार स्तरांनी बनलेले असते हे चार स्त म्हणजे शरीर, मन, बुध्दी आणि जाणीवतत्व. ह्यापैकी मन आणि बुध्दी हे उपकरण अनुभावक असतात. ही उपकरणे जेव्हा सुरेल असतात. अर्थात ह्या उपकरणांचा जेव्हा समतोल विकास झालेला असतो. तेव्हा मानवी जीवनात सुसंवाद निर्माण होतो. मानवी देहाची रुप, आकार व्यक्तिपरत्वे बदलतात पण त्याच्यातील मूलभूत घटक व सूक्ष्म घटक ही सारखीच असतात. मानवातील न बदलणारा घटक म्हणजे मन आणि बुध्दी. आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण ही दोन घटक उपयोगात आणत असतो. पण दुर्दैवाने आज जगामध्ये मानवाच्या व्यक्तिमत्वातील हा महत्वाचा भाग दुर्लक्षित राहिल्यामुळे तो सडून जात आहे आणि म्हणूनच मानवाचे अध:पतन होत आहे. परिणामी समाजतही गोंधळ निर्माण होत आहे. मन आणि बुदीची गुणवत्ता आणि त्याचा पोत यावरुन त्यांचे व्यक्तिमत्व निश्चित होते. मनाचे संस्करण करुन आणि बुध्दीचे प्रबोधन करुन व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये उन्नती घडवून आणता येते. हा बदल घडवून आणून मानव आपल्या मनाचा दर्जा सुधारतो. सूक्ष्मतर विवेक विकसित करतो व स्वत: बाह्या जगाशी अधिक सुसंवादी संबंध ठेवू शकतो. हेच व्यक्तिमत्वाचे पुनर्वसन होय. हे पुनर्वसन करण्यसाठी मात्र त्याने आंतरउपकरणाचे स्वरुप व मानवाच्या शरीर संस्थेत त्याचे स्थान व त्याची कार्य ह्याचा अभ्यास करणे व त्याचे आकलन करणे गरजेचे आहे. आज मात्र मन आणि बुध्दीची फारकत झाल्याचे आपल्या लक्षात येते आणि म्हणूनच आपल्या कृतीमध्ये विवेकपूर्ण व विचारपूर्वक कृतीची निवड असत नाही. आपल्या मनाच्या लहरी व भावनांचे आभास ह्यावर अवलंबून असलेल्या कृती आपल्या कल्याणास व उत्कर्षास घातक ठरतात. ही मानवाची

अधोगती आहे. मानवी व्यक्तिमत्वाचे पुनवर्सन (Rehabilitation of Personality) व पुनर्व्यवस्थापन (Readjustment of Personality) करण्यात तत्वज्ञानाचे मोलाचे सहकार्य मिळते. जगाशी निकोप संबंध राखता यावा ह्यासाठी मन आणि बुध्दी निकोप राखणे आवश्यक आहे. व्यक्तिमत्वाची पुनर्रचना (Rearrangement of Personality) हा मानवाच्या क्रांतीसाठी तसेच उत्कर्ष व शांती मिळविण्याचा उपाय आहे. राष्ट्राच्या प्रगतीसाठी हा मार्ग अतिशय मोलाचा आहे. कारण राष्ट्र ज्याचे बनलेले असते त्या व्यक्तींकडूनच राष्ट्राची उभारणी होत असते. आणि जेव्हा समाजातील व राष्ट्रातील प्रत्येक धर्मग्रंथात निर्देशित केलेल्या मार्गांनी ती व्यक्ती प्रयत्न करते व आपल्या व्यक्तिमत्वाची पुनर्रचना करते तेव्हा प्रत्येकासाठी व सर्वांसाठी शांतीची व किर्तीची पखरण करीत तो समाज व ते राष्ट्र झपाट्याने भरभराटीला येते. म्हणून व्यक्तिमत्वाची पुनर्बांधणी ही राष्ट्राची पुनर्बांधणी आहे.''

स्वामी चिन्मयानंदांच्या जीवन विषयक ध्येयात जीवनाचे ध्येय व राष्ट्रीय ध्येय ह्यात समन्वय आढळतो. व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकसनाच्या ह्या उद्दिष्टात प्रामुख्याने पुढील नावीण्यपूर्ण संकल्पना प.पु. गुरुदेवांनी मांडल्या आहेत व त्यावर विस्तृत विवेचनही केले आहे त्या म्हणजे -

* Rehabilitation of Personality
* Readjustment of Personality
* Rearrangement of Personality
* Rebuilding of Personality (Reorganization)

व्यक्तिमत्वाची ही पुनर्बांधणी, पुनर्रचना, पुनर्वसन, पुनर्समायोजन हे राष्ट्राच्या विकासाकरिता ह्या दृष्टिकोनातून मांडण्यता आला आहे.

आजच्या शिक्षण पध्दतीचा विचार केल्यास आज बालकांचे मन व बुध्दी ही शिक्षणातून दुर्लक्षित झाली आहे. वास्तविक शारीरिक, मानसिक, बौध्दिक विकास ह्याचा विचार जरी आधुनिक शिक्षणप्रणालीत झाला असला तरी बालकांचे मन दुर्लक्षित आहे. सदर मनाची निर्मिती आजच्या शिक्षणप्रणालीतून होत नाही. वास्तविक N.C.F. 2005 मध्ये नमुद

कण्यात आले आहे की, ''अभ्यासक्रमाने केवळ सांस्कृतिक विविधतेचाच नव्हे तर मुलांच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचा त्याच्या शारीरिक, मानसिक, बैध्दिक वैशिष्ट्यांचा व वेगळेपणाचा विचार करायला हवा.'' बालकांचा बौध्दिक विकास होतो पण त्यांच्यात विवेकशक्ती रहात नाही. मानसिक विकास व भावनिक विकास हा दुर्लक्षित राहिल्यामुळे आज बालकाचा सर्वांगीण विकास होतांना आपल्याला आढळत नाही.

## व्यक्तिमत्वाचा समतोल साधणे :-

व्यक्तिमत्वाचा विकास हा महत्वाचा आहेच पण त्या सोबत ह्या विकासातील समतोल हा महत्वाचा आहे. ह्याबात प.पु. गुरुदेव म्हणतात, ''बाह्य जगात मानवाला प्राणीमात्रांशी झगडावे लागते. शिवाय अंतर्मनात आपण अनेक वासनांचे गुलाम झालेले असतो. बाह्य दबाव व आंतरिक गोंधळ ह्यामुळे मानव सतत तणावाखाली असतो. शिवाय बाह्य आव्हाने मानवाला व्यथित करुन सोडतात. आपण अशा पध्दतीने जीवन व्यथित करीत राहिलो तर व्यक्तिमत्व हे अनेक तुकड्यात विभाजीत होईल. आपल्या मनात तिरस्कार उत्पन्न करणाऱ्या अनेक परिस्थितीला आपल्याला तोंड द्यावे लागते व ह्यातूनच उपाय शोधण्याचा मार्ग आपण पाहू लागतो. अंत:करणाचा दाह करणारे हे निषेध आणि संताप हे आपले व्यक्तिमत्व दुबळे बनवितात. ह्या आंतरिक दुबळेपणामुळे बाह्य आव्हाने अधिक बलशाली बनतात. म्हणजेच आव्हानांना तोंड देण्यापेक्षा त्यांच्याशी मुकाबला करण्यापेक्षा आपण स्वत:ला अधिक दुबळे बनवित असतो व आपण बाह्य आव्हानांना आपणास चिरडून टाकण्याची संधी देत असतो. आपला सत्यानाश करण्याची आपण संधी देतो. पण ही परिस्थिती येण्यापूर्वीच आपण आपले आंतरिक सामर्थ्य वाढवायला हवे. ह्यासाठी परिस्थितीशी सुसंवाद साधावा लागेल. मानवी मनाला अधिक व्यापक बनवावे लागेल. सर्वात्मक दृष्टी विकसित करावी लागेल. अशीही दृष्टी विकसित झाली की मानवाला आपल्या समस्या क्षुद्र वाटू लागतील. कारण जोपर्यंत मानव आपल्या समस्यांकडे अहंकेंद्रीत व वैयक्तिक दृष्टिकोनातून पाहते तोवर त्याच्या समस्या ह्या विशाल बनतात. पण जेव्हा समष्टीच्या दृष्टिकोनातून तो ही समस्या पाहतो तेव्हा त्याचे स्वरुप क्षुद्र बनते आणि म्हणूनच बाह्य जगाचा स्विकार हे महत्वाचे आहे. बाह्य जगाशी सुसंवाद राखवा लागेल म्हणजेच आपल्यासमोर उभ्या असणाऱ्या आव्हानांचा स्विकार करणे हा

सुसंवाद करुनच व्यक्तिमत्वाचा समतोल निर्माण करावा लागेल.''

आज आपण पाहतो जीवनाच्या प्रत्येक पावलागणिक व्यक्तिंना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. अनेक अशा घटनांना सामोरे जावे लागते. ज्या घटनांमुळे व्यक्ती व्यथित होते अथवा ज्या घटना व्यक्तिच्या मनाविरुध्द घडणाऱ्या असतात. पण आा आव्हानांना सामोरे जाण्यातच व ही आव्हाने स्विकारण्यातच खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्वाचा समतोल राखला जातो. ही आव्हाने स्विकारायलाच आज माणूस कमी पडतो आहे. ह्या आव्हानांना सामोरे जातांना व्यक्तिमध्ये सामाजिकतेचीही जोपासना होत असते. व्यक्तिचा सामाजिक कार्यातील सहभाग वाढवावयास मदत होते. व्यक्तिमत्वातील हा समतोल त्यातून साध्य होतो. व्यक्तिमत्वाच्या समतोलातून व्यक्तिचे सामाजिक सहभागीत्व वाढविण्यावर N.C.F. ने भर दिला आहे.

## पूर्णत्वाची योजना पूर्णतेस नेणे :-

''हे जीवनाचे भव्य ध्येय असावे. आपण जेव्हा निसर्गसृष्टीकडे पाहू लागतो तेव्हा आपल्या लक्षात येते की, नामरुपासंबंधी आपापल्या वरवरच्या कल्पना ह्यांचा मूल्याबाबतचा गोंधळ आणि जीवन समस्यांची गुंतागुंत त्यांच्यामागे स्वत:च्या पूर्तीसाठी एखादी योजना शांतपणे काम करीत असली पाहिजे. उत्क्रांतीच्या अत्यंत खालच्या दर्जापासून ते थेट विकसित दर्जापर्यंत प्रत्येक टप्प्यावर जाणीवेचा वाढता आविष्कार लक्षात येतो. आणि म्हणूनच तोच आविष्कार प्राप्त करुन घेणे हे जर शक्य असेल तर ते जीवनाचे शांततामय व परिपूर्ण गतिमान व दिव्य ध्येय असावे.

## आंतरिक व्यक्तिमत्वाचा विकास :-

मानवी व्यक्तिमत्वाचा विस्तृत व्यापक सखोल विचार प.पु. गुरुदेवांनी केला आहे. त्याचा उल्लेख स्वतंत्र प्रकरणात देण्यात आला आहे. पण व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे. पण हे व्यक्तिमत्व आंतरिक व्यक्तिमत्व होय. कारण Secret of Action ह्या पुस्तकात ते म्हणतात, ''मानव हा मन आणि बुध्दीच्या माध्यमातून बाह्य जगाच्या संपर्कात येतो. ही उपकरणे जर Defective असतील तर बाह्य वस्तुपासून सुख व शांतता प्राप्त होऊ शकणार नाही. म्हणून मानवाची Inner Personality उत्क्रांत

होणे आवश्यक आहे व ह्यासाठी, "The mind and intellect of individuals have to be regulated disciplined and perfected." कारण मानवाचे व्यक्तिमत्व हे मन आणि बुध्दीच्या गुणवत्तेवर अवलंबून असेल मनाला ताळ्यावर आणून व बुध्दीला शिक्षित करुन मानवाचे व्यक्तिमत्व विकसित होवू शकेल. मानवी व्यक्तिमत्वाचे अंतर्गत उपकरणे अर्थात मन, बुध्दी ही विकसित असेल तर बाह्य घटनांनी मानवाच्या मनाची शांतता व स्थैर्य टळत नाही. मानव आजही Rehabilitation of Personality ला महत्व देत नाही. तर Development and Beautiful of External World ला प्राधान्य देतो. धर्मात ह्याबाबतचे मार्गदर्शन आपणास आढळते.

## आत्म्याचे पुनर्शोधन :-

आत्म्याचे पुनर्शोधन हे जीवनाचे महत्वाचे ध्येय आहे. पण आत्म्याचे पुनर्शोधन केव्हा होते ह्याबाबत गीता अध्याय ६ मध्ये प.पु. गुरुदेवांनी सांगितले आहे की, "आपण भौतिक जग शारीरिक स्तरावरुन जाणतो. भावनांच्या स्तरावर आपण केवळ दुसऱ्यांच्या भावना समजून घेतो. त्याचप्रमाणे वैचारिक स्तरावरुन केवळ आपण दुसऱ्याच्या बुध्दीमध्ये चाललेले विचार योग्य प्रकारे जाणू शकतो. जेव्हा एखादा मनुष्य आपल्या बुध्दीच्या अतीत होतो तेव्हा त्याला आपल्या दिव्य स्वरुपाचे पुनर्शोधन होते आणि त्या आध्यात्मिकतेमधून तो पाहतो तेव्हा आत्मस्वरुपच सर्वत्र भरले आहे असे आपणास दिसून येते. आत्मस्वरुपाचा अनुभव आल्यानंतर योगी सर्वविश्व म्हणजे आपणच आहोत असे ओळखतो आणि मग स्वत:च्या उजव्या पायावर प्रेम करावे की करु नये असा प्रश्न जगामध्ये कुणालाही पडत नाही. स्वत:च्या शरीराचे प्रत्येक अवयव सर्वांना प्रिय असतात. कारण शरीरातील वेगवेगळ्या भागातील स्वत:च्या घनिष्ठ अनन्यत्वाचा त्याला सहजपणे अनुभव येत असतो. एकदा आत्मस्वरुपाची अनुभूती घेतल्यावर जेव्हा सर्वत्र मला माझेच अस्तित्व दिसू लागते तेव्हा नामरुपाचे हे विश्व माझ्या दृष्टीने एक संघरुप होते की, ज्यामध्ये सर्वस्थळी, सर्वकाळी केवळ मीच असतो असा व्यक्ती करुणामूर्ती बनतो तो समाजाकडून जेवढे घेतो त्यापेक्षा समाजाला तो अधिक परत देतो. जीवनात जेवढे कष्ट करतो त्याहून कितीतरी अधिक तो निर्माण करतो. प्रेम हा त्याचा प्राण व दया हे त्याचे जीवन असते. Education for Co-existance ह्या

आधुनिक विचाराशी हा विचार मिळताजुळता आहे.

शेवटी स्वत:मधील आत्मतत्वच हे अखिल सृष्टीमध्ये विद्यमान आहे. हा मानवाचा आत्मिक पुनर्शोध असतो आणि म्हणून तो स्वत: स्वत:ला विश्वरुप समजतो आणि मग ह्या विश्वाचे विविध घटक हे त्याचे अवयव बनतात. परिणामी आपल्या प्रत्येक अवयवावर निरातिशय प्रेम करणे हे त्याचे जीवित कार्य बनते. ज्ञानी मनुष्य परिपूर्ण होतो. तो केवळ त्याला आत्मतत्वाचे विशेष ज्ञान व त्याची अनुभूती असते. म्हणून नव्हे तर त्यामुळे सर्व स्तरावरील त्याचे जीवन व जगाशी येणारा संपर्क ह्यात त्यांचे परिपूर्ण एकसंघट व्यक्तिमत्व निर्माण होते म्हणून आणि म्हणूनच आत्म्याचे पुनर्शोधन व त्यातून व्यक्तिमत्वाची होणारी एक संघता हे मानवी जीवनाचे ध्येय आहे.

## आध्यात्मिक विकास :-

मानवाच्या जीवनाचे अंतिम ध्येय म्हणजे आध्यात्मिक विकास आहे. प्राचीन काळापासून ह्या ध्येयाला मान्यता मिळाली आहे नव्हे मानवाची जी आयुष्याची धडपड असते तीच स्वत:चे पूर्ण रुपाला प्राप्त करण्यासाठी ह्याबाबत ध्यान आणि जीवन ह्या पुस्तकात ह्याबाबत विस्तृत विवेचन केले आहे. ज्याप्रमाणे जीवनात सुबत्ता प्राप्त करायची असेल तर काही परिश्रम करावे लागतात. त्याशिवाय सुबत्ता आणि समृध्दी प्राप्त होत नाही त्याचप्रमाणे आध्यात्मिक उन्नती घडवून आणायची असेल तर काही स्थिर साधने लागतात व ही प्रमाणिक असायला हवीत. अनेक अनुभवातून वाटचाल केल्यावर मानवाला सर्वश्रेष्ठ सत्यत्वाची उत्कंठा वाटू लागते. जगाचे त्याला बरेच बरेवाईट अनुभव येतात जन्म जन्मांतरी हा जीवन अनेक अपेक्षा करतो व त्याच्या पूर्तीची वाट पहात असतांनाच त्याचा दु:खांत होतो. आप्तेष्ट त्याच्यावर अश्रृ ढाळतात, पुष्पहार टाकतात पण हे ढाळलेले अश्रृ व टाकलेले पुष्पहार त्याचा जीव परत आणण्यास असमर्थ ठरतात. हे असे सर्व अनुभव येत असतांनाच तो जीव हळूहळू विचार करण्याच्या उच्च टप्प्यापर्यंत विकसित होतो. मग त्याच्या मनात विविध प्रश्न निर्माण होतात. जीवन म्हणजे काय? माझा जन्म का झाला? माझ्या जीविताचे अंतिम ध्येय काय? जीवन म्हणजे केवळ जन्म आणि मृत्यु ह्या दोन अनिश्चित टोकामधील असफल धडपडीचे केवळ निष्फळ काल मध्यंतर आहे का? ह्याच ठिकाणी आपला मर्त्य जीव हा ईश्वरी जीवनाच्या

सुखद क्षेत्राच्या प्रवेशद्वारापाशी आला आहे, असे दिसते. आपल्या स्वार्थी निष्ठुरपणाच्या आणि कामना प्रेरित निचपणाच्या बेड्यातून तसेच लालसा आणि लोभ ह्याच्या दमछाक करणाऱ्या कचाट्यातून सुटका करुन घेणे म्हणजेच यथायोग्य वेळी सर्व प्राणीमात्रांच्या ऐक्य भावाची ओळख करुन देणारे जन्मजात स्वातंत्र्य आणि समाधान ह्यची पुनर्प्राप्ती करुन घेणे होय. दिव्य जीवनाच्या द्वारेच आध्यात्मिक विकास शक्य आहे. Devine life is a technique of self perfection. This recognition of self is a crowning victory of life. This is vision of God. ह्या अवस्थेत बाह्य जगातील द्वंद्व ही मानवाला स्पर्श करीत नाही, करु शकत नाही. ह्या अवस्थेत मानव हा Super Human झालेला असतो. "All power, all knowledge all capabilities are his.

''जीवनज्योत'' ह्या पुस्तकात ह्याच विचारांना अनुसरुन प.पु. गुरुदेवांनी विवेचन केले आहे की, ''मानव हा शारीरिक, मानसिक आणि बौध्दिक उपकरणांचा व त्याला प्रकाशित करणाऱ्या जाणीवतत्व ह्यांचा बनलेला आहे. मानव जेव्हा प्राकृतिक व्यक्तिमत्वाशी तादात्म्य साधतो तेव्हा तो शरीर धारण करणाराप्राणी म्हणून जगतो आणि तो नेहमी आपल्याला वैषैयिक समाधानाकरिता संपत्ती आाि जगातील विषयवस्तु मिळविण्यात, साठविण्यात स्वत:ला गुंतवून घेतो. पण शारीरिक स्तरावरील कामना ह्या कधीही न संपणाऱ्या असतात. आपण जेवढे त्याला रममाण व्हावे तेवढेच त्या दाटी करतात. म्हणूनच शरीराच्या स्तरावर राहणारा माणूस हा सदा विक्षेपीत व कामनांनी ग्रासलेला असतो. त्यापेक्षा वरचा स्तर म्हणजे भावनिक स्तर होय. भावनिक स्तरावर तादात्म्य पावलेला माणूस इतरांचे कल्याण व्हावे इतपत त्याच्या मनाचा विस्तार झालेला असतो. इतरांबद्दल बंधुत्व, प्रेमभावना ह्यापासून ह्याला उच्चतम समाधान प्राप्त होते. परिणामी वैषेयिक गरजा त्याच्यापासून माघार घेतात. मानवाचा जसजसा विकास होतो. तसतसा तो बुध्दीशी तादात्म्य पावतो व तसतसा त्याचा विवेक वाढीला लागतो. परिणामी भावना व तृष्णा ह्याचा त्याला विसर पडतो. पण जाणीवतत्व हा मानवाचा गाभा आहे. त्याच्या भोवती शरीराच्या मनाच्या आणि बुध्दीच्या कृती फिरत असतात. ते चक्राच्या आसाप्रमाणे स्थिर राहते. पण सर्व बदल व हालचाली घडवून आणते तेव्हा ह्या जाणीव तत्वाशी ते एकरुप होतो. त्यानंतर मात्र इंद्रीयजन्य बोध, भावना आणि विचार ह्याच्या

बदलत्या चमत्कारांनी तो दबून जात नाही व तो स्वत:वर प्रभुत्व प्राप्त करतो. ह्या जाणीवतत्वाला ओळखणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे.

मानवाला येणाऱ्या प्रत्येक अनुभवामध्ये ही चार व्यक्तिमत्वे असतात व आपल्याला अधिकाधिक सूक्ष्म व्यक्तिमत्वाच्या प्राप्ती करता मानव स्थुल व्यक्तिमत्वाचा त्याग करावयास तयार असतो. मानसिक समाधानाच्या प्राप्तीसाठी तो काहीही करावयास तयार असतो. व्यक्तिमत्व जेवढे सूक्ष्म तेवढे त्याचे समाधान अधिक. आपल्यातील सूक्ष्मतर व्यक्तिमत्वाशी तादात्म्य होतांना आपण सहजपणे स्थूलवर व्यक्तिमत्वाचे जगत व त्याची सुखदु:खे ह्याच्या अतीत जात असतो. शारिरीकदृष्ट्या आरोग्य संपन्न मनाने आनंदी बुध्दीने, तिक्ष्ण आणि आर्थिकदृष्ट्या स्थिर असा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न आजवर धर्मवित्यांनी केला आहे.

मानवी जीवनात विकासाकडे वाटचाल महत्वाची असते. स्थुलाकडून सूक्ष्माकडे वाटचाल महत्वाची असते. मानवाची आपल्या ज्या व्यक्तिमत्वाशी तादात्म्यता होते त्याप्रमाणे त्याची कृती घडते व जसजसा तो सूक्ष्माकडे वाटचाल करतो. तसतसा तो स्थुलाचा त्याग करायला मागेपुढे पहात नाही. देशासाठी प्राणाचे बलीदान देणाऱ्या सैनिकांप्रमाणे तो उदात्त ध्येयाला आपलेसे करतो. हा त्याचा खराविकास आहे. खरा सुशिक्षित माणूस हा आपले संस्कार कधीच विसरत नाही. ते या व्यक्तिमत्वाचा एक भाग बनते आणि त्याचा प्रत्येक विचार शब्द व कृती ह्यामध्ये त्याच्यामधील संस्काराचा सुगंध आणते. त्याचप्रमाणे आपल्या दिव्य स्वरुपाची जाणीव असलेला मनुय जगामध्ये श्रेष्ठ मानव म्हणून (Master Mind) वावरु शकतो. त्याच्या सर्व कृती निस्वार्थपणे ओथंबलेल्या असतील. त्याचे सर्व विचार प्रेमाने सुगंधीत झाले असतील. त्याच्या भावना दयेमध्ये परिपक्व झाल्या असतील. व्यक्ती जेव्हा समाजाने त्याच्याकडून अपेक्षिलेली योग्य कर्तव्ये पूर्ण करते तेव्हा ती समाजाचा प्रामाणिक घटक म्हणून रहात नाही तर सांस्कृतिक दृष्ट्या ती विकसित होते आणि शेवटी आपल्या आध्यात्मिक स्तरापर्यंत, शिखरापर्यंत झेप घेऊ शकते.

जीवनाची ध्येये ही कशी यशस्वी होतील ह्याबाबत गुरुदेवांनी गीता अध्याय क्र. २ मध्ये मार्गदर्शन केले आहे. ते म्हणतात, “कोणत्याही उद्योगात मनुष्य जर आपले आत्म इच्छित विचार ध्येयाच्या एकाग्रतेने व सतत आणू शकत असेल तर तो खात्रीने यशस्वी होईल.

परंतु दुर्दैवाने सामान्य मनुष्य त्याचे विचार यशस्वीरित्या विचाराच्या एकाच चाकोरीत ठेवू शकत नाही. म्हणून त्याचे ध्येय दूर जात असल्यासारखे व डळमळीत झाल्यासारखे वाटते. ध्येय सदा बदलत असल्याने ते गाठण्याचा त्याचा निश्चयही बदलत असतो. अशा अनिश्चयी मनुष्याची केणत्याही उद्योगाच्या मार्गात कधीही प्रगती होणे शक्य नाही. केवळ विचारच निर्मिती करु शकतात नुसती कृती नाही हे उघड सत्य आपण दुर्लक्षित करतो हीच ह्या युगाची सर्वात मोठी शोकांतिक असावी असे आपणास दिसते. पोषण देणाऱ्या विचारशक्तीपासून कृतींना सामर्थ्य मिळत असते. पोषण देणारी शक्ती जेव्हा गुदमरते व क्षीण होते. तेव्हा बाहेरच्या कृतींना कार्यान्वित करणारी शक्तीही सामर्थ्य आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीने कमजोर होते. एकाग्रमनात उत्पन्न होणारे व्यक्तीने स्वत:च्या जीवनात स्वत:साठी निवडलेले निश्चित ध्येय प्राप्त करण्यासाठी तिने एकाग्र चित्ताने केलेले विचार पूर्ण महत्वाकांक्षा उत्साह आणि जोम ह्यामधून ते अखंड वाहू दिले पाहिजे.

## आत्मप्रभुत्व प्राप्त करणे (Self Mastery) :–

प.पु. गुरुदेवांनी ह्या ध्येयाचे वर्णन ध्यान आणि जीवन ह्या पुस्तकात अतिशय उत्कृष्टपणे केले आहे. हे करित असतांना सर्वप्रथम सर्व तत्वज्ञानाचा सार एका शब्दात सुंदर पध्दतीने विवेचित केला तो म्हणजे, ‘‘ज्या कोणीही व्यक्तिने स्वत:वर स्वामित्व मिळविले आहे ती व्यक्ती बाह्य जगावर स्वामित्व मिळविते.’’ पण आज परिस्थिती अशी आहे की, माणूस स्वत: भोगाचा दास बनला आहे. परिणामी तो बाह्य आव्हानांना तोंड देण्यास असमर्थ ठरत आहे. आयुष्यातील अनुभवांना तो समर्थपणे हुंकार देऊ शकत नाही. त्यामुळे तो ह्या जीवनप्रवाहात वहावत जातो. पण स्त:वर स्वामित्व असणारे जीवन जगण्यास जर आपणास कोणी शिकवित असेल तर तो म्हणजे धर्म प.पु. गुरुदेव म्हणतात, ‘‘ज्या व्यक्तिने स्वत:वर स्वामित्व मिळविले आहे ती व्यक्ती ह्या जगतातील जीवंत संस्था आहे. हे आत्मप्रभुत्व मानवाला परिस्थितीच्या गुलामगिरीतून मुक्ती देते आणि नंतर त्याला कधीही अपयश किंवा दु:ख ह्याचे फटकारे बसत नाही.’’ ह्या आत्मप्रभुत्वाने तो जणू शरीराच्या पातळीच्याही वर असलेल्या सत्ता आणि ज्ञान ह्यांच्या उदात्त उंचीवर चढतो व शांती व समाधान उपभोगतो. ज्याने हे आत्मप्रभुत्व मिळविले आहे तो परमसुखाच्या समृध्द प्रदेशात प्रवेश करतो. आजच्या

युगात विपत्ती आणि मनाची प्रक्षुब्धता ही मानवाच्या अंगवळणी पडली आहे आणि म्हणून आधुनिक माणूस खिन्नतेने स्वत:च्या अवस्थेबद्दल शोक करीत असतो. तेव्हा तो आत्मप्रभुत्वाचा मार्ग स्विकारण्यास धजावत नाही.

गुरुदेवांना जे आत्मप्रभुत्व अपेक्षित आहे. ते म्हणजे संपादीत अवस्था होय. ही अवस्था म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' मानवाची ही शक्ती म्हणजे एक प्रकारचे त्याचे empowerment आहे. अशी शक्ती जी व्यक्ती प्राप्त करतो तोच बाह्य जगावर विजय प्राप्त करु शकतो. मात्र बाह्य विपत्तीचे चटके त्याला बसत नाहीत. शरीराला मनाच्या बुध्दीच्या पातळीवरील विकार संपुष्टात येतात व तो अनुपम आनंदाची अनुभूती प्राप्त करतो. गुरुदेवांचे हे विचार आजच्या भौतिक युगात अतिशय मार्गदर्शक ठरतात. हे आत्मप्रभुत्व प्राप्त करण्याची पध्दती मानवाला जीवनापासून पलायन करावयास शिकवित नाही तर जीवनातील परिस्थितीतूनच जीवनाचा मार्ग सुबुध्दपणे चोखाळावयास सांगते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सतत परिवर्तने होत असतात. अनेक आव्हाने नित्य मानवासमोर येत असतात. ह्या आव्हानांचा मानवाने उपयोग करुन घेतला पाहिजे आणि स्वत:वर व बाह्य जगावर प्रभुत्व संपादन करावयास शिकले पाहिजे.

हे आत्मप्रभुत्व कसे संपादन करायचे ह्याचेही उत्कृष्ट विवेचन प.पु. गुरुदेवांनी ह्याच पुस्तकात पृष्ठ क्र. १३ वर केले आहे. ते म्हणतात, ''बाह्य जगाचा अनुभव आपण जरी आपल्या शरीरामार्फत करीत असलो तरी आपल्या प्रत्येकातील अनुभव घेणारे खरोखरी आपले मन आणि बुध्दी यांचे उपकरण होय. दृष्टीतील दोष आपण काढून टाकू शकलो तरच त्याच काचातून बाह्य जगाचे अधिक चांगले आपणास दिसणे शक्य होईल. मन आणि बुध्दी यांना तंतोतंत ठेवणाऱ्या परिस्थितीत योग्य ते वर्तन करावयास लावण्याची आपण चांगली शिस्त लावली तरच बाह्य जगतात आपण अनुभवीत असलेल्या दोषात आपणाला मूलभूत सुधारणा घडवून आणता येईल. म्हणूनच स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणण्याकरिता योजिलेल्या सर्व तंत्राचा रोख आपल्यामधील मानसिक आणि बौध्दिक व्यक्ती भावना बळकटी आणण्याकडे आणि त्यांना शिस्त लावण्याकडे असला पाहिजे.

## मानवी जीवन म्हणजे काय? :-

मानवी जीवनाचे महत्वाचे ध्येय हे उत्क्रांत होणे हे आहे. प.पु. गुरुदेवांनी मानवी जीवनातील परिभाषा करतांना म्हटले आहे की, "जीवन म्हणजे विशिष्ट हेतु उत्कृष्ट विविधता आणि कठोर तर्कपध्दती यांची सातत्याने होणारी अशी प्रक्रिया होय. आपण प्रत्येक जण आज जगत असलेले जीवन हे ज्याला काही स्वतंत्र कारण आहे असे - मग ते कारण आपल्याला अवगत नसले तरी कार्य आहे. आपले सांप्रत जीवन म्हणजे आपल्या शाश्वत अस्तित्वामधील घडणाऱ्या असंख्य घटनांपैकी एक असते. डार्विनने उत्क्रांती प्रक्रियेचा अंतिम कळस म्हणून अतमानवाच्या पिढीची कल्पना केली होती. त्याच प्रमाणे अनेक आव्हांनाच्या मालीकेने भरलेले जे जीवन जगायचे ते स्वत:ला अतिमानवाची अवस्था प्राप्त होईपर्यंत उत्क्रांत होत राहण्याकरिता जगायचे असते.

कठोपनिपदावर भाष्य करतांना प.पु. गुरुदेवांनी जीवनाबाबतचे सुरेख विवेचन केले आहे. ते म्हणतात, "जीवन म्हणजे आव्हानांची एक मालीकाच होय." करु की करु नको ह्या प्रश्न चिन्हाला आपल्याला क्षणाक्षणाला तोंड द्यावे लागते. प्रलोभणे एकापाठोपाठ अशी आपल्याकडे येत असतात. भविष्य वर्तमान होते आणि तो आपल्याला सपाट करीत आपल्यावरुन अनादी अशा भूतकाळात विलीन होण्यासाठी निघून जातो. आपली बुध्दीमत्ता आणि विवेक शक्ती ह्यांना प्रत्येक क्षणाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करण्यासाठी आणि वस्तु व प्राणीमात्र ह्यांचा निर्णय देण्यासाठी पाचारण केले जाते. भौतिक वस्तु मर्यादित असल्यामुळे त्या क्षणभर सुध्दा तशाच राहू शकत नाही आणि असे असल्यामुळे त्यांचा जुळणीने विविध आकृतीबंध नित्याने निर्माण होत असतात. ह्या सतत बदलत जाणाऱ्या घडणीच्या संदर्भात मानवासारख्या विचारशील प्राण्याला जीवनाशी असलेले त्याचे नाते निश्चित करण्यासाठी आणि ते तसे राखण्यासाठी स्वतंत्रपणे प्रतिक्षणी नवे निर्णय घेण्यासाठी आवाहन केले जाते.

मानवाच्या उत्क्रांती विषयक ध्येयाचे विवेचन इशावास्य उपनिषदाचे विवेचन करीत असतांना प.पु. गुरुदेवांनी पुढील शब्दात केले आहे. "डार्विनच्या दृष्टीने प्रत्येक प्राणीमात्राने प्रकट केलेली बुध्दी आणि त्याच्या देह रचनेची परिपूर्णता हेच उत्क्रांतीचे मोजमाप होते तर उपनिषदातील आध्यात्मिक महात्म्यांच्या दृष्टीने त्याच्या शारीरिक आणि मानसिक

उपकरणाच्या द्वारा व्यक्त होणाऱ्या शक्तीचे परिणाम ही उत्क्रांतीची मोजपट्टी होती. वेदांत तत्वज्ञानात आचार्यांनी अश्म मानव सोडून बाकी सर्व मानवाचे तीन प्रकार कल्पिले आहेत. १) पशु मानव, २) मनुष्य मानव, ३) अतिमानव.

पशुमानवाचा टप्पा म्हणजे अत्यंत क्षीण ज्ञानाचा मंद व असंवेदनक्षम टप्पा होय आणि ह्या टप्प्यावरील लोक म्हणजे गुलाम. आपदग्रस्त विषयी, तत्वहीन व नास्तिक होत. त्यांच्या दृष्टीने धर्म आणि आध्यात्मिक साधना यांना काही अर्थ नसतो. त्यांच्यापैकी काहीजण भिन्नतेच्या म्हणजे लगेच पुढच्या म्हणजे मनुष्य मानवाच्या उच्चतर टप्प्यापर्यंत उत्क्रांत होतात. या प्रकारच्या मानवास आध्यात्मिक जीवन जगण्यास पात्र समजण्यात येते. मनुष्य मानवापासून अति मानवापर्यंत उत्क्रांत होण्याकरिता वेदांतात काही शास्त्रीय मार्ग आहेत. ज्यायोगे पशु मानवाचे मनुष्य मानवाच्या टप्प्यापर्यंत विकसन होऊ शकेल अशा भरपूर साधना जगातील सर्व धर्माच्या मूलभूत कर्मकांडामध्ये दिलेल्या असतात. विवेक नैतिक आणि धार्मिक सदाचार अनासक्ती उच्चतर ध्यानसाधना यासारख्या धर्माच्या उच्चतर अभ्यासात आपल्याला सर्वकष योजना मिळते की जीचा अंगीकार केल्याने ती व्यक्ती मनुष्य मानवाच्या टप्प्यापासून अतिमानवाच्या टप्प्यापर्यंत स्वत:ची उत्क्रांती जाणीवपूर्वक त्वरेने करु शकते. हे मानवी जीवनाचे ध्येय आहे.

ह्या ठिकाणी मानव म्हणून जन्माला आल्यानंतर स्वत:चा विकास मानवाने करुन घ्यावा हे अपेक्षित आहे. ह्याकरिता जो मार्ग आहे तो सांगतांना प.पु. गुरुदेव म्हणतात, ''हत्या करा, लुटमार करा, चोरी करा; पण स्वत:चे अस्तित्व टिकावा.'' हा नीचतर प्राणी साम्राज्यातील जीवमात्रांचा जीवंत राहण्याचा नियम असतो. परंतु मनुष्य योनीत जन्माला आल्यानंतर निसर्ग त्याला सांगत असतो, ''तो पशु जीवनच जर जगत राहिला तर तो अधिक उत्क्रांत होऊ शकणार नाही''. सहज प्रवृत्तीशी संघर्ष करा, तु लुटमार करता नये, तू हत्या करता नये, तू चोरी करता नये! बेहत्तर! मृत्युच्या द्वारी आलास तरी! मुकाटपणे नव्हे तर शौर्याने ते सहन कर! तरीही प्रेम सहिष्णुता, दयाळुपणा, करुणा इ. उच्चतर जीवनमूल्ये तू सोडू नकोस.'' हाच तो मार्ग ज्यामधून मानव आपल्या पुरुषार्थाच्या साम्राज्यात शिरु शकेल आणि अतिमानवत्वाची शांती आणि आनंद यावर हक्क सांगू शकेल.''

डार्विनने जी अतिमानवाची संकल्पना मांडली पण त्याचे प्रात्यक्षिकरण प.पु. गुरुदेवांच्या विचारात पहावयास मिळते. पण हे अतिमानवत्व मानवाला सूक्ष्मतेत शिरल्याशिवाय प्राप्त होऊ शकत नाही केवळ शारीरिक पातळीवरच मानव जेव्हा स्वत:चा विचार करतो तेव्हा तो पशुमानवाच्याच स्तरावर असतो पण अतिमानवत्वाकडे जाण्यासाठी त्याला आपल्या व्यक्तिमत्वाच्या गाभ्यापर्यंत जावे लागेल. म्हणजेच अतिमानवत्वासाठी त्यांचे आंतरिक विकसन हे महत्वाचे आहे, असे आंतरिक विकसन हे मानवी जीवनाचे ध्येय आहे.

## प्रेम :-

प्रेम हा सर्व धर्माचा केंद्र बिंदू आहे. ''अनमोल मोती'' ह्या पुस्तिकेत प.पु. गुरुदेवांचे विचार अतिशय उद्‌बोधक आहेत. फुलाकरिता ज्याप्रमाणे सुर्याची गरज आहे. त्याचप्रमाणे मानवी हृदयात प्रेमाचे महत्व आहे. कर्म हे प्रेमाचे प्रगटीकरण आहे. प्रेम ही संज्ञा व क्रिया आहे. प्रेम हीच शक्ती आहे. आत्यंतिक प्रेमामुळे दोष हे सुध्दा सौंदर्यात परावर्तीत होतात. मानवाच्या मनात प्रेम असेल तर जीवन हे सौंदर्यवान बनते. वास्तविक पाहता संपूर्ण जग हे प्रेमाने भारले आहे. पण मानवाच्या हृदयाची कवाडे बंद आहेत. मानव जेवढा इतरांना जेवढे प्रेम देतो तेवढेच प्रेम त्यांला प्राप्त होते. ह्या प्रेमाची निर्मिती जपणूक व त्याचे संवर्धन हे मानवी जीवनाचे ध्येय आहे. ध्येयाशिवाय मानवाच्या सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती होऊ शकत नाही आणि ध्येयाच्या प्राप्तीसाठी आवश्यक असणारी निष्ठा, श्रध्दा ही ध्येय उपलब्धी पेक्षा महत्वाची आहे. ट्रॉफी जिंकण्यापेक्षा धावण्यात सफलता आहे.

## शांती प्राप्त करणे :-

२ डिसेंबर, १९९२ मध्ये युनायटेड नेशन्सला उद्देशून केलेल्या भाषणात प.पु. गुरुदेवांनी ह्याबाबत एक अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडला आहे. तो असा की, ''जगातील कोणत्याही समस्येवर आपण तोडगा काढण्यास का समर्थ नाही? युनायटेड नेशनस आजपर्यंत जगात शांतता निर्माण करण्याकरिता एकत्र आली नाहीत. मानवाने अनेक संपादने केली पण तो आजही दु:खी आहे. तंत्रज्ञानाने वैश्विक संप्रेषणास चालना दिली. ज्ञान विज्ञानाचा विकास झाला पण आज मानव सुखी तर नाहीच पण त्याच्या समोर अनेक समस्या आहेत. प्रगती

म्हणजे काय? प्रगती कशाची? बाह्य जगच्या रचनेची प्रगती? ह्यापासून मानवाला आनंद व शांती ह्याची प्राप्ती होते का? तुमच्या जवळ सर्व काही आहे पण कुणीही सुखी नाही असे का? आपण ह्या समस्येची तिव्रता कमी करण्याचा प्रयत्न करतो. पण ह्या समस्येच्या मूलभूत स्त्रोतापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न कुणीही करीत नाही. डायग्नोसिस न करणाऱ्या डॉक्टरप्रमाणे सर्वसामान्यांची अवस्था होते. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आपण दु:खाची तीव्रता कमी करण्याचे अनेक स्त्रोत शोधून काढले पण दु:खाच्या मूळ कारणापर्यंत आपण अद्याप पोहोचलो नाही. आपण खरच शांतता व स्थैर्य प्राप्त करु शकलो का? ह्यासाठी आपण आजवर अनेक प्रयत्न केलेत. पण आजची जागतिक स्थितीचे अवलोकन केल्यास आपण खरच समाधानी आहोत का? पण ह्या समस्येचा मूलभूत विचार वेदांताने केला आहे. ते एक Subjective Science आहे व युनोमधील हा विचार Education for Peace चा स्त्रोत आहे असे म्हणायला हरकत नाही. ह्याचा मार्गही त्यांनी ह्याच भाषणात जगाला सांगितला आहे. तो म्हणजे Change yourself. ह्याचाच अर्थ Adapt youself to new environment. आपण जगातील ज्या चुका वाईट प्रवृत्तीने बघतो. त्या आपल्या जगाबद्दलच्या चुकीच्या संकल्पनेतून उगम पावतात. आपल्या वृत्तीत बदल केल्यास ह्या चुकीच्या संकल्पना नाहीशा होतात. असा बदल स्वत:मध्ये घडवून आणल्यास जगही बदलले आहे, ही जाणीव आपल्याला होईल व जगात शांतता आहे अशी अनुभूती आपल्याला येईल. हाच मुद्दा An enquiry into peace ह्या पुस्तकाचा आहे.

Inevitability of action ह्या पुस्तकात जीवन ध्येयाबाबत प.पु. गुरुदेवांनी अतिशय प्रेरणादायी उद्गार काढले आहेत. "Discovering a goal and vision in life a great Ideal and to be inspired, surroundering oneself to that Ideal and working in the world outside seems to be the secret of discovering new dynamism in our activities". अर्थात आपल्या समोर एखादे उदात्त ध्येय असेल तर आपल्याला आपल्या कार्य प्रेरणेचा नव्याने शोध लागतो. We must have goal in our life so that we may look up to that goal and draw inspiration for our action. आयुष्यात केवळ ध्येय ठेवणे महत्वाचे नाही तर त्या ध्येयाला योग्य channelised करण्याची

आवश्यकता असते. अन्यथा ते ध्येय अनुत्पादक ठरते. "Thus bring that entire energy focused into activity that is the highest creative action in the world outside". आणि म्हणूनच यशाचे रहस्य हे योग्य आदर्शाची निवड करण्यात आहे. योग्य आदर्श, कार्याच्या प्रति Dedication व संपादनाबाबत एकाग्रता ह्यावर अवलंबून आहे. हा विचार त्यांनी The Secret of Success ह्या पुस्तकात मांडला. ह्यासाठी कोणत्या ध्येयाची निवड करावी ह्याबाबत त्यांची दृष्टी स्पष्ट आहे. ह्याच पुस्तकात त्यांनी ती व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''व्यक्तिगत ध्येयापेक्षा समाज कल्याणकारी राष्ट्राच्या प्रगतीला पूरक अशा एका ध्येयाची निवड मानवाने करायला हवी. 'आत्मविकास की निर्देशिका' ह्यामध्ये ध्येयप्राप्तीची पूर्ण रचना आपणास मार्गदर्शक ठरते.

मानवाची संकल्प शक्ती

कृतिमध्ये परिवर्तन

|

बुध्दीदात्याशी प्रमाणिक ———— सिध्दांत ———— मन सिध्दांताशी तडजोड

|

सुसंस्कृत संकल्प शक्ती

|

इमानदारी

|

प्रेरणादायी वातावरणाची निर्मिती

|

आंतरिक शक्तीत वाढ

|

संकल्पशक्तीत वाढ

|

जीवन ध्येयाची प्राप्ती

**४.२) ध्येय प्राप्तीची रचना**

## Self Cleansing :-

मानव हा दोन जगतामध्ये उभा आहे. One dying and other struggling to be born. ह्या दोन जगता मधोमध असणारे जग कोणते असेल? हे आपण निवडू शकतो. We are the maker's of our own worlds. आज जर जग आपणास कुरुप आहे असे वाटत असेल तर ते केवळ आपण स्वतः कुरुप आहोत म्हणून. "We cleanse our hearts, we will find that the brilliance in the world is but a reflection of the brilliance within." बाह्य जग ही आपल्या आंतर दृष्टिकोनाची अभिव्यक्ती असते. ह्यासाठी Self Cleansing महत्वाचे आहे. सर्वसामान्याकरिता ही प्रक्रिया अतिशय क्लिष्ट वाटते. ह्यासाठी काही गुणांचे तंतोतंग पालन व्यक्तिने आपल्या जीवनात करावयास हवे. नव्हे खालील गुण त्याने आपल्या जीवनात उतरविले पाहिजे. ते म्हणजे, "Moral living, ethical standards, religious virtues and cultural values." ह्या गुणाबाबत आपण प्रतयक्षात चर्चा खूप करतो पण त्याचे आचरण मात्र आपण करीत नाही. ह्या गुणांना आपल्या जीवनात प्रत्यक्ष उतरविल्याशिवाय आपल्य जीवनाचा पोत, गुणवत्ता उंचावत नाही. ह्या गुणांचे आचरण हे मानवी वर्तनाला सौंदर्य प्रदान करतात. हे अंतर्गत सौंदर्य वृध्दिंगत केल्याशिवाय विकसित केल्याशिवाय मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त होत नाही. पूर्णत्व प्राप्त होत नाही आणि Individual perfection is the means for the total perfection.

## जीवनाचे सातत्य जाणणे :-

भविष्यकाळाची व्याख्या करतांना, As I think ह्या पुस्तकातील continuity is existance ह्या लेखात वरील जीवन ध्येयाचा विचार करण्यात आला आहे. जीवनाचे सातत्य हे काळात बंदीस्त करता येत नाही. काळ हा प्रवाही असतो. भुतकाळातून वर्तमानाचा वर्तमानातून भविष्यकाळ आकाराला येतो. Continuity of past modified in present is the future अशी त्यांनी एक नावीण्यपूर्ण परिभाषा केली आहे. वेळेचे हे सातत्य कुणीही थांबवू शकत नाही. वर्तमान ही भूतकाळ व भविष्यकाळ ह्यांची Meeting Point आहे. भूतकाळाच्या संदर्भात वर्तमान काळ ही Fulfillment आहे. with reference to future the present is not a helpless ending but it is a deliberate beginning आणि म्हणूनच वर्तमान हे

आपले आपल्याकरिता फारमोठे उपलब्ध भांडवल आहे. हे भांडवल अत्यंत बुध्दीमत्तापूर्ण गुंतवायला हवे तरच त्याचा फायदा व नफा भविष्यात मिळू शकतो. हेच जीवनाचे सातत्य आहे व यशस्वी जीवनासाठी हे आवश्यक आहे. हे सातत्य यशस्वी करायचे असेल तर पुढील बाब प्रत्येक व्यक्तिंनी जाणायला हवी. "Commulative effect of the past is the present. To meet it properly will be the intelligent sheme of creating a happier and peaceful future. अशा ह्या वर्तमानाला यशस्वीपणे सामोरे जाण्याचे सामर्थ्य व्यक्तीमध्ये निर्माण व्हायला हवे.

## समस्या निराकणाची क्षमता विकसित करणे :-

मानवी जीवन हे समस्यांनी परिपूर्ण असते. आपल्या समोरुन समस्यांची जणू काही परेडच सुरु असते. पण ह्या समस्यांना अत्यंत कुशलतापूर्वक हाताळावे लागतात व त्यांची सोडवणूक करावी लागते. संपत्ती, जवळची माणसे निघून जाणे ह्याला माणूस grave problem अर्थात गंभीर समस्या समजतो तर काही व्यक्ती अशा समस्यांमध्ये स्वत:च्या शक्तीची अनुभूती घेतो आणि आपल्या वेदनेपासून दूर होऊन तो समस्यांना सामोरे जातो. अशा व्यक्ती जगात Men of Disting म्हणून ओळखले जातात. सर्वसामान्य व्यक्ती समस्यांशी भांडत भांडत स्वत:ला मात्र दु:खाच्या थडग्यात ढकलत असतो. वरील प्रकारचे मार्गदर्शन As I Think ह्या पुस्तकात Problem? face them? ह्या लेखात कले आहे आणि लेखाच्या शेवटी मानवाला आव्हान केले आहे. Make the grave for all problems do not make the problems to grave for ourselves even the grave is no problem for thos who know. How to meet it". म्हणून आपण सर्वांनी समस्या सोडविण्याची कला शिकायला हवी. शारीरिक, मानसिक, बौध्दिक कोणत्याही स्तरावर येणारी समस्या ही मानवास सोडविता आलीच पाहिजे ही क्षमता त्याच्या अंगी विकसित व्हायला हवी. समस्या सोडविण्याचे सामर्थ्य हे जीवनध्येय आजच्या काळात अत्यंत उपयुक्त असे आहे. कारण आधुनिक जगात मानव हा अनेक समस्यांनी अक्षरश: घेरला गेला आहे. ह्या समस्या मानवी जीवनावर आक्रमण करीत आहे व मानवाच्या जीवनाचे थडगे तयार करीत आहेत. पण मानवामध्ये हे सामर्थ्य यावे की मानवाने ह्या समस्याचे थडगे स्वत: तयार करावे.

वरील सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, प.पु. गुरुदेवांच्या दृष्टिकोनातून जीवनाचे अंतिम ध्येय खालील प्रमाणे आहे.

१) विवेक शक्तीचा विकास घडवून आणणे.

२) योग्य कर्म करण्याची पात्रता निर्माण करणे.

३) आत्मसाक्षात्कार.

४) मानसिक शिस्त प्राप्त करणे.

५) वासनांना संस्कारीत करणे.

६) उच्च कोटीच्या कर्माची प्रेरणा निर्माण करणे.

७) विक्षेपांचा शेवट करणे.

८) शांतता व आनंद प्राप्त करणे.

९) दिव्यत्वाचा शोध घेणे.

१०) परिपूर्ण आनंदाची प्राप्ती करुन घेणे.

११) आत्मसंयम मिळविणे.

१२) आत्मानुभव प्राप्त करणे.

१३) जीवनातील दु:खापासून निवृत्ती.

१४) ईश्वरी जीवन प्राप्त करणे.

१५) योग्य मार्गाची निवड करणे.

१६) व्यक्तिमत्वाचे पुनर्वसन.

१७) व्यक्तिमत्वाचा समतोल साधणे.

१८) पूर्णत्वाची योजना पूर्णत्वास नेणे.

१९) आत्म्याचे पुनशोधन.

२०) आध्यात्मिक विकास.

२१) आत्मप्रभुत्व प्राप्त करणे.

२२) मानवी जीवन उत्क्रांत करणे.

वरील प्रकारची जीवन ध्येय हा गुरुदेवांच्या विचारांचा गाभा आहे.

## ३) गुरु शिष्य व गुरु शिष्य संबंध :-

प.पू. स्वामी चिन्मयानंद हे स्वामी तपोवनम् ह्यांचे शिष्य होते. ते एक सत्‌शिष्य होते. गुरुची शिकवण, त्यांची शिस्त, त्यांचे ज्ञान, त्यांच्या रोमारोमातून भिनले होते. असे म्हणण्यात येते की, व्यक्तीची सत्‌शिष्य ही सुरवात असते तर सद्‌गुरुत्व ही त्याची पराकाष्ठा असते. प.पू. गुरुदेव हे सत्‌शिष्य होते आणि म्हणूनच ते सद्‌गुरु झालेत. त्यांचे आणि त्यांच्या गुरुचे संबंध अलौकिक होते, वर्णनातीत, शब्दातीत होते. आपल्या सद्‌गुरुंना त्यांनी आपल्या ज्ञानातून, कार्यातून अमरत्व बहाल केले. रामकृष्ण परमहंस व स्वामी तपोवनम् ह्यांनी ह्या युगाला दिलेले स्वामी विवेकानंद व स्वामी चिन्मयानंद हे अलौकिक असे दान आहे. जेवढा श्रेष्ठ गुरु तेवढाच श्रेष्ठ शिष्य. परमपूज्य गुरुदेवांनी आपल्या अनेक पुस्तकातून व्याख्यानातून गुरुशिष्य संबंधावर प्रकाश टाकला आहे. गुरुचे गुण काय असावे, शिष्याच्या अंगी कोणते गुण असावे ह्यावरही त्यांनी आपले भाष्य केले आहे.

आधुनिक युगात ऐहिकशास्त्रच प्रामुख्याने विद्यार्थ्यांना शिकविण्यात येते. ह्या प्रक्रियेमधील शिक्षक व विद्यार्थी ह्यांचेबाबत गीता अध्याय ५ मध्ये प.पू. गुरुदेवांनी पुढील प्रमाणे भाष्य केले आहे ते पुढीलप्रमाणे, ''ऐहिक शास्त्र कोणत्याही शिक्षक, विद्यार्थ्याला यशस्वीपणे शिकवू शकते व ते त्याच्या मेंदूत भरवू शकते. ह्या शिक्षण पध्दतीमध्ये अशा शिक्षकाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम श्रध्दा किंवा आदर असावा अशी मुळीच आवश्यकता नसते. ह्या ज्ञानदानाच्या बाबतीत शिक्षक म्हणजे केवळ शिक्षण देण्याचे एक उपकरण असते. अशा तऱ्हेने आज आधुनिक कॉलेजमधील प्राध्यापक म्हणजे वर्गातील फळा, प्लॅटफॉर्म किंवा बाक यांच्या इतकेच बोलके उपकरण असते. परंतु उलटपक्षी मानव संस्कृतीचा दरवळ, नैतिक दर्जा किंवा सदाचाराची झळाळी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला प्रदान करायची असेल तर विद्यार्थ्याने आपल्या मनात प्रेम, पूज्यभाव ह्या भावना बाळगून गुरु सान्निध्य जपणे आवश्यक असते. हल्लीच्या काळातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व नियुक्त प्राध्यापकांना ह्या सूचना विलक्षण वाटतील. आजच्या काळात महाविद्यालयात जी शास्त्र शिकविण्यात येतात त्यासाठी विद्यार्थी व प्राध्यापक ह्यांच्यात आंतरिक सुसंवाद निर्माण होण्याची आवश्यकता भासत नाही. प्राध्यापक म्हणजे स्वत: शिकलेल्या माहितीचे रेकॉर्डप्रमाणे केवळ पोपटपंची करणारे यंत्र आहे. जी माहिती

विद्यार्थी देखील एखाद्या संपन्न ग्रंथालयाचा उपयोग करुन ते ज्ञान ग्रंथालयात जाऊन देऊ शकेल.''  आधुनिक काळातील गुरु व शिष्य दोहोंवर प.पू. गुरुदेवांनी केलेला हा शाब्दीक प्रहार अत्यंत मार्मिक आहे.  प.पू. गुरुदेव हे आध्यात्मवादी असल्याने त्यांच्या विवेचनात सुध्दा गुरु व शिष्याच्या आध्यात्मिक भूमिकेवर जास्त भर आहे.  गुरु शिष्य संबंधावर त्यांनी प्रकाश टाकलाच पण त्याच सोबत त्यांनी गुरु व शिष्य ह्यांचे गुणही सांगितले आहे.

**आदर्श गुरु :-**

गीता अध्याय ४ थ्या अध्यायाच्या विवेचनामध्ये गुरुबाबतचे खालील विवेचन आपणास बघावयास मिळते.  खरा गुरु हा शिष्याच्या प्रश्नावरुन त्याच्या विचाराची चुकांची दिशा तात्काळ जाणतो आणि त्याच्य शंका निरसन करुन शिष्याच्या आंतरिक विचार क्षेत्रात त्यांच्या नकळत दिशा दाखवून त्याला योग्य मार्गावर आणतो.

खरा गुरु शिष्याच्या प्रश्नावरुन त्याच्या विचाराची चुकीची दिशा तात्काळ जाणतो आणि त्याच्या शंका निरसन करुन शिष्याच्या आंतरिक विचार क्षेत्रात त्यांच्या नकळत दिशा दाखवून त्याला योग्य मार्गावर आणतो.  पण अशाप्रकारे गुरुबरोबर बौध्दिक लढत सतत देत राहिल्यास गुरुजवळील पूर्णत्वाचा दरवळ जणूकाही शिष्याच्या जीवनात उतरतो.

**मानव निर्माण की कला :-**

खरा आचार्य आपल्या शिष्याची भ्रांती आणि शंकेचे पुर्वानुमान करतो व त्याच्या शंकांचे समाधन करतो.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्ररित्या प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याबाबत प्रेरणा निर्माण करावयास हवी.  खरा गुरु आपल्या आचरणाद्वारा आपल्या शिष्यातील जागृत उत्साहास प्रज्वलीत ठेवण्यास त्याची सहायता करतो.

**ऐतरेयोपनिषद :-**

जगातील सर्व महात्म्यांनी आपल्या विचारात व उच्चारात पूर्ण सुसंगती राखण्याचा उपदेश केला आहे.  ह्या उपदेशाचे पालन जर केले नाही तर छात्र आपल्या शंका

आचार्यांपुढे कधीही व्यक्त करु शकणार नाही. शिवाय व्यक्ती जर ज्यात तिचे शब्द तिचे मन जे सांगते त्याच्यापेक्षा काही निराळे व्यक्त करणारे आहेत असे विस्कळीतपणाचे जीवन जगू लागली तर तिच्या आंतरिक व्यक्तिमत्वाचे तुकडे पडू लागतील. तडा गेलेले वाद्य व त्या तारावर कलाकार स्फुर्तीची बोटे फिरवू लागेल. तेव्हा आपले सुर व्यक्त करु शकणार नाही.

प्रश्नोपनिषद :-

खरा आचार्य कोण ह्याबाबतचे विवेचन प्रश्नोपनिषदाचे विवेचनात आपणास आढळते. प.पू. गुरुदेव म्हणतात, "ज्याला वृथा अभिमान, दंभ, अहंकार माहित नाही ते नेहमीच विनित व सद्चरीत असतात. प्रसंगी वरवर दिसणारा त्यांचा कठोरपणा देखील त्यांचे छात्रच केवळ आकलन करु शकतील आणि समजू शकतील.''

विवेक चुडामणि :-

शिष्याबाबत सहानुभूतीने भरलेले अंत:करण त्याच्याजवळ हवे कारण त्याशिवाय गुरु हा शिष्याच्या पातळीवर जाऊ शकत नाही. गुरु शिष्याबाबत परम दयाळू व सहानुभूती दाखविणारे नसतील तर गुरुशिष्य संबंध दुराव्याचे होतील.

आध्यात्मिक गुरु ह्या दृष्टिकोनातून विवेकचुडामणी मध्ये गुरुचे वर्णन आढळते. शिष्याला प्रदान केलेले ज्ञान त्याच्या अंत:करणात पूर्णपणे रुजलेले नाही. यासंबंधी शिष्याची पूर्ण परीक्षा घेतल्यानंतरच गुरुंनी त्याला दीक्षा द्यावीऋ

व्यक्तिमध्ये मानसिक व बौध्दिक गुण असल्याशिवाय अपात्र शिष्यांना ज्ञानदान करण्यामध्ये सद्गुरुच्या शक्तीचा अपव्य ठरेल. शिवाय अनाधिकारी शिष्याला अध्यात्मिक ज्ञान आणि तद्नुसांगिक सामर्थ्य प्रदान केल्यास तो शिष्य ज्ञानाचा उपयोग स्वत:च्या नाशाकरीता आणि जगाच्याही विध्वंसाकरीता करण्याचा संभव असल्याने ते अयोग्य ठिकाणी प्रदान केल्यासारखे होईल. कोणत्याही देशात जेव्हा विधी निषेधाला न जुमानणारा पुरुष सत्तेवर येतो तेव्हा तो समाजात दहशत निर्माण करतो.

गुरु हा हितचिंतक हवा. म्हणजे तो केवळ ध्वनीमुद्रक नको तर त्याच्या

अनुभव ही त्याच्याजवळ असावा. गुरु हा योग्यतेचा पुरुष असावा. आपल्या आचरणात तो परिपूर्ण हवा. चांगले गुरु हे आपल्या शिष्याची स्वतंत्रपणे चर्चा करण्याची शक्ती गुदमरुन टाकू देणारे नसतात. उत्तमोत्तम गुरुंनी नेहमीच आपल्य शिष्यातील वादविवाद पटुतेमधल बुध्दी कौशल्याला जोपासले आहे.

**Meditation and Life :-**

Teacher is one whose remebrance help you to become a critic of yourself. He is guide who at all moments of moral and ethical compromises rise up some where in your memory to warn you not to fall prey to temptation and lends you courage to come away from the facination of moment and walk heroically the rugged path of righteousenss.

**The Vision of Life :-**

The teacher can supply a clear vision of what is involved a glimpse of the goal to be achieved and logical arguments to convince the student of the belessedness and perfection of both goal and the path but each one must walk the path by oneself.

Spiritual culture ह्या पुस्ताकात प.पू. गुरुदेवांनी Greath Qualities of Teacher नमुद केले आहेत. ते पुढीलप्रमाणे

1) The practice of what is right and proper as indicate in the scripture.

2) Living the Idals that have been intellectually comprehended during the studies (Satyam)

3) A spirit of self sacrifice and self denial (Tapas)

4) A control of senses (Dama)

5) Tran quality of mind (Sama)

6) Practice of concentration and ritualism through fire worship as was in vague in the society of those days.

7) Doing ones duty towards humanity.

गीतेच्या सहाव्या अध्ययाच्या विवेचनात असे नमूद करण्यात आले आहे की, जेव्हा एखादे वादळी व्यक्तिमत्व एखाद्या प्रामाणिक धर्मप्रवर्तकाच्या श्रेष्ठ तत्वज्ञानाविरुध्द युक्तीवाद करण्यास, त्याचे खंडण करण्यास खंजीर उगारुन पुढे सरसावते तेव्हा अशा बंडखोर बुध्दीशी मुकाबला करण्यासाठी गुरुजवळ देखील मनाचा समतोलपणा, अलौकिक समजूतदारपणा व विलक्षण हातोटी असावी लागते.

Guru ह्या लेखात गुरुदेवांनी (Chinmaya Mission New Bulletin - July 2006) गुरुचे गुणवर्णन केले आहे. ते म्हणतात, गुरुचे वर्तन हे सर्वबाजूनी परिपूर्ण असावे तो विशाल हृदयाचा असावा, त्यातून करुणा सतत प्रवाहीत व्हावी. To weed the mind and plant new ideas is a very painful operation and this can be achieved only when the teacher has infinite, patience endless, love and supreme affection. गुरुच्या सान्निध्यात शिष्याला सुरक्षिततेची भावना हवी.

The Role of Teacher ह्या लेखात (Tapovan Prasad - Aug. 98) गुरुदेवांनी शिक्षकांची भूमिका व्यक्त केली आहे. ते म्हणतात, "शिक्षकाने शाळा आणि समाज ह्यातील bride ह्या भूमिकेत कार्य करावे. शिक्षक हा पालक व विद्यार्थी ह्यातील दुवा आहे. शिक्षकाने आपल्या कर्तव्यात कसुर करता कामा नये. While working hard sincerely pouring out our love and affection to the tender children and imparting unto them a stable culture and a brilient character we shall certainly as members under the contitution seek our own rights and privileges. आजची परीक्षा पध्दती बदलली पाहिजे असे त्यांना वाटे. ही भावना त्यांची प्रस्तुत लेखात व्यक्त होते. ही परीक्षापध्दती केवळ टायपिस्ट व कारकुन निर्माण करणारी पध्दती आहे. अशीही त्यांनी टिका केली आहे. परीक्षापध्दतीतून विद्यार्थ्यांच्या पुढील दोन गुणांची अभिव्यक्ती व्हावी असे त्यांना वाटत होते. 1) Students original thinking, 2) Independent judgement ही

परीक्षा पध्दती तेव्हाच लागू होऊ शकेल ज्यावेळी शिक्षक परंपरागत पध्दतीने अध्यापन करावयाचे सोडतील. परंपरागत पध्दतीत त्यांनी text book craming व note dictating ह्या दोन पध्दतीचा उल्लेख केला आहे. ह्या पध्दती केवळ अनुदेशक (Instructors) वापरु शकतो. खरा शिक्षक ह्या पध्दतीचा कधीच वापर करणार नाही. खऱ्या शिक्षकाचे कार्य त्यांनी पुढील शब्दात सांगितले आहे.

A teacher job is to guide the student to think independently and give him the art of educating himself.

ह्यासाठी शिक्षकाला स्वत:च्या व्यक्तिमत्वात अनेक घटकात समायोजन करावे लागेल. तेव्हाच आपण ह्या परिवर्तनाची अपेक्षा करु शकतो. आपल्यापैकी काही शिक्षकांना कामाचे ओझे वाटते तर काही शिक्षक ह्या कार्यापासून आनंद प्राप्त करतात. असे शिक्षक फार थोडे असतात. हे work load समाधानाच्या joy load मध्ये परिवर्तीत व्हायला हवे. शिक्षकांची जबाबदारी सांगत असतांना ह्याच लेखात त्यांनी नमूद केले आहे की, In the 305 if it was the responsibility of the politicians to win our independence in the 605 we must consider that it is the responsibility of the teachers to create the true Bharat in the very interest of the character of the generation.

## शिष्याचे गुण :-

गीता अध्याय ४ था :-

गुरुजीं तत्वे सांगितली व जो उपदेश केला तो आपल्या जीवनात शिष्याने आत्मसात करणे ह्यात खरी गुरुची सेवा आहे. ज्ञान हे गुरुला शरण जाऊन, प्रश्न विचारुन, गुरु सेवा करुन मिळवावे लागते. अभ्यासकांची बौध्दिक वृत्ती पूर्ण शरणागतीची, नम्रतेची, आदर्शाची व आज्ञापालनाची असावी लागते. गुरु जवळील ज्ञान घेण्यासाठी जातांना गुरु सांगतील ते समजून घेण्याचा व त्याप्रमाणे वर्तन करण्याच्या मानसिक तयारीने गेले पाहिजे.

ज्याप्रमाणे पाणी नेहमी उंचभागाकडून सखल भागाकडे निसटते वहात जाते तसेच ज्ञान देखील उच्च स्तरावरुन खालच्या स्तराकडे जात असते. ह्यासाठी शिष्याची पूर्ण

शरणागतीची भावना असली पाहिजे तरच तो गुरुपासून येणाऱ्या ज्ञानाने भारावून जाईल. शिष्याने आपल्या बुध्दीला येणाऱ्या शंका ओळखण्यात पुरेसे जागरुक असले पाहिजे. गुरुबद्दल श्रध्दा, आदर, पूज्य बुध्दी, गौरवाची नम्रवृत्ती ह्या चौकटीत राहून आपल्या शंका निरसनार्थ गुरुंशी आदरपूर्वक बौध्दिक चर्चा करण्यास नेहमी सिध्द असले पाहिजे.

**मानवनिर्माण की कला :-**

जेव्हा शिष्य हा गुरुसोबत परिपूर्ण ताळमेळ प्रस्थापित करतो तेव्हाच गुरु त्याला ज्ञान प्रदान करु शकतो. विषयाचे अध्ययन करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये किमान अध्ययनशीलता, ग्रहणशीलता असायला हवी. समज नसेल तर त्या विषयाची रुची त्याच्या ठिकाणी असावी. त्या विषयाच्या प्रति आदर असायला हवा. पण साधकाने गुरुच्या उपदेशाप्रती असेच अविश्वास व तिरस्काराचे कवच घातले असेल तर त्याच्यात ग्रहणशीलतेचा प्रश्न उद्‌भवत नाही. तो अभेद्य होईल. नवीन विचाराचा रंग त्याच्यावर चढणार नाही.

**ऐतरेयोपनिषद :-**

शिष्याला अध्ययनाचे सातत्य तेव्हाच राखता येऊ शकेल जेव्हा नुसती चटकन आकलन करण्याची क्षमताच नव्हे तर ज्यात एकदा आकलन केलेले वक्तव्य रेताळ खडकाच्या खांबावर खोदलेल्या मजकुराप्रमाणे स्पष्टपणे सुरक्षित ठेवली जाईल. अशीही स्मृती छात्राच्या ठिकाणी असेल संस्कृत भाषेत ह्यालाच मेघाशक्ती म्हणतात.

ही क्षमता छात्राकडून जाणीवपूर्वक आणि बुध्दी पुरस्सर केल्या जाणाऱ्या प्रयत्नांनीच प्राप्त करता येते. एखादा योग्य प्रतिसाद देतो पण सर्वकाही स्मरणात ठेवू शकत नाही. तर दुसरा छात्र जे काही शिकला ते सर्व काही स्मरणात ठेऊ शकतो. मनाला त्याच विचारांवर दीर्घकाळ अविरत चिंतन करावयास लावून स्मृतीज्ञान सुकर केले जाते आणि आपण जे ऐकले आहे ते आत्मसात करण्याच्या ह्या मानसिक आणि बौध्दिक प्रक्रियेला मनन म्हणतात. मनाच्या एका कोपऱ्यात हे विचार धुमसत ठेवून हे परिणामकारक रितीने केले जाते. दिवाणखान्याच्या एका टोकाला जळत ठेवलेला छोटासा धुप त्याचा सुवास दिवाणाखानाभर पसरवितो. तोच सुगंध खिडक्यांच्या बाहेरील वातावरणातही वाहून नेतो. त्याप्रमाणे श्रवण

केलेले ज्ञान मनाच्या एका बाजूला धुमसत राहू द्यावे. लवकरच त्याचा सुगंध स्वत:च्या विचारांच्या कल्पनांच्या आंतरिक जगात आणि बाह्यवाणी व कृती यातून पसरेल. ही प्रक्रिया स्वाध्यायाच्या थोडे दिवस तरी अहोरात्र अभ्यासपूर्ण अंगीकारायची असते. सर्वसाधारणपणे ह्याचा अर्थ असा होतो की, ज्या अर्थी मी माझ्यावरील विघटनात्मक वृत्ती टाळून सुसंघटीत होण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करीत आहे. त्या अर्थी मी माझ्या आचार्यांचे शब्द आत्मीयतेने श्रवण करीत आहे. त्यांना काळजीपूर्वक प्रतिसाद देतो आहे. त्या अर्थी मी तत्वावर अहोरात्र मनन करीत आहे.

**विवेकचुडामणी :-**

पूर्णपणे ज्ञानग्रहण करण्याची क्षमता ही एक दैवी वृत्ती असून गुरुच्य संबंधी असणारा आदर, समर्पण भाव, श्रध्दा आणि प्रेम ज्यामध्ये भरलेले आहे अशा असण्याचा तो सुगंध असतो.

गुरुंनी सांगितलेले ज्ञान ऐकतांनाच आत्मसात करणे आवश्यक आहे. तात्काळ आकलनाची क्षमता गुरुंनी व्यक्त केलेला प्रत्येक सूक्ष्म विचार पकडण्यात तत्पर बौध्दिक सात्मिकरणाच्या प्रक्रियेद्वारा त्या विचारातील खऱ्या रहस्यापर्यंत पोहोचण्या इतपत ग्रहणशील आणि चपळबुध्दीचा जर हे चापल्य कमी पडत असेल तर शिष्याला चिंतातील अप्रतिहत प्रगती करण्याची आशा करता येणार नाही.

शिष्याने गुरुशी समरस होणे आवश्यक आहे. शिष्याने आधीच आत्मानुशासनाच्या प्रक्रियेने आपले आंतरिक साम्राज्य इतके शुध्द आणि प्रसन्न केलेले असल्यामुळे तो संपूर्ण भक्तीभाव आणि विनम्रता, ग्रहण क्षमता आणि दक्षता यांच्यासह त्यात स्थित झालेला असतो.

जेव्हा जेव्हा संपर्क येत असेल त्यावेळी प्रत्येक शिष्याने आपल्या गुरुशी सुजाण, चाणाक्ष, कल्पक युक्तिवाद करण्याच्या क्षेत्रात आपली संपूर्ण स्वतंत्र प्रज्ञा ओतली पाहिजे.

अध्याय ११ वा :-

एखाद्या पाठाच्या शेवटी आपल्या शंका घेऊन गुरुकडे आल्यानंतर गुरुने

विवरण केलेला विषय आपल्याला पुरेसा समजला आहे हे शिष्याने सर्वप्रथम गुरुच्या लक्षात आणून द्यावे लागते. त्यामुळे प्रश्न विचारण्यास व शंका निरसन करुन घेण्यास शिष्य पात्र ठरतो. व अशी शंका संभाव्य अडचणीबाबत जेव्हा तो पृच्छा करतो तेव्हा त्याच्या अडचणीमधून बाहेर पडण्यास खऱ्या गुरुने शक्य ती सर्व मदत केली पाहिजे.

कठोपनिषद :-

उत्तम शिष्य ते की जे आपल्या गुरुंची इच्छा जाणून त्याची नेहमी सेवा करतात. मध्यम शिष्य ते की जे आज्ञाधारक असतात. पण जे गुरुंनी आज्ञा देऊनही तिची अंमल बजावणी करण्यात चुकारपणा करतात ते तिरस्करणीय व अधम शिष्य होत.

प.पू. स्वामी चिन्मयानंद हे अध्यात्मवादाचे अर्थात अद्वैतवादाचे कट्टर पुरस्कर्ते होते. परिणामी शिष्याबाबतची त्यांची भूमिका ही आध्यात्मिकच आहे. गुरुंची सेवा करुन शरणागती पत्करुन गुरुचे आज्ञा पालन ही बाब ते महत्वाची मानतात. गुरुबाबत श्रध्दा आदर भक्तीभावना ह्याला ते प्राधान्य देतात. तसेच शिष्याची मनोवृत्ती ज्ञान ग्रहणासाठी तत्पर असावी ह्यावर त्यांचा कटाक्ष आहे. प्रत्यक्ष अध्ययन करण्यासाठी विद्यार्थ्यांची ज्ञान ग्रहण क्षमता, आकलन क्षमतेलाही त्यांनी प्राधान्य दिले आहे. केवळ आकलनच महत्वाचे नाही तर ह्या ज्ञानाची स्थिरताही महत्वाची आहे. अर्थात ज्ञान प्राप्त करणे हे टिकविणे व त्याचा आपल्या जीवनात योग्य वापर करणे ह्यावर त्यांनी भर दिला आहे व ही क्षमता शिष्याने संपादित करावं याची बाब आहे.

कठोपनिषदाच्या अ १ वल्ली १ मधील पाचव्या श्लोकाच्या विवेचनात शिष्याची वर्गवारी प.पू. गुरुदेवांनी स्पष्ट केली आहे. ही वर्गवारी गुरु कर्तव्याच्या संदर्भात करण्यात आली आहे. तीन प्रकारात ही वर्गवारी करण्यात आली आहे. १) उत्तम, २) मध्यम, ३) अधम. ''उत्तम शिष्य ते की जे आपल्या गुरुंची इच्छा जाणून त्यांची नेहमी सेवा करतात. मध्यम शिष्य ते की जे अप्रमादितपणे आज्ञाधारक असतात. पण गुरुंनी तशी आशा केली तरच. पण जे गुरुंनी उघडपणे आज्ञा करुनही तिची अंमलबजावणी करण्यात चुकारपणा करतात ते तिरस्करणीय, कपाळ करंटे व अधम शिष्य होत. शिष्याची ही वर्गवारी अध्यात्मवादातही आपणास आढळते.''

शिक्षकाच्या अर्हतेबाबत, "A true Guru and attuned Disciple" ह्या लेखात (A vision comes true - July 1996) प.पू. गुरुदेव म्हणतात, "A true teacher however has a thorough knowledge of the science of relegion and is also rooted in his own subjective experience of that state of consciousness indicated by the scriptures." गुरुच्या अध्यापनाच्या पध्दती बाबत ह्याच लेखात ते पुढे भाष्य करतात की, Guru must explain not only the word meaning but also the indicative meaning by which the limited words of scripturs explain the inexplicable thus relieving the student of his mental confusion. The Guru must also instruct the student on the process of self unfoldment and help him along the path to succeed in his subjective quest of truth.

गुरुला, शिक्षकाला धर्माचे, धर्मग्रंथाचे, धर्म मार्गाचे ज्ञान असावे अर्थात शिक्षक गुरु हा धर्मनिष्ठ असावा.

## गुरुशिष्य संबंध :-

गुरु व शिष्य ह्यामधील संबंध हे अलौकिक असतात. ह्या बाबत प.पू. गुरुदेवांनी पुढीलप्रमाणे भाष्य केले आहे.

**गीता अध्याय १ :-**

भारतात गुरु आणि शिष्य ह्यामधील नाते काही अतुलनीय असते. गुरुची परीक्षा घेऊन तो चालता बोलता ईश्वर आहे ही खात्री पटल्याशिवाय शिष्यांच्या मनात गुरुविषयी पूज्यभाव व शरणागतीची भावना निर्माण होत नाही. एखाद्याला शिष्य म्हणून स्विकारल्यावर त्याला ममतेने, प्रेमाने व आपुलकीने मार्गदर्शन करणे हे आपले कर्तव्य आहे, असे गुरु मानतो. आपल्या मुलांबद्दल वडीलांना जेवढा जिव्हाला असतो. त्याच्या हजार पटीने गुरुला शिष्याबद्दल प्रेम असते. आपल्या शिष्याने आपल्या सुचनेचे तंतोतंत पालन करावे, असे जर वाटत असेल तर त्याच्या मनातील सर्व शंकांचे निरसन करणे ही गुरुंचीही जबाबदारी ठरते.

**अध्याय ३ रा :-**

गुरु शिष्यात जेव्हा प्रेमाचे विशिष्ट संबंध निर्माण होतात तेव्हाच कोठे त्यांना आपल्या शिष्याला समर्थपणे शिकविण्याची स्फुर्ती येते. ''तू पैसे दे व मी शिकवितो'' अशी व्यापारी वृत्ती गुरु शिष्यात नसावी. ज्या ठिकाणी प्रेम, मित्रत्व, स्वातंत्र्य परस्पर समज ह्याचे सहानुभूतीचे वातावरण असते. अशाच ठिकाणी बुध्दीचा व मनाचा विकास योग्य होतो.

**अध्याय ७ वा :-**

''गुरु शिष्यामधील चर्चेमध्ये हे स्वाभाविक आह की एखाद्या अवघड पाठाच्या शेवटी आपल्या शंका गुरुकडे आल्यानंतर गुरुने विवरण केलेला विषय आपल्याला पुरेसा समजला आहे हे शिष्याने सर्वप्रथम गुरुला दाखवून दिले पाहिजे. ह्यामुळे प्रश्न विचारण्यास व गुरुकडून शंका निरसन करुन घेण्यात शिष्य पात्र ठरतो. पूर्वीच झालेल्या चर्चेची तर्कसंगती समजली असल्याचे दाखवून देऊन एखादा शिष्य जेव्हा योग्य प्रश्न विचारतो किंवा संभाव्य अडचणींच्या उपायाबाबत पृच्छा करतो तेव्हा त्याच्या अडचणीमधून बाहेर पडण्यास खऱ्या गुरुने शक्य ती मदत केली पाहिजे.''

वरील विवेचनावरुन लक्षात येते की, गुरुशिष्य संबंधाचा विचार प.पू गुरुदेवांनी जो केला तो आध्यात्मिक स्तरावरील विचार आहे. गुरु हा शिष्याचा आध्यात्मिक पिता आहे. हीच भूमिका प.पू. गुरुदेवांनी मांडली आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे ते भारतीय तत्वज्ञानाचे उपासक आहेत. आधुनिक काळातील गुरुशिष्य संबंध, शिक्षक विद्यार्थी संबंध ह्यावर त्यांनी कडाडून टिका केली आहे. शिक्षकी पेशामधील बाजारुवृत्तीवर त्यांनी आक्षेप घेतला आहे. गुरु शिष्य संबंधात गुरुचे अध्यापनाचे व शिष्याचे अध्ययनाचे सामर्थ्य ह्यावर त्यांनी भर दिला आहे. ''पण आपल्या सभोवताली असणाऱ्या शिक्षकामध्ये आदर्श गुणांचा गुरु क्वचितच आढळणारा असेल तर केवळ शिक्षक वर्गाचाच नव्हे तर अखिल विद्यार्थी वर्गाच्या मनोवृत्तीच्या दु:खद ऱ्हासावरील ते एक भाष्य होईल, असे दिवस आहेत की, ते अधिक पगाराची मागणी करीत कामावर बहिष्कार टाकतात सहाजिकच विद्यार्थी जगत देखील अध्यापकाकडे त्यांना आवडेल तसेच शिकविणारे त्याचे पगारी नौकर म्हणून पाहणार'', अशी कडाडून टिका त्यांनी कठोपनिषदातील अ १ वल्ली २ ह्या भागातील विवेचनावर भाष्य करतांना केली आहे.

गुरुशिष्य संबंधावर प्रकाश टाकतांना The Essential Teacher ह्या पुस्तकातील Gurus, Teachers and Perseptor ह्या लेखात प.पू. गुरुदेवांनी गुरुंची मानवी जीवनात अनिवार्यता स्पष्ट केली आहे. कोणतेही कार्य यशस्वीपणे पार पाडण्यासाठी व्यक्तिला योग्य मार्गदर्शकाची गरज असते ही बाब स्पष्ट करुन प्रत्येक थोर व्यक्ती ही आपल्या गुरुच्या मार्गदर्शनानेच थोर झालेली आहे. ह्या मुद्यावरील प्रकाश टाकला आहे. शिक्षक आणि अध्यापन ह्यातील संबंध व्यक्त करतांना ते म्हणतात, "The relationship between the teacher and the tought is exactly like the relationship of Gardener and the flower on the bush". माळी हा फुले निर्माण करीत नाही. तो रोपट्याची काळजी घेतो. त्यांना खतपाणी टाकतो, त्यांचे संरक्षण करतो पण फुले येण्याची तो खात्री देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे शिक्षकाचे कार्य आहे. "The teacher job is to nurture the student with right thoughte. The student must be given a conductive and protective environment where he or she need not overstrain to live. But the blossoming the real fragrance and beauty of the personality must come from within". विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसनाच्या कार्यात शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे. प्रत्येक शिक्षकाला प्रत्येक स्तरावर अध्यापन करता येईल अशी अवास्तव भूमिका प.पू. गुरुदेवांची नाही. ज्याप्रमाणे अध्ययनाचे स्तर असतात तसेच अध्यापनाचेही स्तर असतात व त्याच स्तरावर शिक्षक अध्यापन करु शकतो. उपनिषदामध्ये शिक्षकाचे जे दोन गुण सांगितले त्यावर प.पू. गुरुदेवांनी ह्या लेखात भर दिला आहे. ते म्हणतात, The upnisads summarize the qualification of teacher in two terms strotriya (oen who is a master of scripture) and Brahmanista (one who is well established in the experience of truth) without the knowledge of scripture the teacher will not be able to convey his wisdom to the disciples. केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. चांगल्या शिक्षकाचे आणखी दोन गुण गुरुदेवांनी स्पष्ट केले आहेत.

1) His behavior in the world must be perfect.

2) A perceptor must have large heartedness flowing with kindness and patience.

हे दोन्हीही गुणधर्म असल्याशिवाय त्याला true perceptor म्हणता येणार नाही. शिक्षक हा विद्यार्थ्यांमुळे ओळखला जातो. Perceptor ची संकल्पना स्पष्ट करतांना गुरुदेव म्हणतात, Our perceptor is he who inspires us to live a nobles life and in whose presence we feel elevated. ही भूमिका स्पष्ट करतांना गुरुदेवांनी आपली शिक्षकाबाबतची मते मांडली आहे. पण हे गुणधर्म केवळ ईश्वरातच असतात असेही त्यांनी ह्याच लेखात नमूद केले आहे.

तैतरीय उपनिषदाच्या प्रस्तावनेत गुरुदेवांनी नमूद केले आहे की, आचार्य आणि छात्र हे दोघेही पूर्णपणे एकमेकांशी सुसंवादी झाले पाहिजेत तरच आचार्यांचे शब्द इष्ट ध्येयाबाबतचे महत्व छात्राच्या मनावर बिंबवू शकतात. शब्द हे ऐकणाऱ्यांच्या मनात केवळ अपेक्षी विशिष्ट अर्थ लहरीच निर्माण करीत असतात. मी जेव्हा ''कप'' शब्द उच्चारतो तेव्हा तो शब्द डोक्यात शिरतो आणि मनात निर्माण झालेल्या संवेदना कपाच्या आकाराच्या आणि त्याच्या उपयोगासंबंधीच्या स्मृतीलहरी उत्पन्न करतात. अशा तऱ्हेने परस्परांना परिचित असलेल्या अनुभवांची देवाण-घेवाण करण्यासाठी भाषा हे सुटसुटीत माध्यम ठरते. पण जेव्हा ऐकणाऱ्याला तत्सम अनुभवाचा प्रत्यय आलेला नसतो तेव्हा तो अनुभव दुसऱ्याला सांगण्यासाठी वापरलेली तीच भाषा समजण्यास अवघड असते आणि म्हणूनच आचार्य छात्र ह्यांनी सुसंवादी होणे आवश्यक आहे. पण आज समाजात तथाकथीत गुरुबाबत ज्या कल्पना आहेत. त्यावर टिका करतांना ते म्हणतात, ''आजचे हे दिवस एका बाजूने अंध आणि अप्रबुध्द गुरु पूजनाचे आहेत तर दुसऱ्या बाजूने ते गुरु अवहेलनेचेही आहे. ज्यंचा आचार्यावर विश्वास असतो ते एखाद्या कळपातील एका जनावराप्रमाणे हाकारले जातात आणि जेव्हा ते गुरुपोदेश ऐकतात आणि त्यानुसार साधन मार्ग अनुसरतात तेव्हा त्याच्यामध्ये कसलाही सक्रिय उत्साह आढळत नाही किंवा त्यांच्यात सुबुध्दपणे दक्षतापूर्वक आढावा घेण्याची कुवत नसते.

गुरुशिष्य संबंधावर त्यांची कार्य व कर्तव्यावर प्रकाश टाकणारा तैतरीय उपनिषदातील अनुवादक ११ मधील दीक्षांत उपदेशावरील प.पू. गुरुदेवांचे भाष्य म्हणजे ह्या विषयातील कळस ठरेल.

"हा विभाग विषयानुरुप उपशिर्षकाखाली विचारात घेता येईल.''

१) समाजाच्या आणि स्वत:च्या संदर्भात आपली जीवन पध्दती नियमीत करणारा.

२) मागील पिढी व चालू वाडवडिल यांच्याशी असणारे आपले स्वत:चे सहसंबंध यांचे नियंत्रक करणारा उपदेश.

३) स्वत:चे स्वत:शी आणि आपल्या आचार्याचे नाते.

४) समाजातील ज्ञानी व सूज्ञ लोकांच्या बाबतीतील आपला दृष्टिकोन.

५) परोपकार व दानधर्म या विषयी जीवनातील नियम.

६) जीवनातील स्वत:ची कर्तव्ये व आचार याबाबतच्या शंकांवर उपाय.

७) आपल्या दुसऱ्याशी असलेल्या संबंधाच्या बाबतीत जगात खोटेपणाने लादल्या गेलेल्या शंका.

भारतीय शिक्षण परंपरेतील गुरुशिष्य संबंधावर गीता अ ३ मधील विवेचनात गुरुदेवांनी प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात, "भारतामध्ये गुरु आणि शिष्यामधील नाते काही अतुलनीय असते. गुरुची परीक्षा घेऊन तो चालताबोलता ईश्वर आहे अशी खात्री पटल्यावरच शिष्याच्या मनात गुरुविषयी पूज्यभाव आणि संपूर्ण शरणागतीची भावना निर्माण होत असते. एखाद्याला शिष्य म्हणून स्विकारल्यावर त्याला ममतेने, प्रेमाने व आपुलकीने मार्गदर्शन करणे हे आपले कर्तव्य आहे, असे मानतो. आपल्या मुलाबद्दल वडीलांना जेवढा जिव्हाळा असतो त्याच्या हजारो पटींनी गुरुला शिष्याबद्दल प्रेम असते. आपल्या शिष्याने आपण दिलेल्या प्रत्येक सूचनेचे तंतोतंत पालन करावे असे जर वाटत असेल तर त्यांच्या मनातील सर्व शंकाचे निरसन करणे ही गुरुची जबाबदारी ठरते. शिष्याने अगदी मुर्खासारखे प्रश्न विचारले तरी सहानुभूतीने आणि प्रेमाने आपल्या शिष्याला संदेश स्पष्टपणे समजावून दिला पाहिजे. प्राचीन काळचे अतिशय सुरेख उदाहरण तैतरीय उपनिषदाच्या शिक्षावलींवर भाष्य करतांना दिले आहे. प्राचीन काळी छात्राच्या महत्वाकांक्षेला त्यांच्या छात्र वेळेला आकार दिला जात असे. आचार्य व छात्र मिळून बुध्दीमत्ता, आत्मसंयमन, सदाचार, नैतिक शुचिता, भावनिक मनोबल व मनोवैज्ञानिक स्थैर्य असणारे जवळचेच दूरचे असे अभ्यासक चहुबाजूंनी येत राहो, अशी प्रार्थना करीत असत. अर्थात हाच गुरुशिष्य संबंधातील महत्वाचा दुवा आहे.'' ह्या उलट आजच्या शिक्षण पध्दतीत

हा सहसंबंध स्पष्ट करतांना गीता अध्याय ४ थ्या च्या प्रस्तावनेत गुरुदेव लिहितात, ''ऐहिक शास्त्र कोणताही शिक्षक विद्यार्थ्याला यशस्वीपणे शिकवू शकतो व ते त्याच्या मेंदूत भरवू शकतो. ह्या शिक्षणपध्दतीत अशा शिक्षकाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम, श्रध्दा किंवा आदर असावा अशी मुळीच आवश्यकता नसते. ह्या ज्ञानदानाच्या बाबतीत शिक्षक म्हणजे केवळ एक शिक्षण देण्याचे उपकरण असणे अशा तऱ्हेने आज आधुनिक कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणजे वर्गातील फळा, प्लॅटफॉर्म किंवा बाक यांच्या इतकेच एक केवळ बोलके उपकरण असते. परंतु उलटपक्षी मानव संस्कृतीचा दरवळ नैतिक दर्जा किंवा सदाचाराची झळाळी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला प्रदान करावयाची असेल तर विद्यार्थ्यांनी आपल्या मनात प्रेम, पूज्यभाव, भक्ती व सख्यत्व ह्या भावना मनात बाळगून गुरु सन्निध जाणे आवश्यक आहे.

अलीकडच्या काळातील परीक्षा पध्दतीवर आक्षेप घेऊन ह्या परीक्षापध्दती मध्ये विद्यार्थी अनेकदा नाऊमेद होतो. पण ह्यावेळी शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची असते. ह्याबाबत कठोपनिषदाच्या विवेचनात प्राचीन काळचे उदाहरण गुरुदेवांनी दिले आहे व त्याकाळी अशा परीक्षा नव्हत्या. ह्याबाबीकडे त्यांनी विशेष लक्ष वेधून घेतले आहे. ते म्हणतात, ''जर एखाद्या विद्यार्थी दुर्दैवाने अपेक्षित वैदिक दर्जापेक्षा कमी पडत असेल तर त्याला कायमचा निरुपयोगी ठरवून तुच्छ लेखले जात नव्हते. तर आचार्याची शिकवण त्याला शुध्द करणारी आणि त्यायोगे त्याला कार्यक्षमतेच्या उच्च दर्जाप्रत वर उचलणारी असे.'' मुंडकोपनिषदाच्या विवेचनात गुरुदेव म्हणतात, ''आपण आजकाल गुरुकडे केवळ त्याच्यावर टिका करण्यासाठी किंवा त्यांचे दोष काढण्याकरीता जातो. त्याच्या अगदी उलट आपल्या प्राचीन संस्कृतीचा वैभवकाली साधक आपल्या आचार्यांकडे इतक्या आदराच्या आणि पूज्य भावनेने जात असत. तो आदर आणि पूज्यभाव आज दृष्टोत्पत्तीस येत नाही. गुरुच्या समोर शिष्य कमी अधिक बोलण्यास धजावत नसे. त्याला जे काही सांगायचे असेल ते तो कमीत कमी शब्दात सांगत असे आणि राहिलेले अर्धे अधिक गुरुच्या दयाळू आणि सहानुभूतीपर्ण प्रथेला वाचता येण्यासारखा आपल्यामनोभावात अव्यक्त ठेवीत असे. आचार्यांची शिष्याशी वागण्याची ही पध्दत योग्य होती.

गुरु आणि शिष्य संबंधाची परमावधी म्हणजे कठोपनिषदातील श्लोक आहे, असे गुरुदेवांचे मत आहे. गुरु आणि शिष्य हे दोघेही अध्यापन-अध्ययन व्यावसायकार्यास

कोणत्या सहभावनेच्या वृत्तीने एकमेकांकडे आली त्याची शांतीपाठा वरुन लक्षात येते. अध्ययन आणि अध्यापनात सहभावना ही महत्वाची. पण आज ही सहभावना लक्षात येत नाही ही खंत गुरुदेवांनी व्यक्त केली आहे हा शांतीपाठाचा भाव आशय म्हणजे जीवनोपयोगी मूल्यांचा संच आहे. आंतरराष्ट्रीय जीवनासाठी मनुष्याला त्याच्या जीवनात जास्तीत जास्त शांती व आनंद वाढविण्याकरिता तो सांगितलेला आहे. जगाला जर शांततेच्या मार्गाने जावयाचे असेल आणि सांस्कृतिक परिपूर्णतेच्या अधिक विशाल मंदीराकडे जाण्याचा कठोर प्रवास त्याला करायचा असेल तर त्या जगाची पुनर्रचना ज्या मूल्यावर करता येईल अशी कदाचित एवढेच जीवनमूल्ये आहे.

प्राचीन काळी गुरु शिष्याचे संबंध अधिक निकट असत. शिक्षक हा आपल्या विद्यार्थ्यांच्या आध्यात्मिक पिता असे व विद्यार्थी हा शिक्षकाचा आध्यात्मिक पूत्र असे. पण आज तशी भावना नाही पण किमान गुरुशिष्यांमध्ये पितापूत्राचे नाते महत्वाचे आहे. शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकमेकांना समजून घेणे नितांत गरजेचे आहे. त्यांच्यातील आध्यात्मिक नात्याची वीण ही घट्ट असावी. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मित्र व पथदर्शक असावा. विद्यार्थ्यांना शिक्षका प्रति प्रेम व आदर असावा. पण हा आदर व प्रेम हे शिक्षकांनी संपादीत करायला हवे. तरच त्याचे अध्यापन हे प्रभावी होऊ शकते. शिक्षक स्वत: हे नैतिक आचरण करणारे असावे. त्यंचे इतरांशी संबंध हे नितीमत्तापूर्णच असावे. आध्यात्मिक जीवनाचे नेतृत्व त्यांनी करायला हवे. आपल्या कर्तव्याप्रती त्यांच्या मनात पूज्यभाव असायला हवा.

## ४) अध्ययन व अध्यापन पध्दती :-

कोणत्याही शिक्षण प्रक्रियेमध्ये अध्ययन-अध्यापनाला अनन्यसाधारण महत्व आहे. मग हे अध्ययन-अध्यापन औपचारिक असो अथवा अनौपचारिक ह्या पध्दतीबाबत आजपर्यंत अनेक दृष्टिकोन मांडण्यात आले आहेत. प.पू. गुरुदेवांनी ह्यावर आपल्या लेखात भर दिला आहे व काही पध्दतींवर ह्यांनी भर दिला आहे. त्या पध्दती आजही शिक्षणक्रमात प्रचलीत आहेत. आजच्या शिक्षण पध्दतीतील Text book creaming व Notes dictatiing ह्या पध्दतीवर त्यांनी कडाडून टिका केली आहे. मुळातच कोणत्याही अध्ययन-अध्यापनाचा पाया हा मानवी मन आहे, असे गुरुदेवांचे मत आहे. सर्वसाधारणपणे नित्याच्या ओढाताणीच्या

तणावाच्या आणि स्पर्धात्मक जीवनामुळे आपण विमनस्क होऊन मनाने थकून गेलेले असतो. त्यामुळे व्यवहारात जरी मनाने आपण कार्यक्षम ठरत असलो तरी अभ्यास वर्गात शिरल्यावर जे सूक्ष्म मुद्दे निघतात ते समजण्याइतपत कार्यक्षमता त्या मनात रहात नाही. भावनेच्या व विचारांच्या उपकरणंना शुध्द करण्याची व त्यांची जुळणी करण्याची आवश्यकता असते. ही पूर्वतयारीची मानसिकता व्यक्त करुन गुरुदेवांनी ह्याचा सहसंबंध विज्ञानाच्या प्रयोगशाळेची जोडला आहे. ज्याप्रमाणे आधुनिक प्रयोग शाळेत विविध उपकरणांची जुळवाजुळव करावी लागते. त्याचप्रमाणे अध्ययनासाठी बसले असतांना आपली सर्व मानसिक शक्ती पूर्णपणे केंद्रीत करण्यासाी सूक्ष्म आंतरिक जुळवाजुळव करावी लागते. प.पू. गुरुदेवांचा विचार आधुनिक शिक्षण शास्त्रातील ''सज्जता प्रवर्तन'' ह्या तत्वाशी मिळताजुळता आहे. कोणत्याही विषयाचे अध्ययन करण्यापुढे त्या विषयाबाबतचे पूर्वज्ञान, तसेच त्या विषयाबाबतची सकारात्मक दृष्टी ह्या बाबी महत्वाच्या असतात. अध्ययनापूर्वी त्या विषयाबाबतची विद्यार्थ्यांची वैचारिक, मानसिक, भावनिक पार्श्वभूमी ही अतिशय महत्वाची असते. पुढे प.पू. गुरुदेव ह्या बाबींवर भर देतात की कोणत्याही विषयाचे अध्ययन करण्यासाठी त्या विषयाबाबत शास्त्राबाबत आदर श्रध्दा असावा लागतो. त्या शिवाय कोणत्याही विषयाचे अध्ययन होऊ शकत नाही. ह्या ठिकाणी एक बाब महत्वाची आहे की प.पू. गुरुदेवांनी ज्या पध्दती मुळातच अध्ययनाच्या अथवा अध्यापनाच्या सांगितल्या आहेत त्या अध्यात्मवादी आहेत. अर्थात अध्यात्मशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या लागू आहेत. पण ह्या पध्दतीचा अभ्यास इतर भौतिक ज्ञानाच्या बाबतीत केला तर हे ज्ञानाचे उपयोजन करणे हे सोयिस्कर ठरेल. ह्या पध्दती पुढीलप्रमाणे -

## तुलना पध्दत :-

तुलना करणे हा आकलनाचा एक महत्वाचा भाग आहे, मार्ग आहे. एखाद्या वस्तुला त्याच्या विरुध्द वस्तू नसेल तर आपणास तिचे ज्ञान प्राप्त होणार नाही. जीवनाचा व्यापक अनुभव घेत असतांना मानवाच्या जीवनात अनेक द्वंद्वे येतात. ह्या द्वंद्वांच्या अस्तित्वामुळे मानवी बुध्दीत ह्यातील विरोधाभासाची नकळत नोंद होत असते व ह्या तुलनेमुळे प्राप्त ज्ञानाची दृढता वाढते. पण ह्यातील प्रत्येक देहाबाबतचे तिचे पूर्वज्ञान हे पक्के असते. सुखाच्या दु:खाच्या, अंधार प्रकाशाच्या बुध्दीच्या संकल्पना पक्क्या असतात. यामुळेच एका विशिष्ट

परिस्थितीत बुध्दी तुलना करण्यास सुरवात करते. ह्या तुलनेतून बुध्दीच्या स्तरावर संकल्पना पक्क्या होतात. अशी तुलनात्मक अध्ययनासाठी वर्गांतर्गत परिस्थिती निर्माण करणे ही जबाबदारी अध्यापकांची असते.

## आत्मनिरिक्षण पध्दती :-

प.पू. गुरुदेव हे वेदांताचे अभ्यासक होते. परिणामी त्यांनी ही अध्ययन पध्दतीचे अतिशय शास्त्रशुध्द विवेचन केले आहे. ध्यान आणि जीवन ह्या पुस्तकात त्यांनी ह्या पध्दतीचे विवेचन कले आहे. आपण प्रत्यक्षात कसे आहोत आणि कसे असल्याचे आपण समजतो. ह्यामधील विरोध प्रत्येक व्यक्तिने दूर करावा. आपला अहंकार आपल्यापासून दूर करणे आणि त्याचे शुध्द नि:पक्षपातीपणे निरीक्षण करण्याचा सराव करणे हेच आत्मनिरिक्षण आपले व्यक्तिमत्व किती फसवे आहे हे स्पष्ट करते. आपल्या आंतरिक जीवनात पुष्कळशा प्रमाणात दांभिकता, उध्दटपणा, हास्यास्पद मूढता, दोषास्पद क्रौर्य, ह्यांनी बुडून गेलेला श्री. हाईड दडलेला असतो. Introspection and Self analysis is the only method of learning to know ourselves. Regular practice in detaching ones ego from oneself and watching it with pure impartial judgement is introspection आत्मनिरिक्षण पध्दती ही व्यक्तिगत विकासाकरिता महत्वपूर्ण आहे. ह्याचे महत्व विषद करतांना प.पू. गुरुदेव म्हणतात, "एकदा तुमची थोडी व्यक्तिगत व्यंगे, मत्सर, लालसा, क्रोध, द्रव्यलोभ, स्वार्थबुध्दी तुम्हाला कळून आले आणि हे दुर्गुण नष्ट करुन तुम्ही त्याच्या अगदी विरुध्द असलेले दिव्य गुण भक्ती, श्रध्दा, शांतता, समचित्तता, मनाचा उदारपणा, सर्वांबद्दल नि:स्वार्थी प्रेम काही प्रयत्न करुन घेता आले म्हणजे तुम्हाला अढळून येईल की तुम्ही निश्चितपणे पूर्वीपेक्षा अधिक सुखी झाला आहात. तुम्हाला अधिकाधिक यश मिळत जाईल. पुष्कळ लोकांना तुम्ही हेवेसे व्हाल. अजाणता तुम्ही आपल्या सभोवती सर्वत्र आनंद पसरविण्यास सुरवात कराल. स्वत:च्या व्यक्तिमत्वाचे योग्य दिशेने वळविलेल्या सुसंगत विचारांनी संशोधन केल्यानंतर त्यास सुधारणा घडवून आणल्यानंतर त्यामुहे इतर सर्व प्राणीमात्रांचे लक्ष तुमच्याकडे वेधले जाऊन त्यांना तुमचा सन्मान करणे भाग पडते'' प्रत्येक व्यक्तिमध्ये अशारितीने परिवर्तन झाल्यास समाज व पर्यायाने राष्ट्र सुधारणा निश्चित घडून येईल. आंतर निरिक्षण

कसे व केव्हा करावे ह्याबातचे मार्गदर्शनही प.पू. गुरुदेवांनी केले आहे. आंतरनिरिक्षणाचा अत्युत्तम वेळ म्हणजे रात्रीचे जेवण झाल्यावर लगेचच प्रत्येकात आनंदाची भावना निर्माण होत असते. मनात समाधानाचा पूर लोटलेला असतो. उद्याच्या किंवा नेहमीच्या कोलाहलाने आणि गर्जनांनी मनात उद्‌भवण्यास राजी नसतात. आदल्या दिवसाच्या निराशा जेवणा नंतरच्या शांततेला अस्वस्थ करण्यास धजावत नाही. खंडन आणि मंडन करण्यास हाच पवित्र काल असतो. तुमच्यातील मनोवैज्ञानिक मानव ह्याक्षणी फार ग्रहणशील आणि ठळकपणे पारदर्शकही असतो. अशा ह्या निवांत अर्ध्यातासात मन विवेकाच्या आसनावर स्थीर होऊ द्या. तुमची दिवसभराची कर्मे त्यामधील हेतू, विचार आणि भावना शिस्तीने पावले टाकीत जाऊ द्या.

जेवणानंतरच्या विश्रांतीकाळात तुम्ही दिवसभर केलेली कृत्ये आपल्या दृष्टीसमोर आणा. जीवनाच्या प्रतिदिनी केल्या जाणाऱ्या नाट्यप्रयोगात तुम्ही आळीपाळीने खलपुरुषाची आणि नायकाची भूमिका वठवित होतात हे लक्ष देऊन पहा. तुमच्यातील साक्षी आपण अंतर्गत नकली नट होतो हे पाहून लज्जीत होतो. तुम्ही जसे आहात त्याची तुम्हाला स्वत: प्रचिती येणे व यथार्थ जाणीव घेणे एवढे एकच तुमच्या महत्वाच्या व्यक्तिमत्वाचा तात्काळ गुणोत्कर्ष करण्यास मनोवैज्ञानिक दृष्ट्या पुरेसा आहे. फसवी क्षणिक मूल्ये आपोआप स्वत: गळून पडतील आणि न्याय चिरकालीन मूल्यांची स्थापना त्या ठिकाणी होईल. आपण कधीही समजून उमजून कोणताही ज्ञात असलेला दोष आपल्या व्यक्तिमत्वात राहून देणार नाही. केवळ आपल्या अज्ञानामुळे आपल्यात पशुत्व वाढीस लागते. ''मी सुखी झालो पाहिजे.'' ही भोंगळ कल्पना मानवाला सुख प्रदान करु शकणार नाही. सुखी व्हायचे असेल तर सत्य आणि वास्तव सुख मिळविण्याकरिता जरुर असणारी परिस्थिती उभारुन सुखाची निर्मिती करा. विवेकी निवडीमुळे जर योग्य अधिष्ठानाची हव्या असलेल्या दृष्य वस्तुंची गाठ पडेल तर सुखाचा अनुभव प्राप्त होईल. त्यापैकी एका गोष्टीचा दुसऱ्या गोष्टीशी सुसंवाद नसेल तर दु:खाची निर्मिती होते. अपण आपल्या आंतरिक मनावर अखंड पाळत ठेवायला हवी. ह्यासाठी आंतरिक मनोऱ्यावर, बुध्दीवर पहारेकरी म्हणून नेमा. आंतरिक गलबत्याच्या दिवसभर चालणाऱ्या तुमच्या कामकाजावर त्या बुध्दीला एक शांत निरिक्षक म्हणून राहू द्या आणि तिला तुमचे विचार, उच्चार आणि आचार ह्यामध्ये असलेले हेतू, मतलब, उद्दिष्टे ह्यांचे मूल्यमापन करु द्या हेच आत्मपरिक्षय होय. प्रत्येक दिवस संपतांना आत्मनिरिक्षिणाचा सराव करा. त्या दिवशीच्या घटना, विचार,

उच्चार, आचार, मनोविकार आणि भावना ह्यांना सलामी देणाऱ्या संचलनाची आज्ञा करा. तुम्ही मात्र स्वत: त्यापासून दूर रहा आणि एकेका व्यक्तीची एकेका गटाची आणि नंतर सामुहिक अशी नि:पक्षपातीपणे पाहणी करीत करीत त्याच्या सलामीचा स्विकार करा. आत्मपरिक्षण करा! गुण दोषांचे संशोधन करा! दोषांचा निबंध करा व उन्नत व्हा!

ह्या बाबीस ताबडतोब सुरवात करा! सुरवातीचे ह्याबाबतचे प्रयत्न समधानकारक ठरतील. तरी सुध्दा अभ्यास सुरु ठेवा. प्रत्येक दिवशी तुम्ही केलेल्या एकूण व्यवहारातील दौर्बल्य, उणीवा आणि पशुत्व शोधून काढण्याचा प्रयत्न करा, ह्यालाच 'शोधन' असे म्हणतात.

आंतरिक सुधारणा ही नेहमी दैवी संदेशाच्या स्वरुपात दिसून येते. ज्याक्षणी व्यक्ती आपले दोष शोधून काढतो आणि त्याला त्याची खरोखर लाज वाटते त्याक्षणी त्याची चुकीची स्वभाव वैशिष्ट्ये मृत झाली असतात, त्याला 'निषेध' म्हणतात.

ज्या क्षणी एखाद्या मनोदौर्बल्याचा पराजय झालेला आढळून येईल त्याच वेळी आंतरिक व्यक्तिमत्वात विरोधी सद्‌गुणांची बदली करायला हवी. प्रत्येक दिवशी त्याचा आचरणावर काय परिणाम होतो ते तपासून पहायला हवे. म्हणून असे आढळून येते की, नवा सद्‌गुण बदली योजना वृध्दिंगत होऊन लवकरच नवीन गुण हा स्थायीभाव बनलेला असतो.

व्यक्तिमत्व विकसनाची ही आत्मनिरिक्षण पध्दती ही पुढील आकृतीवरुन अधिक लक्षात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Introspect | 2) | Detect |
| 3) | Negate | 4) | Substitute |

वरील चार घटक हे आत्मनिरिक्षण पध्दतीचा महत्वाच्या पायऱ्या आहेत.

## विरोधाभास पध्दत :-

गीता अध्याय ८ वा ह्यावर भाष्य करीत असतांना प्रस्तुत पध्दती बद्दल गुरुदेवांनी भाष्य केले आहे. ह्या पध्दतीनुसार दोन विसंगत विचार घटकांची योजना अशा

प्रकारे केली जाते की एक दुसऱ्याशी तुलना करीत असतांना विद्यार्थ्यांच्या मन: पटलावर उत्कृष्ट असेल तोच चमकून जाईल. केवळ विरोधाभासातच भ्रामक अस्तित्वाच्या अभावाची व्याख्या करता येते आणि बुध्दीने त्याचे स्पष्टीकरण करता येते. एखादा युक्तिवाद पटवून देण्यासाठी दोन विरोधी घटक एकत्र आणले जातात. जेणे करुन प्रत्येक घटक दुसऱ्याने पुरविलेला पार्श्वभूमीवर अधिक प्रभावीपणे उठून दिसेल. ही विरोधाभासात्मक पध्दती हे अध्ययनाचे माध्यम प.पू. गुरुदेवांनी सांगितले आहे.

## अध्ययन पूर्व तयारी :-

प.पू. गुरुदेवांनी अध्ययन पूर्व मानसिक स्थीती, मनाची तयारी ह्यावर विशेष भर दिला आहे. गीता अध्याय पहिला मध्ये विवेचन देत असतांना प.पू. गुरुदेव म्हणतात, ''सर्वसाधरणपणे नित्याच्या, ओढाताणीच्या, तणावाच्या आणि स्पर्धात्मक जीवनामुळे आपण विमनस्क होऊन मनाने थकूल गेलेलो असतो. त्यामुळे व्यवहारात जरी मनाने आपण कार्यक्षम ठरत असलो तरी अभ्यासवर्गात शिरल्यावर जे वर्गांतर्गत सूक्ष्म मुद्दे उद्‌भवतात ते समजण्या इतपत कार्यक्षमता मनात रहात नाही. भावनेच्या आणि विचाराच्या उपकरणांना शुध्द करण्याची व त्यांची जुळणी करण्याची आवश्यकता असते. अध्ययनासाठी बसलेले असतांना आपली सर्व मानसिक शक्ती पूर्णपणे केंद्रीत करण्यासाठी आणखी काही अधिक सूक्ष्म आंतरिक जुळणी करावी लागते. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे, ''आपल्याला एखाद्या आधुनिक प्रयोग शाळेत पहावयास मिळेल. कोणताही शास्त्रज्ञ आपल्या प्रयोग शाळेत काम करतांना त्याचा मदतनीस सूक्ष्मदर्शकाची दोन्ही भिंगे आधीच व्यवस्थित जुळवून ठेवीत असेल. ही जुळवाजुळव त्या मदतनिसाच्या स्वत:च्या दृष्टीसाठी योग्य असेल. ती सूक्ष्म जुळवाजुळव करावी लागेल. अशा रितीने सूक्ष्मदर्शकाखालील वस्तु शास्त्रज्ञाला जास्तीत जास्त चांगल्या रितीने दिसावी यासाठी त्याला सूक्ष्मदर्शकामध्ये स्वत:च अधिक कुशलतेने व्यवस्था करावी लागेल.

वरील सर्व विवेचनावरुन लक्षात येते की, कोणत्याही प्रकारच्या अध्ययनाला प्रारंभ करण्यापूर्वी शरीर, मन, बुध्दी ह्या तिनही घटकांची एकात्मता अतिशय महत्वाची आहे व मानव शास्त्रीय सिध्दांत आधुनिक सज्जता प्रवर्तन ह्या तत्वाशी मिळणारा आहे. व्यक्ति आपले शरीर, मन व बुध्दी ह्यातील एकात्मता साधल्या शिवाय अध्ययन करु शकत नाही.

## कार्यकारण पध्दती :-

प्रश्नोपनिषदावर भाष्य करतांना ह्या पध्दतीबाबतचे विवेचन प.पू. गुरुदेवांनी केले आहे. बुध्दीला ज्याचा बोध होतो ते आकलन करुन घेणे हा तिचा स्वत:चा निरर्थक प्रयत्न आहे. कारणांचा शोध घेण्याच्या पध्दतीनेच बुध्दी विचारणा करु शकते. वस्तुच्या कारणांचा शोध घेणे एवढी एकच पध्दती बुध्दीला तिच्या योग्य आकलनासाठी उपलब्ध असते. अशाप्रकरे जेव्हा जेव्हा कार्य दिसून येते तेव्हा तेव्हा बुध्दीला ते समजून घेण्याचा प्रयत्न म्हणून त्याच्या कारणांचा शोध घ्यावयास पाहिजे. मनाला येणाऱ्या बोधाचे स्पष्टीकरण शोधण्यास बुध्दी उतावीळ असते. बुध्दी फक्त तात्कालिक कारणांचा शोध घेऊ शकते. प्रत्येक वेळी ती ज्ञात कार्याचे कारण शोधून काढते. पण ते कारण स्वत:च त्याच्यापेक्षा ही पूर्वीच्या अशा दुसऱ्या कारणांची मागणी करणे हे कार्यकारण भाव शोधन हा कधीही न संपणारा खेळ ठरतो.

वरील विवेचनावरुन लक्षात येते की, कार्यकारण भाव शोधन हे बुध्दीच्या स्तरावरील प्रक्रिया आहे व ही प्रक्रिया मानवी बुध्दीला कार्यकारणाच्या मुळाशी जाण्यास प्रोत्साहित करते व ह्यातून खऱ्या अर्थाने मूलभूत संशोधनाची पक्रिया घडून येते.

## विचार पध्दत :-

व्यक्तिगत अध्ययन पध्दतीतील ही अतिशय महत्वाची अशी पध्दत प.पू. गुरुजींनी सांगितली आहे. व्यक्तिगत अध्ययनात सिध्दांतावर सतत विचार केल्याने खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होते. विचर ह्या संज्ञेला पर्यायी इंग्रजी शब्द नाही. विचार करणे, चिंतन करणे, कार्यकारण भाव जाणणे, विश्लेषण करणे इत्यदी शब्द विचार पध्दतीचा बोध घडवून आणू शकत नाही. विचारामध्ये काही अत्यावश्यक मानसिक आणि बौध्दिक शिस्तबध्दतेसह या सर्व बाबींचा संयुक्तिकरित्या समावेश होतो. ही मन बुध्दी सुसंस्कारित केल्यावर व्यक्तिला दृढकथने उलगडता येतात. त्यातील लक्षणार्थ व सुचितार्थ याची अनुभूती घेता येते. ह्यालाच अध्ययनाची विचार पध्दत म्हणतात. एखाद्या सिध्दांतातील आशयापर्यंत त्यातील गर्भित अर्थापर्यंत वेदांताच्या अभ्यासकाकरिता जरी ही पध्दत सांगितली असली तरी आधुनिक शास्त्रात एका ठोस निष्कर्षाप्रत पोहचण्याकरिता ही पध्दती अतिशय उपयुक्त अशी आहे.

## बौध्दिक अन्वषेण पध्दती :-

बौध्दिक अन्वेषण पध्दत ही व्यक्तिगत अध्ययनाची नावीण्यपूर्ण पध्दत गुरुदेवांनी थोडक्यात परिपूर्णपणे विषद केली आहे. ह्या पध्दतीत खालील पायऱ्यांचे विवेचन केले आहे.

१) एखाद्या तत्वास आधारभूत अशी सर्व माहिती गोळा करणे.

२) माहिती प्रयोग व प्रात्यक्षिकाच्या आधारे पडताळून पाहणे.

३) सिध्दांत प्रस्थापित करणे.

ह्याचे उदाहरण देतांना असे देण्यात आले आहे की, ''माती हे सर्व घरांचे सारतत्व आहे'' हे विधान तेव्हाच प्रस्थापित होईल की जेव्हा सर्व घरांमध्ये माती आहे इतकेच नव्हे तर सर्व आकारांचे सर्व मापांची घरे मातीमध्ये असतात. असेही आपण सिध्द करु शकू. प्रत्येक घटकामधील माती पाहण्यासाठी आपल्याला केवळ घरापासून माती वेगळी आहे हे पाहण्याचे शिक्षण आपल्या डोळ्यांना द्यावे लागेल.

बौध्दिक अन्वेषण पध्दती ही एखाद्या तत्वांच्या मुहाशी जाणे व त्याचे अधिष्ठानावर एखाद्या सिध्दांत प्रस्थापित करणे ह्याच्याशी निगडीत आहे.

## व्यक्ती अभ्यासाच्या क्षेत्रात केव्हा येतो? :-

गुरुदेवांनी वेदांतात वर्णन केलेल्या अभ्यासांच्या पध्दतीवर आधुनिक काळात अनुसरुन प्रकाश टाकला आहे. पण आपण रुढ अर्थाने त्याला ''अभ्यास'' म्हणतो. त्या अर्थाने त्यांना तो मान्य नाही. अभ्यास ही संकल्पनाच मनाशी निगडीत आहे. अभ्यास म्हणजे त्याच त्या विषयांच्या विचारांची पुनरावृत्ती. मनाच्या अभ्यासाची पध्दत सांगतांना प.पू. गुरुदेव म्हणतात, ''मनाची छाननी करुया? त्यातील अनुभवांची कारण मिमांसा पाहू या? स्वत:शी युक्तिवाद करुया आपण जीवनामध्ये किती देतो व किती घेतो ते काळजीपूर्वक तपासून पाहू या! प्रत्यक वेळी तोट्यात जाणारा जमाखर्च जेव्हा आपल्या लक्षात येईल तेव्हाच जरुर म्हणून ज्यायोगे आपल्या आनंदाचा व सुखाचा खजिना पुन्हा काठोकाठ भरेल अशा तऱ्हेने कसे जगावे याचा विचार करण्यात आपण सुरवात करु. लवकरच आपण शास्त्राचा अभ्यास करावयास लागू व त्यामुळे सदाचारी जीवनाचे चमत्कार, नैतिक मूल्यांची बुज राखण्याचा विवेक, आत्मसंयमी

जीवनाचा आनंद आपल्या उन्नतीची रोमंचकता व अहंकेंद्रीत जीव म्हणून जगण्याने होणारी दमछाक ह्या सर्वांची आपल्याला कल्पना येऊ लागेल. ज्या क्षणापासून आपण जाणीवपूर्वक आयुष्य जगण्याच्या प्रयत्नात लागतो त्या क्षणापासून आपण अभ्यासाच्या क्षेत्रात येतो.

मूल्यशिक्षणाच्या संदर्भात ह्या पध्दती अत्यंत उपयुकत ठरणाऱ्या पध्दती आहेत.

## वासनाक्षय पध्दत :-

मानव निर्माण की कला ह्या पुस्तकात वासनाक्षय पध्दतीचे विवेचन गुरुदेवांनी केले आहे. प्रत्येक व्यक्तिमध्ये वासना ह्या विद्यमान असतात. ह्या वासनांचा उगम मनामध्ये होतो. जेवढ्या वासना जास्त तेवढे मन हे विक्षेपीत बनते व जेवढे मानवाचे वासना कमी व उदात्त असतात तेवढेच त्याचे मन शांत तर होतेच पण अशा व्यक्तिच्या हातून सत्कार्य घडून येते. ह्यासाठीच मानवी मनाला विक्षेपीत करणाऱ्या वासना तर नकोच पण त्या ठिकाणी सद्वासना असल्या तर चित्ताची शांतता मानव अनुभवू शकतो. ह्या करिताच गुरुदेवांनी वासनाक्षय पध्दती सांगितली आहे. ह्या पध्दतीचे विवेचन करतांना प.पू. गुरुदेव म्हणतात, आत्मविकासासाठी प्रत्येकाने स्विकारावयाची पध्दती म्हणजे वासनाक्षय पध्दती होय. प्रबल वासनेचा बुध्दीपूर्वक भोगाअंती क्षय करणे ही मानसशास्त्रीय पध्दती आहे. जेव्हा एखादे कर्म हे अहंकार व अहंकेंद्रीत इच्छेने अर्थात मी आणि मला पाहिजे ह्या भावनेतून केल्यास ह्या कर्मामुळे मनात वासनांचे ठसे उमटतात. ह्या वासनाच स्वत:ला कर्माच्या रुपात प्रगट करतात. दवाखान्यात औषध म्हणून ब्रॅण्डी पिल्यास ती सवय बनत नाही पण मला आनंद मिळतो म्हणून जेव्हा मी मद्य प्राशन करतो तेहा मात्र मद्य प्राशनाची सवय दृढ बनते. एका अपराधी मनास एक हत्या व्यावसायिक हत्यार बनविते. पण एका सैनिक अधिकाऱ्याच्या बाबतीत मात्र तसे घडत नाही. म्हणजेच अहंकार केंद्रीत कर्म हे मानवी मनात वासनेचे संस्कार उत्पन्न करतात. अुच्च आदर्शाच्या प्रति समर्पणभावनेने अहंकाररहीत उत्साहपूर्वक भावनेने कर्म केल्यास त्यापासून तात्काळ शांती व आनंद प्राप्त होतो. हाच हिंदु तत्वज्ञानाने कर्मयोग मानला आहे. उच्च आदर्श समोर ठेवून समर्पण भावनेने कर्म केल्यास मन शुध्द होते. वासनांचा क्षय होतो व अशा शांत मनात सम्यक ज्ञानाची प्राप्ती होऊ शकते.

वासनाक्षय पध्दतीचे पुढील सोपान महत्वाचे आहेत.

१) प्रबळ वासनेचा बुध्दीपूर्वक भोग घेऊन त्याचा क्षय करणे.

२) कर्म हे अहंकार विरहीत असावे.

३) कर्म हे अहंकार रहित असल्यास त्यापासून शांती प्राप्त होते.

४) उच्च आदर्श व समर्पण भावनेने युक्त असे कर्म असावे.

वरील बाबींवरुन लक्षात येते की, उच्च ध्येय, आदर्श, समर्पण भाव व निरंहकारी वृत्ती ही वासनाक्षय पध्दतीचा पाया आहे. अभ्यासाने ह्या बाबी वृध्दिंगत झाल्यास मानवी जीवन यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. मूल्यांच्या पुनर्प्रशिक्षणासाठी व मनाच्या पुनर्समायोजनासाठी ह्या बाबी अत्यंत आवश्यक आहे.

वेदांतातील खालील अध्ययन-अध्यापन पध्दतीचा पुरस्कार गुरुदेवांनी केला आहे. १) अध्यारोप पध्दत, २) स्वयं शिक्षण पध्दती, ३) उपासना पध्दती, ४) सहसंबंध पध्दती, ५) चिंतन पध्दती ह्या पध्दतीचा उहापोह तैतरीय उपनिषदाच्या शिक्षावल्ली मध्ये करण्यात आला आहे. ह्यापध्दती आचार्यांनी आपल्या अद्वैतवादात पण सांगितल्या आहेत.

उपनिषद कालीन अध्ययनाच्या मार्गावर त्यांनी भर दिला आहे. ते तीन मार्ग म्हणजे - १) श्रवण, २) स्वाध्याय, ३) जप.

मानवी जीवनाचा उत्कर्ष व्हावा ह्यासाठी त्यांनी आत्मविकास की कला ह्या पुस्तकात ह्या तीन विधी सांगितल्या आहेत.

## १) स्वाध्याय :-

शास्त्राचे अध्ययन पुस्तक वाचत असतांना त्यातील अंतर्भूत विचारानुरुप आपल्या अंतर्गत अनुभूतीच्या व्याख्या ऐकतो आपल्या गुरुसोबत ह्याबाबतची चर्चा करणे ही बाब महत्वपूर्ण ठरते व ह्यासाठी गीता उपनिषद, शास्त्राभ्यास हा महत्वाचा ठरतो.

## २) जप :-

मानवामध्ये मंत्राची पुनरावृत्ती करणे ह्याला जप असे म्हणतात. हा जप करीत असतांना मंत्राचा आशय लक्षात घेणे आवश्यक असते. कारण ह्या मंत्रात आपल्या आत्म स्वरुपाचे निर्देशन केले असते. वारंवार आत्मस्वरुपाच्या चिंतनाने मन:शक्तीत वाढ होते.

## ३) श्रवण :-

अध्ययनाच्या बाबतीत हा अत्यंत महत्वपूर्ण टप्पा सांगण्यात आला आहे. श्रवण हे मन आणि बुध्दी ह्यांचा समन्वय याने शक्य होते. कोणत्याही प्रकारचे अध्ययन हे मन बुध्दीच्या समन्वयाने शक्य आहे.

ह्या तीनही कृतींचा समन्वय महत्वाचा आहे. श्रवणाने आध्यात्मिक जीवनाची अनुभूती येते. स्वाध्यायाने ऐकलेल्या विचारांचे चिंतन होते. जपाने ही तल्लीनता पक्की होते.

वरील प्रमाणे अध्ययन अध्यापन पध्दती सांगण्यात आलेल्या आहेत.

## ५) शिस्त आणि स्वातंत्र्य :-

शिक्षण संकल्पनेबाबत जेव्हा विचार करण्यात येतो तेव्हा शिक्षणांतर्गत असणाऱ्या विविध संकल्पनांचाही त्यात विचार करण्यात येतो. अशा संकल्पनांपैकीच एक संकल्पना म्हणजे शिस्त आणि स्वातंत्र्य. अनेक वर्षापासून शिक्षणात विविध उपशाखांनी जन्म घेतला व त्याच उपशाखेनुसार तत्वज्ञानातील विविध संकल्पनांमध्ये बदल झालेला आहे. विविध तत्वज्ञांनी ह्याबाबत अनेक मते मांडली. प्रत्येक तत्वज्ञांची ह्यातून जीवन दृष्टी लक्षात येते.

प.पू. गुरुदेव हे शिस्तीचे भोक्ते होते. Man of Discipline असे त्यांना उपाधी देता येईल, असे ते शिस्तीचे कडक होते. त्यांनी आपल्या तत्वज्ञानात शिस्तीच्या संदर्भात भाष्य केले पण त्याचसोबत स्वातंत्र्याचा आशयही त्यांनी जनतेपर्यंत पोहोचविला. शिस्त आणि स्वातंत्र्य ह्या संदर्भात ''जीवन ज्योत'' ह्या पुस्तकात प.पू. गुरुदेव म्हणतात, ''स्वातंत्र्य हे मूलतः बुध्दीमत्व, आत्मसंयम व स्वयंशिस्त यावर आधारीत असते. उदा. आपल्या रस्त्याच्या

कडेला असलेले रहदारी नियंत्रक दिवे म्हणजेच आपल्या स्वातंत्र्यावर शासनाने घातलेले बंधनच असते. पण असे निर्बंधच केवळ रस्त्यावरील रहदारीच्या स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त करुन देत असतात आणि स्वैर रहदारीमुळे होणाऱ्या पतनास रोखतात. ह्यासाठी धर्माचरण व धर्मग्रंथाची आवश्यकता प्रतिपादीत करण्यात आली आहे. कारण स्वेच्छेने अंगीकारावयाच्या अशा आत्मसंयमनाची आवश्यकता आपण ज्यायोगे समजून घेऊ शकू व त्याचे महत्व ओळखु शकू अशा शास्त्रीय आत्म विश्लेषणास उपयुक्त ठरणारी माहिती आपणास धर्मग्रंथातून मिळते. ज्याप्रमाणे एखाद्याचे कार्य गुंतागुंतीचे असते पण त्यांचा उपयोग करण्यासाठी त्यासोबत दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शक पुस्तिकेचा जो उद्देश तोच धर्मग्रंथाचा असतो. स्वैराचार हे खरे स्वातंत्र्य नाही ते केवळ एका परिणामाप्रत विनाशाप्रत नेते. नितीनियमांना धरुन राहिल्यामुळे आणि इतरांच्या हक्काची जाणीव ठेवल्यामुळे स्वातंत्र्यावर अधूनमधून बंधने पडतात. तेव्हाच आपण शांती आणि समृध्दीच्या विशाल क्षेत्रावर प्रगत होत जातो. आपल्या राष्ट्राची घटना मानवी स्वातंत्र्यास मान्यता देते व ते प्रस्थापितही करते. परंतु त्याचबरोबर आपणास जे जे करावयास आवडते ते सर्व काही करु देण्यास अटकाव करणारे अनेक आदेश व नियमसुध्दा त्या घटनेत समाविष्ट केले असतात. तेच मानवाच्या स्वातंत्र्यास अर्थ प्राप्त करुन देतात. अर्थातच जीवनामध्ये जगताशी योग्य संबंध राखण्याची कला आपणास माहित असेल तरच आपण आपल्या व्यक्तिमत्वाला शिस्त लावू शकतो व ते सुसंस्कारीत करु शकतो.

वरील सर्व विवेचनावरुन आपल्या लक्षात येते की, शिस्त, बंधने ही आवश्यक आहेतच. मानवाला आपल्या व्यक्तिगत पूर्ण स्वातंत्र्य आहे पण हे स्वातंत्र्य मर्यादेमध्ये राहून घेण्याची मुभा मानवाला आहे व ही मर्यादा घालण्याची जबाबदारी धर्म व धर्मग्रंथांकडे जाते. शिस्तीचे नियम हेच स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त करुन देतात.

ह्याच पुस्तकात त्यांनी स्वातंत्र्याची संकल्पना अतिशय उत्तमपणे विषद केली आहे. ते म्हणतात, ''स्वातंत्र्य हे मनुष्याचे सारतत्व होय. स्वत:करिता क्षणभंगुर आनंद मिळविण्यासाठी वस्तु जगतावर अवलंबून रहावे लागणाऱ्या दास्यत्वाच्या परावलंबित्वापासून जो कोणी स्वत:ला सोडवून घेतो तोच खऱ्या अर्थाने स्वतंत्र होय.'' स्वातंत्र्याची ही संकल्पना ही आध्यात्मिक संकल्पना आहे. माणूस हा आपल्या प्रत्येक आनंदाकरिता बाह्य वस्तु जगतावर

अवलंबून असतो व परिणामी तो ह्या सर्व प्रकारच्या सुखदु:खाचा दास बनतो ह्या दास्यातून सुटण्याचा प्रयत्न प्रत्येक मानवाने करावयास हवा. पण जो व्यक्ती आयुष्यात दास्यात्वातून मुक्त होण्यासाठी शारीरिक मानसिक आणि बौध्दिक शिस्तीचे महान नियम पाळून कार्य करतो त्याला यशाची चिंता करण्याची आवश्यकता नाही. कारण प्रत्यक्ष यशच परिस्थितीवर मात करणाऱ्या अशा वीराचा मागोवा घेते, असे अभिवचनही गुरुदेवांनी दिले आहे. हिंदु धर्माने हा विचार जगाला दिला आहे. 'मानव निर्माण की कला' ह्या पुस्तकात गुरुदेव म्हणतात, "हिंदू धर्मशास्त्रात विद्यार्थ्यास प्रत्येक पावलावर गुरुला केवळ प्रश्न करण्याचे स्वातंत्र्यच नाही तर उत्तर प्राप्त करण्याचा अधिकारही आहे. गुरुला आपल्या शिष्याला शिस्त लावावी म्हणून कठोरही बनावे लागते. विद्यार्थ्याला बौध्दिक दृष्टिकोनातून जागृत करण्यासाठी आचार्यांना त्याला प्रताडना करावी लागते. जेणे करुन तो जीवनमूल्य व आदर्शाच्या पुनर्शिक्षणाच्या दृष्टीने तयार व्हावा. पण यात विद्यार्थ्याची मनोभूमिका त्यांनी महत्वाची मानली आहे. ते म्हणतात, "ध्येयाच्या प्रति भक्ती आणि समर्पण, कर्मयोगाचे आचरण, समाजसेवा, हृदय शुध्दी, खरा संस्कृती विकास व आत्म शिक्षणासाठी आवश्यक अनुशासन आहे. हे अनुशसन मानवाला एक संघटीत व्यक्तिमत्व प्रदान करते. प.पू. गुरुदेवांना जी शिस्त अपेक्षित आहे ती केवळ शारीरिक शिस्त नाही तर मानसिक व बौध्दिक शिस्तीचाही त्यांनी विचार केला आहे. मानव निर्माण की कला मध्ये ते म्हणतात, "आपले मन आणि बुध्दी ह्यांना तंतोतंत जुळणाऱ्या परिस्थितीत योग्य ते वर्तन करावयास लावण्याची आपण जर चांगली शिस्त लावली तरच बाह्य जगतात आपण अनुभवीत असलेल्या दोषात आपणास सुधारणा घडवून आणता येईल. त्याकरिता योजिलेल्या सर्व तंत्राचा रोख आपल्यामधील मानसिक आणि बौध्दिक व्यक्ती भावना बळकटी आणण्याकडे आणि त्यांना शिस्त लावण्याकडे असला पाहिजे. गुरुदेवांना त्रीस्तरीय शिस्त अपेक्षीत होती. ह्या त्रीस्तरीय शिस्तीतून आत्मस्वरुप जाणण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक व्यकितला आहे. True freedom will lead man to the glorious height of perfection and for that three values should be cultivated Satyam, ahinsa and Brahmcharya

| | | |
|---|---|---|
| Brahmacharya | - | Body level |
| Ahimsa | - | Mental level |
| Satyam | - | Intellectual level |

"Should be practiced. The benifit of three are plenty. These values lead man to suprem success in the chosen field." भारतीय तत्वज्ञानाने मांडलेल्या सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य ह्या संकल्पना त्रीस्तरीय शिस्तीशी निगडीत आहे. ह्या शिस्तीतूनच आपल्या प्रगतीचे स्वातंत्र्य मानवास प्राप्त होते.

मानवी स्वातंत्र्याबाबत Spiritual Freedom ही संकल्पना त्यांनी मांडली आहे. ह्याबाबत प्रितीश नंदी ह्यांनी घेतलेल्या मुलाखतीत गुरुदेव म्हणतात. Only man who is detached can be free he is like the wind. Spiritual Freedom ही संकल्पना आंतरिक विकासाशी निगडीत आहे. मानवाचा भौतिक विकास आंतरिक विकासाशिवाय शक्य नाही आणि ह्यासाठी चारित्र्याची गरज आहे. आज भारतात व्यावसायिक चारित्र्य नाही त्यामुळे गुणवत्ता नाही. कारण आपण लवकरात लवकर श्रीमंत होऊ इच्छितो व गुणवत्तेशी तडजोड करतो. Wealth without charachter is suicidal. स्वातंत्र्य हे ज्ञानाकडे जाण्याची पहिली पायरी आहे. Freedom from everything is the first step towards true knowledge.

मानसिक शिस्त ही अतिशय कठीण बाब आहे. ह्यावर मार्ग कोणता ह्यावर भाष्य करतांना गुरुदेव गीता अध्याय १२ च्या विवेचनात म्हणतात, ''मनाला शिस्त लावणे आणि विचारांची गुणवत्ता बदलणे आणि आपल्याबाह्य हालचालींना शिस्त लावणे हे त्याहून कितीतरी सोपे आहे. म्हणून सदाचाराची सवय लावून घेणे, आपल्या वर्तनाला शिस्त लावणे, उत्तम परोपकारी म्हणून कर्म करणे, ही सर्व आपल्या पुनरुज्जीवनाच्या महान योजनेचा प्रारंभ आहे. जेव्हा ह्या उदात्त कर्माचा अंगीकार केला जातो. तेव्हा ती खोटी खोटी नाटके वाटत असली तरीही लवकरच ती सवय बनते आणि शिस्तीची ही बह्य सवयक मनाला शिस्त लावण्यास मदत करते. म्हणून सर्व संस्कृतीमध्ये बालपणापासून ज्येष्ठांचा आदर करावा, आज्ञापालन करावे, खोटे बोलू नये, धार्मिक ग्रंथाचे अध्ययन करावे, शिक्षण घ्यावे, स्वच्छतेचे आचरण करावे इत्यादीचा आग्रह असतो. बालकाला जेव्हा ह्या गोष्टींचा आग्रह केला जातो तेव्हा सुरवातीला ते त्या सर्वांना कदाचित ज्यांच्या सत्तेखाली ज्याला जगणे भाग पाडले जाते अशाप्रकारचे जुलूम समजते. तथापी दीर्घकाळानंतर हे नियम बालकांच्या मनात आजाणतेपणी शिस्त बाणवतात.

## ६) राष्ट्र व संस्कृती :-

स्वामी चिन्मयानंद हे प्रखर राष्ट्रवादी होते. राष्ट्र, राष्ट्रप्रेम ह्या संकल्पना त्यांनी अत्यंत परखडपणे मांडल्या आहेत. केवळ भूखंडावर वास्तव्य करणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र ही राष्ट्राबाबतची संकल्पना त्यांना मान्य नव्हती. ती केवळ एक लोकसंख्या व लोक समूह आहे असे ते म्हणत. राष्ट्र संकल्पना स्पष्ट करतांना ते म्हणतात, "लोक समूह जेव्हा एखाद्या सुसंघटीत कार्यक्रमासाठी एकत्र येतात आणि प्रयत्नपूर्वक व निष्ठेने एखादे समान ध्येय साध्य करण्यासाठी ते झटत असतात तेव्हाच आपणास राष्ट्राची घडण झालेली दिसते. जोपर्यंत प्रत्येक जण दुसऱ्याविषयीचा विचार न करता आणि समान उद्दिष्टासंबंधी कोणत्याही प्रकारची निष्ठा न बाळगता स्वत:ची खाजगी उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या प्रयत्नात आत्मकेंद्री वृत्तीने विघटीत जीवन जगत असतो. तोपर्यंत अशी माणसे कधीच राष्ट्र घडवू शकत नाही. वैज्ञानिक अर्थशास्त्रज्ञ, राजनितीज्ञ हे राष्ट्राच्या उन्नतीकरिता अनेक क्रांतीकारक योजना देतात. ह्यापैकी कोणतीही योजना ही राष्ट्राची निर्मिती किंवा उभारणी करु शकत नाही. कारण ह्या योजना बाह्य परिसराच्या दृष्टिकोनातून मानवाची उन्नती निर्धारीत करतात. त्यांना बाह्य परिस्थितीशी कर्तव्य असते. मानवाशी नव्हे. पण राष्ट्र हे व्यक्तिंनी बनले आहे. परिणामी राष्ट्राचे सामर्थ्य हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची गुणात्मकता कशी आहे. ह्यावर अवलंबून आहे. पण ह्याचा अर्थ वरील सुधारणा दुर्लक्षित व्हाव्यात असे नाही पण ह्या सर्व योजनांची कार्यवाही काही कारणाने चारित्र्य संपन्नतेत कमी पडत असेल तर ह्या योजना यशस्वी होणार नाहीत. शिवाय राष्ट्रातील व्यक्तिंमध्ये राष्ट्रीय भावना नसेल तर देशांतर्गत भांडणे व कलह निर्माण होतात. अर्थतज्ज्ञांनी कितीही राष्ट्राला भौतिक समृध्दी प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला तरी लोकांमध्ये एकात्मता, चारित्र्य बदल नसेल तर भौतिक समृध्दी मग ती कितीही मोठी असो ते राष्ट्र नाव घेण्यासारखे उद्दिष्ट गाठू शकणार नाही. जेव्हा मानवाचा विवेक सुटतो आणि जीवनाच्या सर्व नैतिक आणि सदाचार विषयक मूल्यांचा तो उपमर्द करतो तेव्हा विघातक कार्यासाठी तो आपले ज्ञान उपयोगात आणतो. सेवा, त्याग वृत्ति आणि चारित्र्य ह्यांच्या धाग्यांनी राष्ट्र बांधल्या गेल्याखेरीज संशोधनाच्या वस्तुनिष्ठ क्षेत्रातील विकास आणि प्रगती मग ती कितीही मोठी असो त्यामुळे लोकसमुहाला राष्ट्र म्हणून मान सन्मान प्राप्त होतो

ही भावना केवळ धर्मामुळेच प्राप्त होते. धर्मातील तत्वांना धरुन राहिल्यामुळे मानवात एकात्मतेची भावना यावी लागते व अशा माणसामुळे समाज निकोप बनतो. जेव्हा राष्ट्रातील प्रत्येक नागरिक स्वत:साठी काही न मागता स्वयंस्फूर्तीने तळमळून त्यांच्यातील सर्वोत्कृष्ट अर्पण करुन देशाची सेवा करतो तेव्हाच ते संघटीत राष्ट्र शक्ती सामर्थ्य प्रतिष्ठीत व विकसित होते.

'मानव निर्माण की कला' ह्या पुस्तकात व्यक्त केलेल्या ह्या विचारात गुरुदेवांनी राष्ट्र ही संकल्पना फार व्यापक व संघटीतपणे मांडली आहे व राष्ट्राचा धर्माशी असणारा अनन्य सहसंबंधही व्यक्त केला आहे.

राष्ट्रोन्नतीच्या संदर्भात त्यांनी केलेले भाष्य हे अत्यंत मार्गदर्शक आहे. गीता अध्याय क्र. ३ च्या विवेचनात गुरुदेवांनी विषद केले आहे की, समाजात श्रेष्ठ पुरुष जे कर्म करतो तेच सामान्य माणूसही करतो. मनुष्य हा अनिवार्यपणे अनुकरणशील प्राणी आहे. इतिहासाच्या कोणत्याही काळी समाजाचे नैतिक पुनरुत्थान हे त्या राष्ट्राच्या नेत्यांनी घालून दिलेल्या उदाहरणामुळेच घडू शकते. विद्यार्थी तेव्हाच शिस्तप्रिय होतील जेव्हा शिक्षक सदाचारी होतील. जोपर्यंत देशाचे राज्यकर्ते भ्रष्टाचारी व जुलमी असतील तोपर्यंत कनिष्ठ कर्मचारी हे इमानी व सहृदयी असू शकणार नाही. मुलांची वर्तणुक ही पालकांचे पावित्र्य व सुसंस्काराच्या दर्जावर अवलंबून असते. मानव निर्माण की कला ह्या पुस्तकात प.पू. गुरुदेव म्हणतात, ''प्रत्येक राष्ट्रास आपली राजनैतिक पध्दती व आर्थिक ढाचा निश्चित करावा लागेल. मानव व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी तत्वज्ञानाजवळ निश्चित योजना असायलाच हवी. राष्ट्र हे नागरिकांनी बनते जर नागरिक बलवान, कुशल परिश्रमीत, त्यागी असतील तर राष्ट्रही महान बनते. जर व्यक्ती स्वार्थी, दुरचरित, आळशी आणि भ्रष्ट असेल तर राष्ट्रही खराब बनेल. व्यक्तिगत उन्नती मध्येच राष्ट्राची उन्नती आहे. Every country and Nation in the world build up their National Pride and devoted loyalty towards the glory of their nation by educating its growing generation to admire and appreciate its past achievement and accomplishment.

आपल्या देशाबाबत त्यांच्या मनात जाज्वल्य अभिमान होता. भारत ह्या नावाला अनुसरुन त्यांनी दिलेले विवेचन असे की, "आपल्या देशाचे नाव भारत हे केवळ प्राचीन राजाच्या नावावरुन पडले नाही तर त्याच्या राष्ट्रार्थावरुन ह्याची निवड केली आहे. 'भा' ह्याचा संस्कृतमधील अर्थ प्रकाश, दिप्ती, चमक रत: ह्याचा अर्थ रममाण होणारा. भारत म्हणजेच जो ज्ञानाच्या प्रकाशात रममाण होणारा. भारत म्हणजेच जो ज्ञानाच्याप्रकाशात रममाण झालेला आहे. हा देश संपूर्ण विश्वावर आहे जेव्हा कोणीही व्यक्ती सदैव ज्ञानाच्या प्रकाशात जीवन जगण्याचे व परमात्म तत्वाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करते तेव्हाच तो खरा भारतीय ठरतो. ह्या ठिकाणी गुरुदेवांनी काही प्रश्न विचारले आहेत. त्याची उत्तरे हो असतील तरच तो खरा भारतीय आहे, असे त्यांचे मत होते.

१) तुमच्यात तुमचा विश्वास व्यवहारात आणण्याचे सामर्थ्य आहे का?

२) तुम्ही तुमच्या सिध्दांतांवर पक्के आहात का?

३) तुम्ही ऐवढे स्पष्टवादी, इमानदार व साहसी आहात की भ्रष्ट आणि अनैतिक बाबींना तुम्ही आपलेसे करीत नाही?

४) तुम्ही आपल्या निम्न प्रवृत्ती आणि हीन वासनांशी नित्य प्रतिकार करता?

५) तुम्ही लोकांचे व राष्ट्राचे भाग्य स्वत:पेक्षा अधिक पवित्र मानता?

असे असेल तर तुम्ही खरे भारतीय आहात. मानव निर्माण की कला ह्या पुस्तकातील हे विचार म्हणजे आपण खरेच भारतीय आहोत का? ह्याची स्वयं पडताळा सूचीच आहे.

भारताचे प्राचीन वैभव पुन्हा मातृभूमिला प्राप्त करुन देणे हे गुरुदेवांचे जीवितकार्य होते. त्याकरिता भारतवासीयांच्या हृदयात राष्ट्रप्रेम, संस्कृतीचा अभिमान, सेवाव्रत इत्यादी संस्कार रुजविण्याकरिता त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. आपल्या सामर्थ्यातून निर्माण झालेल्या सहिष्णूतेवर त्यांचा विश्वास होता. दुबळी सहिष्णुता त्यांना मान्य नव्हती. भारत जर सामर्थ्यवान झाला तरच भारताला सहिष्णुता खुलून दिसेल असे ते म्हणत. राष्ट्रभक्तीवर, राष्ट्रावर त्यांनी अनेकदा लिखाण केले. ह्या लिखाणात त्यांनी प्रामुख्याने संस्कृतीचा अभिमान, भारताच्या वृत्ती, त्यागी, सहिष्णु वृत्ती ह्यावरच भर दिला आहे. "कोणताही देश जर त्याग

सेवा यावर आधारीत नसेल तर त्या देशाला उज्वल भविष्य नाही, असे ते म्हणत असत.'' १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा गुरुदेवांनी All India Radio वर भाषण केले. त्या भाषणाचा मराठी अनुवाद शालीनी मराठे ह्यांनी केला. ह्या भाषणात प.पू. गुरुदेवांचे मातृभूमिबद्दलचे प्रेम आपल्या लक्षात येते. (प्रस्तुत भाग पहिल्या प्रकरणात 'राष्ट्र भक्त स्वामीजी' यात समाविष्ट करण्यात आला आहे.)

हल्लीच्या तरुण मुलांमध्ये राष्ट्रभक्ती दिसत नाही. ह्याबाबत त्यांनी अनेक ठिकाणी खेद व्यक्त केला आहे. पण ह्याकरिता त्यांनी शिक्षण पध्दतीला दोषी मानले आहे. त्यांचे मत असे होते की, भारत हा शब्द शिक्षणाचे स्फुर्तीस्थन बनायला हवा होता. उलट हल्ली सर्वांनाच ऐष, आरामाच्या नोकऱ्या हव्यात. कष्ट करायला शिकविले नाही, त्याग करायला शिकविले नाही. एवढ्या प्रचंड भ्रष्टाचारात भारत अजूनही तग धरुन आहे. गुरुदेव तरुणांना आव्हान करतांना म्हणतात, ''हिंदुस्थान अजून जीवंत आहे ही परमेश्वराच्या अस्तित्वाची खूण आहे. तरुणांवर ही जबाबदारी आहे. तुमची सर्व शारीरिक, मानसिक, बौध्दिक शक्ती ही देशाच्या पुनर्बांधणी करीता वापरा. पण त्याकरिता खूप त्याग करण्याची तयारी हवी. कुणीतरी सुरवात करायला हवी. मिठाच्या सत्याग्रहात गांधीजी पहिल्यांदा एकटेच गेले. सर्व लोक त्यांना हासत होते. पण नंतर खूप लोक त्यात सामील झाले, असे कार्य करण्याकरिता खूप स्वाभिमान व त्याग असावा लागतो. मायदेशाबद्दल अत्यंत प्रेम, आदर असावा लागतो. वर्तमानातील अडचणी सोडविण्याकरिता भूतकाळातून स्फुर्ती घ्यावी लागते''. आणि म्हणूनच ते युवकांना म्हणतात, ''तरुणांनो तुम्हीच भारताचे शिल्पकार आहात.''

"You are responsible for the future of the country". या लेखात (Tapovan Prasad - Sept/ 97) गुरुदेवांनी दोन प्रकारच्या व्यक्तिंचे उदाहरण दिले आहे. एक व्यक्ति कुटुंब, समाजाकडून दुर्लक्षित असलेला व एक व्यक्ती जो कुटुंबाच्या, समाजाच्य संस्कारात वाढला. अशा दोघांच्याही वर्तनाची तुलना ह्या लेखात करुन त्यांच्या वर्तनातील तफावत ते वाचकांच्या लक्षात आणून देतात आणि आपल्या वर्तनाची गुणवत्ता ज्या समाजात, ज्या राष्ट्रात आपण राहतो त्या कडून प्राप्त होणाऱ्या आदराशी निगडीत असते. राष्ट्राच्या अवनतीचे कारण हे disintegration हे आहे. एखाद्या इमारतीतून धूर दिसल्यास ज्याप्रमाणे

इमारत जळण्याबाबतची धोक्याची सूचना प्राप्त होते. Disintegration ही बाब त्या धुरासारखीच आहे आणि मुगल व ब्रिटिश राजवटींनी ह्याचाच फायदा घेतला. Disintegration सुरु झाले आणि देशाच्या नियतीला सुरुंग लागला. भारताचा युवा हा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षणाचे Product आहे. प्रणालीवर टिका करतांना ह्याच लेखात म्हणतात, "Even then attempts at changing the education system were all corrupt. The ministers never thought of our culture and how to tone up our children to our culture and keep them inspired by the very word Bharat. Now we have come to a point where we have no respect for the nation, no sense of belonging to the nation" आपल्याला लोकसंख्या वाढते आहे हे माहित आहे. आज प्रत्येक व्यक्ती शहरात जाऊ इच्छित आहे. त्यामुळे खेडे ओस पडली आहेत. मानवाला सुखासीनतेची सवय लागत आहे. ह्या ठिकाणी गुरुदेव मार्मिक प्रश्न विचारतात. Where is Nation? Who is to sweat for it? Without any sacrifice can we creat anything? त्यागातूनच राष्ट्राची निर्मिती घडत असते. हाच खरा समाजवाद आहे. ह्याच लेखात त्यांनी आधुनिक शिक्षणप्रणालीला चुकीचे ठरविले आहे. कारण ह्या शिक्षणप्रणलीत इतिहासाला स्थान नाही. राष्ट्राचे वैभव कळण्याशिवाय राष्ट्राबाबत प्रेम कसे निर्माण होईल? ह्या ठिकाणी ते युवकांना राष्ट्र निर्मितीचा सल्ला देतात. ही राष्ट्र निर्मितीसाी आपल्या आई-वडिलांच्या पिढीवर अवलंबून न राहण्याचा सल्लाही ते देतात व त्यांना प्रोत्साहित करतात. "It is entirely upto you to bring out the best in you. Study hard develop your mind and intellect and pour it out for rebuilding of the country" हे सर्व करतांना मी समाजाकडून काय प्राप्त करु शकतो हा दृष्टिकोन नको पण माझ्या देशबांधवांना मी काय देऊ शकतो हा दृष्टिकोन हवा. All te mental and intellectual energy has to be offered now for the rebuilding of the nation. Drawing inspiration from the past we meet the challenges in the present. Unfortunately our history tells us wat a westerner thinks of our country until at last here we are creating a monster a total disintegration Maharashtrian wants Maharashtra. ह्या एकात्मतेतून राष्ट्राला केवळ युवकच वाचवू शकतो. ह्यासाठी युवकांमध्ये पुढील गुणधर्माची

आवश्यकता आहे. 1) Self Respect, 2) Pride of their Country, 3) Self Confidance, 4) Prepared to Work for Rebuilding the Nation, 5) Ready to Make Sacrifice ही फॅशन बनायला हवी. ही जबाबदारी चिन्मय युवा केंद्राच्या विद्यार्थ्यांवर त्यांनी टाकली आहे. माझ्या राष्ट्राला मी काय देऊ शकतो ह्याचा प्रत्येक युवकाने विचार करायला हवा. ह्यासाठी मर्मदृष्टी Vision विकसित करायला हवे. आज भारत केवळ देश आहे. पण ते राष्ट्र नाही कारण आज प्रत्येक जण केवळ स्वत:ची समस्या पहात आहे. India as a whole हा दृष्टिकोन आपल्या देशात नाही. ही आपली मर्यादा आहे. ह्या मर्यादेतून बाहेर यायला हवे. See in one sweep. The past present and the possible future. From the Himalayas Brother. राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय एकात्मता ही केवळ महत्वाची ठरते. ही एकात्मता अथवा बंधुत्वाची भावना केवळ घटनेत बदल करुन निर्माण करता येणार नाही. विविध समित्या स्थापन करुन होणार नाही. तर ह्यात नेत्यांचा, महात्म्यांचा सहभाग महत्वाचा आहे. त्यांची भूमिका महत्वाची आहे. National integration ची परिभाषा गुरुदेवांनी Role of Mahatma s in National Integration ह्या पुस्तकात नमूद केली आहे. ते म्हणतात, "If people come togather with comon Ideal or goal to which they are dedicated. There is integration. When we have devotion to an Ideal whether it is a living man or a mere thought, a great principle or a great ideology it means we have got a goal an inspiring Ideal. Integration will automatically come. एकच व्यक्ती आपल्या आजूबाजूला पूर्ण एकात्मता निर्माण करु शकत नाही. आपल्यातील पाशवीपणावर मात करण्यासाठी व स्वत: अधिकाधिक Purify करण्यासाठी आदर्शाची आवश्यकता आहे. ही आदर्श आपल्या जीवनात उतरायला हवीत. अशा आदर्शामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हायला मदत होते. पण देशात एकात्मता कशी निर्माण होईल? ह्या प्रश्नाचे उत्तर देतांना ह्याच पुस्तकात ते म्हणतात, ‘‘आज देशाला चांगले आदर्श द्यावे लागतील तरच देशात बदल घडून येतील. कारण आपण ज्याला आदर्श मानतो त्यचा आपण आदर करतो त्याचे आपण अनुकरण करतो ही मानवी वृत्ती आहे. आज आपण केवळ वेषभूषा बघतो. पण त्या व्यक्तिच्या वर्तनाचा व तिच्या तत्वाचा आपण आदर करावयास हवे. केवळ महात्मा National Integration ला कारणीभूत ठरतात. कारण ते

आपल्या जगण्यातून तसा आदर्श निर्माण करतात. कारण ह्या महात्म्यांच्या आयुष्यातून आपणास खालील प्रेरणा महत्वाच्या प्राप्त होतात. 1) what a brilliant life he is living, 2) what a joyful life he is living, 3) what a deveted life he is living ही प्रेरणा राष्ट्रीय एकात्मतेस पोषक अशीच आहे. म्हणूनच Meterial and Spiritual Welfare of All हे राष्ट्रीय एकात्मतेचे घोषवाक्य बनायला हवे. Common Spiritual Ideas the temples, our thoughts our behaviour these are what integreted as.

राष्ट्रीय एकात्मतेवर भाष्य करण्यापूर्वी राष्ट्र ही संकल्पना अतिशय सुरेख शब्दात त्यांनी ''सेवा करे'' ह्या पुस्तकात मांडली आहे. ते म्हणतात, ''ज्या भूभागात जनसमूह राहतो त्याला देश म्हणतात पण ज्या भूभागात संघटीत मानव समाज राहतो त्याला राष्ट्र म्हणतात. केवळ राष्ट्र प्रयोगांनी राष्ट्र बनत नाही. एखाद्या भूभागाला तेव्हाच राष्ट्र म्हणता येईल जेव्हा सर्व एकमेकांच्या सहयोगाने राहतील व सर्वांच्या प्रगतीसाठी सामुहिक प्रयत्न करतील व ह्यानेच सामाजिक समृध्दी, आर्थिक व राजनैतिक योजना सफल बनतील. विचारामधील सामंजस्य उद्दिष्टांतील ऐक्य व उत्साहपूर्वक कार्यातील सहयोग ह्याने राष्ट्र निर्माण होते. जोपर्यंत प्रत्येकपण दुसऱ्या विषयी विचार न करता आणि समाज उद्दिष्टा संबंधी कोणत्याही प्रकारची निष्ठा न बाळगता स्वत:ची खाजगी उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या प्रयत्नात आत्मकेंद्री वृत्तीत विघटीत जीवन जगत असतो. तोपर्यंत अशी माणसे काहीच राष्ट्र घडवू शकत नाही. जीवनज्योत पुस्तकातील राष्ट्राची मर्मस्थाने ह्या पुस्तकात त्यांनी राष्ट्र ही संकल्पना स्पष्ट केली आहे व राष्ट्राची प्रगती उभारणी ही संपत्तीच्या वर्धनानी, राजनितीविषयक सुधारणांनी व विज्ञान तंत्रज्ञान ह्यांच्या प्रगतीने होत नाही कारण राष्ट्र हे व्यक्तिंनी बनले आहे आणि म्हणूनच राष्ट्राचे सामर्थ्य व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे. योजनांची कार्यवाही करणारे चारित्र्यसंपन्नतेत कमी पडत असतील तर राष्ट्र प्रगती करु शकणार नाही. जेव्हा एखाद्या देशातील व्यक्तिमध्ये जेव्हा राष्ट्रीय भावना, प्रेम व बंधुत्वाची भावना नसते तेव्हा अंतर्गत भांडवणे व संघर्ष निर्माण होतात.

भारताच्या संस्कृतीवर भाष्य करतांना इशवास्य उपनिषदाच्या प्रस्तावनेत गुरुदेव म्हणतात, ''आपले युग हे शास्त्र युग आहे. नवीन भारत त्याच्या स्वातंत्र्य संपादनेत

रोमांचित होऊन ज्यामध्ये बहुसंख्यकांना जीवनात जास्तीत जास्त शांतता आणि सुख उपभोगता येईल अशा उज्वल भविष्याकउे पहात आहे. फार पुरातन काळापासून आपली भूमी ही अध्यात्म भूती आहे. आणि सर्व जण जीवनाच्या यथायोग्य पध्दती आणि आचार ह्यांचे खरे नैतिक आदर्श त्यांना शिकवेल म्हणून सदैव आपल्याकडे बघत आले आहे. भौगोलिक दृष्ट्या भारत हा उपखंड आहे. परंतु आपल्या आध्यात्मिक साम्राज्याला जगात मर्यादाच नाहीत. आजही जग भारताकडे आदाराने आणि पूज्य बुध्दीने बघत आहे. ते त्याची भौतिक संपत्ती मनुष्यबळ सैनिकी सामर्थ्य किंवा वाङ्मय यामुळे नव्हे तर जीवनाच्या ह्या महान शास्त्राचे जगातील एकमेव मक्तेदार म्हणून आपण आध्यात्मिक क्षेत्रात आहोत. त्यापेक्षा अन्य इतर कोणत्याही क्षेत्रात अधिक वरचढ होऊ शकत नाही. कारण मानवाला एक अधिक चांगला प्राणी म्हणून आणि सृष्टी निर्मितीतील एक महान घटक म्हणून त्यांचे पुनर्वसन करण्याचा समग्र सिध्दांत आणि तद्विषयक परिपूर्णपध्दती आपणापाशी आजही अवगत आहे.'' गुरुदेवांच्या लेखनातून भारतीय संस्कृतीचा अभिमान हा पदोपदी जाणवतो. ह्याच भावनेतून ते विश्वास व्यत करतात. ''आपल्या नैतिकतेत बळकटी, सदाचारात पक्केपणा आणि आध्यात्मिक सामर्थ्यात निष्ठा असलेल्या अशा जागृत भारताकडून संस्कृती रक्षणाचे, धर्मप्रसाराचे कार्य होवू शकेल.''

राष्ट्राच्या उभारणीत सुसंघटीत व्यक्तिमव असणाऱ्या व्यक्तिचा वाटा हा सिंहाचा असतो. मानवी व्यक्तिमत्वाचे सुसंघटन झाले तर त्याचा समाजाकरिता, राष्ट्राकरिता विशेष उपयोग होतो. ही बाब 'जीवनज्योत' पुस्तकात व्यक्त करतांना ते म्हणतात, ''राष्ट्र ज्यांचे बनले असते अशा व्यक्तिकडूनच राष्ट्राची उभारणी होत असते आणि जेव्हा समाजातील व राष्ट्रातील प्रतयेक धर्म ग्रंथात निर्देशित केलेल्या मार्गाने ती व्यक्ती प्रयत्न करते व आपल्या व्यक्तिमत्वाची पुनर्रचना करते तेव्हा प्रत्येकासाठी व सर्वांसाठी शांतीची व किर्तीची पखरण करिता तो समाज व ते राष्ट्र झपाट्याने भरभराटीला येते''. राष्ट्राच्या पुनर्उभारणीला मानवी व्यक्तिमत्वाचे स्थान त्यांनी महत्वाचे मानले आहे.

राष्ट्र उभारणीत युवकांचा वाटा महत्वाचा आहे. Future of the country ह्या पुस्तकात युवकांच्या राष्ट्राच्या प्रती त्यागावर त्यांनी भर दिला आहे. युवकांनी त्याग केला नाही तर ते राष्ट्र जास्त काळ स्वातंत्र्य उपभोगू शकत नाही. आज युवकांजवळ असे चारित्र्य

नाही जे देशाला राष्ट्र बनवू शकेल. ह्याबाबत त्यांनी ह्या पुस्तकात खंत व्यक्त केली आहे. आजच्या युवकांचा attitude कसा आहे. हे सांगतांना ते म्हणतात, "आजचा युवक स्वातंत्र्य अशा प्रकारे उपभोगतो आहे. ज्याप्रमाणे एखादा नातू आपल्या आजोबांचा पैसा उपभोगतो कुणीही राष्ट्राचा विचार करीत नाही. मी फक्त स्वातंत्र्याचा उपभोग घेईन. देश स्वतंत्रच आहे. मला आणी काय हवे? मी जास्तीत जास्त नफा कमविण्यासाठी कमीत कमी प्रयत्न करेन? हाच दृष्टिकोन युवकांचा असतो. आज National Sprit राहिलेले नाही. आज जेवढे विकसित राष्ट्र आहेत त्यांच्या युवकांमध्ये हे आढळते. जेव्हा समस्या उद्‌भवतात तेव्हा त्यांना भय वाटत नाही. ते समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात आणि ह्या प्रक्रियेत ते अधिकाधिक एकात्म बनतात. Because every man in the street is conscious that he is the child of the great warrior, great soldier of the past. ह्याच धर्तीवर आपल्याही राष्ट्रात राष्ट्रीय सांस्कृतिक उद्यान व्हायला हवे. राष्ट्रातील प्रत्येकाची त्याग करण्याची तयारी हवी. आपल्या भूतकालीन संस्कृतीबाबत आपण जास्तीत जास्त सजग असायला हवे.

## भारतीय संस्कृती :-

भारतीय संस्कृतीबाबत त्यांच्या मनात नितांत आदर होता. "आजवर अनेक संस्कृती उदयाला आल्यात व नष्ट झाल्यात कारण त्यात समाजाच्या वाढत्या गरजांना आलिंगन देण्याची क्षमता नव्हती पण भारतीय संस्कृती ज्याची अभिव्यक्ती हिंदु धर्माच्या माध्यमातून होते तिचा हजारोवर्षापासून ह्याच कारणाने ऱ्हास झाला नाही. कारण समाजातील होणाऱ्या परिवर्तनाला आलिंगन देण्याची क्षमता ह्या संस्कृतीत आहे'', असे भारतीय संस्कृतीबाबतचे गौरवोद्‌गार मानव निर्माण की कला ह्या पुस्तकात प.पू. गुरुदेवांनी व्यक्त केले आहेत. इतर भागातील संस्कृती व भारतीय संस्कृती ह्यामधील भेद स्पष्ट करतांना ते प्रश्नोपनिषदाच्या विवेचनात म्हणतात की, जगभरची सांस्कृतिक मूल्ये आणि आर्यवर्ताची तीच मूल्ये ह्यात फरक आहे. पृथ्वीवरील इतर भागातील संस्कृती हक्काच्या मागणीवर आधारीत आहे. परंतु जेव्हा व्यक्तिगत, सामाजिक आणि राष्ट्रीय हक्क यांचा आग्रह धरला जातो. तेव्हा ती विविक्षीत किंवा जमातीची काही तरी बळकावण्याची अवाजवीपणे मिळविण्याची आणि संपादण्याची मागणी असते. ह्याउलट भारतात आपणास आपले ऋषी, व्यक्तिंनी आप आपले कर्तव्य कर्म करण्याची

संधी मागण्याचा अधिकाधिक आग्रह धरीत असलेले दिसतात. ह्या ठिकाणी कर्तव्य हे आपल्या सांस्कृतिक जीवनाचे एक प्रमाण आहे आणि म्हणून समाजातील किंवा देशातील व्यक्तिला कर्तव्याचरणाच्या वृत्तीत स्वत:ला समर्पित करुन ते राखवयाचे असते. हक्काची मागणी करण्यात काही तरी प्राप्त करण्याचे जीवन असते तर उलट कर्तव्य करण्याचा आग्रह धरण्यात ज्यात देण्याची वृत्ती संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचेही चिन्ह आहे, असे जीवन असते. वस्तुत: भौतिक संस्कृती लाभ आणि विनियोग ह्याच्या वाळूवर उभारलेली असते तर आध्यात्मिक संस्कृती त्याग आणि बलीदानाच्या भक्कम पायावर उभारलेले मंदिर असते. भारतीय संस्कृती ही भौतिक नसून आध्यात्मिक आहे आणि म्हणूनच तिचा पाया त्याग, बलिदान, समर्पण हा आहे. संस्कृतीच्या विकासाबाबत गुरुदेवांनी काही मार्गदर्शक विचार व्यक्त केले आहे. ते म्हणतात, ''संस्कृतीच्या प्रारंभिक अवस्थेत भौगोलिक व हवामन विषयक परिस्थिती व सभोवतालचा परिसर ह्याचा लोकांवर प्रभाव पडत असे. परिस्थिती व सभोवतालचा परिसर ह्याचा प्रभाव लोकांवर पडून त्यातून जीवनमूल्ये आकाराला येत असत व त्यातून संस्कृती आकाराला येत होती. पूर्वेकडील देशाची जमीन सुपिक होती. थोड्याशा प्रयत्नातून जमीनीतून फुले, फळे व भाजीपाला याचे उत्पादन होत असे. नद्या सदैव वहात असत. वसंत ऋतु हा वर्षातून आठ-नऊ महिने फुलत असे. परिणामी निसर्गाच्या ह्या सुसंवादी अभिव्यक्तीमध्ये लोकही सर्वत्र निसर्गाचे अनुकरण करु लागले म्हणूनच झगडणे आणि मिळविणे ह्या ऐवजी सेवा करणे, दान देणे ह्यावर आधारीत संस्कृतीचा विकास झाला व शांती, प्रसन्नता व प्रेम निर्माण करणारी संस्कृती ह्या देशात निर्माण झाली. ह्या उलट पाश्चिमात्य देशामध्ये विषम हवामान, सततचा हिमवर्षाव ह्यामुळे जमीन ओसाड व नापिक असे, परिणामी तेथील लोक काटक बनले. निर्दय निसर्गाशी सामना करण्यासाठी व स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी जे आवश्यक असेल ते निसर्गातून मिळविण्यास त्यांना स्वत:ला वळण द्यावे लागले. अशा रितीने निसर्गावर जय मिळविणे हा पाश्चिमात्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव झाला. ह्या विवेचनावरुन संस्कृतीची अत्यंत समर्पक परिभाषा गुरुदेवांनी जीवनज्योत ह्या पुस्तकात दिली आहे. ते म्हणतात, ''प्रदीर्घ काळपर्यंत जेव्हा एखादा जनसमूह विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात जीवनाच्या काही तात्विक मूल्यांचा आणि सद्‌गुणांचा आदर करीत जीवन जगत असतो. तेव्हा त्यातून जो जीवनसुगंध पसरतो त्याला संस्कृती असे म्हणतात.'' ह्या संस्कृतीचा दर्जा ज्या ज्या प्रकारची जीवनमूल्ये अनुसरली

जातात त्यावर अवलंबून असतो. संस्कृतीच्या संवर्धनासोबत सभ्यतेचीही भरभराट होत असते. समाजाची सांस्कृतिक मूल्ये अवनत होतात तेव्हा समजाची संस्कृती रसातळाला जाते. आपल्या क्षेत्रात धर्म व अर्थ महात्म्ये ह्यांनी संस्कृतीचा ऱ्हास थांबविला आहे. पण आज मात्र समाजात संस्कृतीचा ऱ्हास झालेला आपणास आढळतो ही खंत गुरुदेवांनी ह्या पुस्तकात व्यक्त केली आहे. भारतात सांस्कृतीक ऱ्हासाची लक्षणे व्यक्त करतांना ते म्हणतात की, ''समाजात जेव्हा संस्कृतीचा ऱ्हास होतो तेव्हा रुढ तत्वज्ञानाचा विपरीत अर्थ काढला जातो पण धार्मिक तत्वाचे पुनरुज्जीवन करणे हा सांस्कृतिक ऱ्हासावर उपाय आहे.

संस्कृतीची निर्मिती कशी झाली ह्यावर ''यज्ञ तो देव जाणावा'' ह्या चेन्नई येथील व्याख्यानात गुरुदेवांनी नमूद केले आहे की, मृत व्यक्तीच्या विचारानुसार समाजात जेव्हा आचरण घडून येते तेव्हा त्या व्यक्ती अमर होतात. बराचकाळ पर्यंत जेव्हा हे आचरण घडून येते तेव्हा समाजाच्या आचरण शैलीत सौंदर्य प्राप्त होते व ह्यातून राष्ट्राच्या संस्कृतीची निर्मिती होते. समाज ह्या विचारानुरुप आचरण करतो तेव्हाच संस्कृती निर्माण होते. दैनंदिन जीवनात त्यानुसार आचरण करण्याची कला मानवाला साधली पाहिजे पण आज युवकांना आपल्या संस्कृतीबद्दल पुरेसे आकलन नाही. संस्कृतीबाबत प्रतिष्ठा नाही ही खंत त्यांनी Future of Country ह्या पुस्तकात व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''इंग्रजी माणूस जेव्हा समस्या उद्‌भवतात तेव्हा एकत्रीत येतो. समस्यांना तो घाबरत नाही. ती सोडविण्याचा ते प्रयत्न करतात. ह्या प्रक्रियेत ते अधिकाधिक एकात्रीत येतात. Because every man in the street is conscious that he is the child of great warrior great soldier of the past. आज भारतात सांस्कृतिक नुतनीकरण होत आहे. जे मानवाच्या अनेक समस्यांना पर्याय आहे. आपल्या भूतकालीन संस्कृतीबाबत आपण जास्तीत जास्त सजग असायला हवे.

Art of Living ह्या पुस्तकात गुरुदेवांनी संस्कृतीची पुढील परिभाषा दिली आहे. "When a set of people live for a long period of time in a perticular Geographical area, respecting certain philosophical values and virtues of life there emantes a fragrance which is called their culture." संस्कृतीची गुणवत्ता मूल्यांवर अवलंबून आहे. संस्कृतीतील भेद मूल्य सद्‌गुण ह्यावर अवलंबून आहे. मूल्य

ढासळली की, संस्कृती तुटते. संस्कृतीचा ऱ्हास झाला की अनैतिकता, दारिद्र्य बोकाळते. संस्कृतीच्या समृध्दीने मानवजात प्रगट होते. पण संस्कृती ढासळते तेव्हा समाजातील सुसंस्कृतपणा ढासळतो, तत्वज्ञानाचा विपर्यास होतो. मतमतांचा गलबला होतो. आजच्या सुशिक्षित लोकांचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी आजच्या पिढीला केवळ Factual knowledge अथवा Wondrous theories शिकवू नये तर जीवनाचे आदर्श शिकवावी व ही आदर्श जीवनात कशी उतरवायची ह्याचेही शिक्षण द्यावे.

भारतीय संस्कृतीबद्दल आजही अखिल जगाच्या मनात एक आदराची भावना आहे. नव्हे आज अखिल जग भारताकडे अत्यंत आदरयुक्त नजरेने पहात आहे. गुरुदेव तैतरीय उपनिषदाच्या शिक्षा वल्लीवर भाष्य करतांना म्हणतात, "आजच्या जगाने भूतपूर्व भारताच्या वैभवाची केलेली प्रशंसा काही एखाद्या मान्यता पावलेल्या प्रेषितांचे किंवा कोण्या अज्ञात संताचे स्तवन नव्हे किंवा एखाद्या तत्वज्ञान पंथाचे किंवा शास्त्राचेही नव्हे. परंतु तो मानवामध्ये शांती आणि समाधान ह्यांचा अधिकाधिक प्रसार करीत समाजामध्ये जीवनाची शाश्वत मूल्ये जगणाऱ्या अशा पिढीचा सन्मान होय. जीवनाची चांगली मूल्ये कशी आचरावी आणि समग्र पिढीला बौध्दिक समतोलाचा अधिकतर पाया मानसिक स्थैर्य आरोग्य, सामाजिक सुख, जातीय विकास आणि राष्ट्रीय स्वास्थ्य ही उपभोगण्यास कसे वाढवावे हे जाणणाऱ्या मागील पिढीबद्दल आजच्या युगाला वाटणारा प्रेमयुक्त आदर होय. प्रत्येक पिढी आपल्या संस्कृतीची मशाल आपल्या पुढच्या पिढीला आपल्या मुलाबाळांना देत असते आणि ह्या मशालीचे जतन करुन, रक्षण करुन संवर्धन करुन तिला आणखीच तेजस्वी करुन निदान तिचे तेज त्यांना ती मिळाली तेव्हा होते, त्यापेक्षा कमी होऊ न देता ती काळजीपूर्वक आपल्या पुढच्या पिढीच्या हाती सुपर्द करते. हे त्यांचे काम आहे. हेच संस्कृती संक्रमण आहे. ही संस्कृती माहित असणारी, जाणणारी व आचरण करणारी पिढी जर आपण निर्माण करु शकलो तर भारत हा जगात सर्वश्रेष्ठ ठरेल. Open your shoulders ह्या लेखात ते म्हणतात, "If we can have an army of men and women who know what culture and philosophy are. Who have started living it and have come to the determined attitude that whatever - even if the worst should happen - we shall not budge from these conviction then overnight we shall find a changeover in our situation if India alone can

strive for if it will be an example for the world to follow." पण ह्या करिता भारतीय संस्कृतीवरील निष्ठा बळकट हवी. जागतिक स्तरावर आज भारताचे स्वतंत्र स्थान आहे. कारण भारताची आध्यात्मिक संस्कृती म्हणून गुरुदेव सल्ला देतात. "Live not the life of rock-N-roll and coca-cola. Dont immitate others you must have your self respct. I know who I am" ह्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रेरणा आवश्यक आहे हेच माणसाचे खरे आत्मविकसन आहे असे ते मानतात. संस्कृतीचा जेव्हा नाश होतो तेव्हा समाजाची परिस्थिती कशी होते त्याचे वर्णन The Choice is Yours ह्या पुस्तकात अतिशय मार्मिकपणे नमूद केले आहे. ते म्हणतात, "When culture deteriorates there is an increase in barbarity and immorality in the country and its philosophy is misinterpreted. Ledding to confusion and chaos among its people. This is more or less the sad condition of present world. The need of the hour is to arrest forthwith the deterioration by reviving the great philosophical and religious values of life."

वरील प्रमाणे भारतीय संस्कृतीबाबत त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

## ७) धर्मसंकल्पना व हिंदू धर्म :-

प.पू. स्वामी चिन्मयानंदांनी धर्म व हिंदु धर्माबाबत अत्यंत मौलिक विचार मांडले आहेत. आज ज्या परिस्थितीतून भारत देशाला जावे लागत आहे ती परिस्थिती अत्यंत भयावह आहे. आज सर्वत्र जातीयता, धार्मिकता, सांप्रदायिकता, वर्णद्विष अक्षरश: बोकाळला आहे. धर्माच्या नावावर समाजाचे विघटन होत आहे. अशावेळी प.पू. गुरुदेवांच्या विचारांचे महत्व आपल्याला पटल्यावाचून रहावत नाही. धर्म म्हणजे काय ह्याबाबतचे त्यांचे भाष्य अत्यंत मार्मिक आहे. ते म्हणतात, ''धर्म ही एक अत्यंत धृष्कर अशी संज्ञा आहे. धृ (धर) ह्या धातूपासून हा शब्द आला आहे. धृ ह्याचा अर्थ धारण करणे, आधार देणे असा आहे. धर्म ह्याचा अर्थ ते की, जे एखाद्या वस्तुच्या वेगवेगळ्या भागांना व गुणधर्मांना एकत्रीत धारण करते. धर्म ह्याचे भाषांतर सामन्यपणे धार्मिक आचार संहिता, धार्मिकता, नैतिकता, कर्तव्य दातृत्व इत्यादी प्रकारे केली जाते.'' धर्माबाबतच्या प्राचीन संकल्पनेशी गुरुदेव सहमत आहेत.

पण ह्या पेक्षाही वेगळा अर्थ गुरुदेवांनी मांडला तो असा की धर्म म्हणजे Law of Being ते म्हणतात, ''मी पाहिलेल्या पैकी सर्वात जवळचा प्रतिशब्द म्हणजे Law of Being म्हणजेच ज्यामुळे एखादी वस्तु किंवा व्यक्ती म्हणून जशी असते तशी ओळखली जाते. उदा. अग्नीचा धर्म जाळणे. म्हणून धर्म ह्याचा अर्थ नुसतेच सदाचरण किंवा चांगुलपणा नव्हे तर ज्याच्या शिवाय एखादी वस्तु आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवू शकत नाही. असा त्या वस्तुचा आवश्यक स्वभाव. उदा. थंड व काळा सूर्य असणे अशक्य आहे. म्हणजेच धर्म म्हणजे तिच्या अस्तित्वाचा नियम होय. कोणतीही वस्तु तिच्या धर्माशिवाय तिचे अस्तित्व टिकवून धरु शकत नाही आणि वस्तु आहे त्या स्वरुपामध्ये ज्याच्यामुळे राहू शकते तो त्या वस्तुचा धर्म होय. व्यक्तिच्या संदर्भात धर्म ही संज्ञा वापरावयाची असल्यास व्यक्तिचा धर्म कोणता! गुरुदेव म्हणतात, ''ज्या वासना घेऊन एखादी व्यक्ती तिच्या चालू आयुष्यात जन्म घेते त्या वासनाच्या गाठोड्याला धर्म असे म्हणतात. प्रत्येक व्यक्तिने आपल्या सहज व जन्मजात प्रवृत्ती प्रमाणे कर्म करणे हाच शांती, सुख व समाधान यांनी जीवन जगण्याचा मार्ग आहे. हा स्वधर्म आहे व आपल्या स्वतच्या मूळवासनाच्या विरुध्द वागणे म्हणजे परधर्म होय. ज्यावेळी समाजातील बहुसंख्य लोक धर्मपाळीत नाहीत त्यावेळी सुबुध्द मानवी प्रतिष्ठेस शोभेल असे सहकार्याचे जीवन जगण्यापेक्षा हे लोक पाशुतुल्य मानव म्हणून जगावर स्वामित्व गाजवित असतात. धर्म हा अंत:करणात गुप्तपणे आपल्या विचारांना वळण लावणाऱ्या उदात्त जीवनमूल्याचे परिपालन करण्यास आपल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अंत:करणात गुप्तपणे आचारावयाची जीवननिष्ठा असावी. वरील सर्व विवेचनावरुन लक्षात येते की, धर्माबाबत एक व्यापक व सर्वसमावेशक असा दृष्टिकोन गुरुदेवांनी मांडला. (धर्माची मानसशास्त्रीय उत्पत्ती)

गीता अध्याय ६ वरील श्लोक क्र. ५ च्या विवेचनात गुरुदेवांनी धर्म व व्यक्तिमत्व विकास ही संकल्पना अतिशय उत्कृष्ट मांडली आहे. हे विवेचन व्यक्तिमत्व विकास संकल्पनेत आले आहेच ते म्हणतात, ''स्वत:मध्ये सुप्तावस्थेत असलेल्या अशा सांस्कृतिक व आध्यात्मिक पदापर्यंत मानवाला जर आपली स्वत:ची उन्नती घडवून आणायची असेल तर त्याने स्वत:मधील निम्न स्तराला स्वत:मधील खऱ्या शाश्वत केंद्रस्थानी असणाऱ्या अधिक पूर्णावस्थेप्रत उन्नत केले पाहिजे. प्रत्येकाचे स्वत:मध्ये ही बौध्दिक धारणा अतिशय स्पष्ट असते. परंतु दुर्दैवाने हा आदर्श फक्त विचारांच्या क्षेत्रात राहतो. कार्याच्या क्षेत्रात तो उतरत

नाही. आपण कसे असावे ह्या संबंधी बौध्दिक पातळीवर अतिशय स्पष्ट व स्वच्छ चित्रही आपल्या समोर असू शकेल. परंतु मानसिक व शारीरिक पातळीवर मात्र आपल्याच आदर्श विचारांच्या जणू अगदी विरुध्द असल्यासारखे आपण वागतो. आदर्शातील मी आणि प्रत्यक्षातील मी ह्यांच्यात असलेले हे महदंतर हेच मनुष्यत्वाचे पूर्णतेपासून झालेले अध:पतन मोजण्याचे प्रमाण आहे. स्वत:मध्ये काटेकोरपणे तपासून पाहिले तर आपल्याला असे आढळून येईल की, आपण बौध्दिक पातळीवर नैतिकदृष्ट्या भक्कम पूर्ण सदाचारी शारीरिक दृष्ट्या प्रेमळ व सामाजिक दृष्ट्या शिस्तप्रिय कसे असावे ह्याबाबत आपले आदर्श चित्र आपल्या डोळ्यासमोर असते. परंतु भावभावनांच्या मानसिक स्तरावर आपलीच आसक्ती, आवडीनिवडी, रागद्वेष, प्रेम, इच्छा, आकांक्षा आपल्याला आशा दाखवून निराश करीत असतात. जोपर्यंत व्यक्तिला स्वत:मधील दोन व्यक्तिमत्वाची जाणीव होत नाही तोपर्यंत कोणताही धर्म त्याच्यासाठी उपयोगाचा नाही. स्वत:मध्ये द्विधा व्यक्तिमत्व आहे असे जर एखाद्या व्यक्तिला आढळून येईल आणि स्वत:मधील उच्चस्तर भागाइतकाच निम्नस्तराचा भागही जर आपल्याला निष्कलंक राखायचा असेल तर ही महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्याला जे साधन वापरावे लागेल त्याला धर्म म्हणतात. मन हेच लुटारु असून आपल्याला भुरळ पाडून आपल्याला ज्ञात पूर्णत्वापासून दूर नेते व शारीरिक आणि बाह्य विषयवस्तुच्या क्षणभंगुर सुखाचे दास बनविते. मन ही उपाधी आदर्शाचा विपर्यास करते व आपल्यात निम्न स्तराचे व्यक्तिमत्व निर्माण करते.''

व्यक्तिला आपल्या व्यक्तिमत्वाचे नेमके रुप माहीत होण्याकरिता धर्माची आवश्यकता आहे. आपल्या मूळ वासना काय ह्याचे आकलन व्यक्तिला व्हायला हवे. मूळ वासना ह्या उदात्त असतात, व्यापक असतात. पण जसजशा त्या मानवाच्या शारीरिक, मानसिक, भावनिक पातळीशी एकरुप होतात त्यातून मानवाच्या हीन व्यक्तिमत्वाची निर्मिती होते पण निम्न व्यक्तिमत्वाचे बुध्दीशी ऐक्य घडवून आणल्यास निम्न व्यक्तिमत्वास शिस्त लागते व निम्न व्यक्तिमत्व हे उच्च व्यक्तिमत्वाच्या अधिपत्याखाली येते तेव्हा माणूस धर्माचे आचारण करावयास लागतो. आपल्यातील दिव्यत्वाच्या प्रभावाखाली जेव्हा जेव्हा आपल्यातील हीनत्व येते तेव्हा तेव्हा आपल्यातील सैतानी वृत्ती बदलतात व हे दिव्यच आपला मित्र बनतो व ह्या ठिकाण खऱ्या अर्थाने मानवाला आपल्या खऱ्या धर्माचा शोध लागतो.

मानवी धर्माबाबतच्या तत्वज्ञानात्मक उपपत्ती आपण पाहिल्या आहेत पण मानवी धर्माबाबत मानसशास्त्रीय उपपत्ती मांडून मानवाला आपल्या खऱ्या धर्माची जाणीव करुन देणारी ही पहिलीच उपपत्ती आहे व हेच गुरुदेवांचे मोठेपण आहे. धर्माबाबतची अधिक संकल्पना स्पष्ट करतांना "खरा धर्म" ह्या लेखात ते म्हणतात, "धर्म मूलत: एक जीवनशास्त्र आहे असे समजले पाहिजे म्हणजे त्यापासून जीवनाला आवश्यक अशी श्रेष्ठ मूल्ये मिळू शकतील आणि त्या मूल्यावरच आपल्या दैनंदिन जीवनाची शहाणपणाने फेररचना केली पाहिजे. जर प्रचलीत धर्म अतिशय जुनाट, कालबाह्य व अप्रचलीत झालेला असेल आणि त्यामध्ये पुरस्कारलेली आचारभूत जीवनमूल्ये आपल्या दैनंदिन समस्या सोडवू शकत नसतील तर जराही वाईट वाटून न घेता ती सर्व मूल्ये आपणास टाकून द्यावी लागतील आणि योग्य जीवनाची नवीन तत्वे व नियम शोधून काढण्यासाठी आपणास प्रयास करावे लागतील. धर्म म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनाशी थोडाही संबंध नसलेला अप्रतिबंध सत्तेचा तो जाहीरनामाच ठरेल आणि आपल्या निकडीच्या समयी तो जर सोडवू शकत नसेल तर आपणास जुना धर्म तडीपार करावा लागेल आणि एखाद्या नव्या संस्कृतीचा व अधिक स्पष्ट धर्मोपासनेचा स्विकार करावा लागेल. कारण माणूस हा पारलौकिक जीवनापेक्षा लौकिक जीवनाशी मुख्यत: संबंधित असतो व तो तसा असलाही पाहिजे. जनावरामध्ये धर्म नावाची संज्ञाच नसते. धर्माची आवश्यकता, आध्यात्मिक मोक्षाची तळमळ, आपल्यातील खोल अंतर्मनातून येणारी हाक ह्याचा अनुभव फक्त मानवालाच येत असतो. तथापी तो सर्वांना जाणवत असतो असेही नाही. ह्या महान सत्यासंबंधीचा शोध घेण्याची तृष्णा प्रत्येक पिढीमध्ये थोड्याच लोकांना असावी हे अगदी अनिवार्य आहे. काही थोड्या प्रतिभावान लोकांनाच हा अत्यंत महत्वाचा प्रश्न सोडविण्याची तळमळ का लागावी ? डार्विनचे असे म्हणणे आहे की, उत्क्रांतीचा निरनिराळ्या स्तरावर विकसित होत होत प्राणी मानव नावाच्या विचार करणाऱ्या अंतिम अवस्थेप्रत पोहोचला. तरी अजूनही माणसाच्या रुपात पशुवृत्तीने आचरण करणारे आपणास आढळते. जी जनावराच्या बुध्दीने जगत आहेत. अशा माणसांना मग ती आकारोन वा रुपाने माणसे असली तर त्यांना धर्माबद्दल तात्काळ आपण होऊन आस्था वाटणे मुळीच शक्य नसते. पण जे ह्या अवस्थेतून पुष्कळपुढे गेलेले आहेत आणि जे जीवनाच्या स्थित्यंतरातून वाढत जाऊन मानसिक व बौध्दिक दृष्ट्या अधिक विकसित झाले आहेत. त्यांच्यापुढे ह्या सर्व गोष्टी कोठून व का आल्यात? त्या कोठे जातात? जीवनाला

काही हेतू व उद्दिष्ट आहे का? का जीवन म्हणजे एक अपघात आहे? असे आव्हानात्मक प्रश्न उभे राहतात. अशा विकसित माणसाच्या दृष्टीने आव्हानात्मक प्रश्न उभे राहतात. अशा विकसित माणसाच्या दृष्टीने धर्माला काही अर्थ व हेतू असून धर्म त्यांना मार्ग व ध्येय दाखवून देत असतो. तत्वज्ञानाशिवाय जगामध्ये कोणताही धर्म असणे शक्य नसते. तत्वज्ञान हे नेहमीच आपण ज्या जगात राहतो त्या जगाचे व त्याच्या कारणाचे आपल्याला स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करीत असते आणि येथेच खरोखर तत्वज्ञानाच्या पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संकल्पनामध्ये मूलभूत फरक आहे. पाश्चिमात्य माणूस हा स्वभावत: बहिर्मुख असल्यामुळे त्याच्या दृष्टीने तत्वज्ञान म्हणजे सर्वसाधारणपणे भौतिक वस्तुनिष्ठ शास्त्र होय. त्यांच्या दृष्टीने तत्वज्ञान हे जीवनविषयक दृष्टिकोन दर्शविते. पौर्वात्य देशात तत्वज्ञान म्हणजे जीवनाविषयीचा दृष्टिकोन निर्देशीत करण्याच्या प्रयत्नापेक्षा काही तरी अधिक आहे. तत्वज्ञान म्हणजे जीवनविषयक दृष्टिकोन नसून जीवन जगण्याचा तो मार्ग आहे.

तत्वज्ञान हा धर्म आहे व धर्म हा जीवन जगण्याचा मार्ग आहे. हा दृष्टिकोन ठेवून जेव्हा इतर धर्माचे परिक्षण, अवलोकन गुरुदेवांनी केले तेव्हा त्यांना आढळलेली अस्तित्वात असलेल्या सर्व धर्मपैकी हिंदु धर्म त्यातील वेदांत तत्वज्ञानामधून ज्यावर प्रगतीशील जीवनाच्या शांततामय जगाची उभारणी करता येईल अशा आधारभूत गोष्टीची यादी देतो आणि ही मूल्ये पायाभूत कां आहेत ह्याचे ठळकपणे समाधानकारक विवरणही देतो.

मानवी जीवन यशस्वी सार्थक बनविणारे तत्वज्ञान व ह्या तत्वज्ञानानुसार बनलेला आचार धर्म ह्याला गुरुदेवांनी धर्म म्हटले आहे. धर्माबाबतची त्यांची मते ही अत्यंत परखड होती. ते चर्च, देवळे, मशिदी, धार्मिक संज्ञा, मिशन्स, मठ, आश्रम ह्यामधील रमणारी धर्म संकल्पना मान्य नाही कारण ह्या धर्म संकल्पना मानवा-मानवात फुट निर्माण करतात आणि म्हणूनच ते धर्माला एक संस्था मानत आणि जेव्हा ह्या संस्थेचे पंथात रुपांतर होते तेव्हा त्यातील सगळा चांगुलपणा विकृत होतो, असे त्यांचे मत होते. परिणामी संस्कृती ही विकृत बनते पण जेव्हा जेव्हा भारतात अशा संस्कृती विकृत बनविणाऱ्या घटना घडल्या तेव्हां तेव्हां हे सातत्याने सुरु राहिले. पण भारताची आध्यात्मिक तत्व कायम राहिली. यावरुन त्यांनी धर्माची व्याख्या केली. ''या जगाच्या मैदानात जिथे उपनिषदांनी, ऋषींनी सांगितलेली सत्य

तत्वे तंतोतंत पाळली जातात. त्यालाच या देशात धर्म म्हणतात''. धर्माची ही परिभाषा अत्यंत व्यापक आहे. आज देशात धर्माच्या नावावर होणारा रक्तपात पाहिला की प.पू. गुरुदेवांच्या विचारांची महानता आपल्याला पटते. आज हिंदुत्व व हिंदुधर्म ह्या विषयावर चहुकडून वाद निर्माण करणारे हे वातावरण आहे. ह्यावेळी हिंदुत्वाबाबत प.पू. गुरुदेव काय म्हणतात हे पाहणे अत्यंत महत्वपूर्ण ठरते. आजवर एवढी व्यापक हिंदुत्वाची संकल्पना कुणीही मांडली नाही.

## हिंदु धर्म :-

प.पू. गुरुदेवांनी हिंदुत्वाची संकल्पना ऋषीत्वाशी जोडली. ह्याच आशयाने ते म्हणतात, की हिंदुत्वात अनेक धर्म आहेत. ह्या सर्व धर्माचा मिळून एकच धर्म बनला आहे आणि तो म्हणजे हिंदुत्व पण काळाच्या ओघात समाजाच्या मागणीनुसार एक एक धर्म ह्यातून वेगळा होत गेला. धार्मिक पुनरुज्जीवनाची लाट १९ व्या शतकात भारतात आली पण ती लाट धर्मातील वाईट रुढी उपटून काढण्यास असमर्थ ठरली. आज अनेक धार्मिक संस्था सेवाभावी कार्य करीत आहेत पण चुकांच्या कल्पना व चुकीचा मार्ग निवडीत आहे. धर्म वाढवायचा असेल तर धर्म संकल्पनेतील चुकांची मूल्ये उपटून काढायला हवी. पण आज परिस्थिती वेगळी आहे. आज सध्याच्य आधुनिक जगात विज्ञान प्रगती करीत माणसातली माणूस काढून टाकीत आहे. आधुनिक मानवाला नैसर्गिक आपत्तीची भीती वाटतेच पण त्याशिवाय त्यांना विज्ञान, मानव शरीरशास्त्र ह्यांच्यातील नवनवीन शोधामुळे अधिक भिती वाटते. आज सर्वच पिढी मानसिक तणावाखाली वावरत आहे. आजची पिढी उत्तुंग गगनचुंबी इमारतीमधील फ्लॅटमध्ये राहून खायला, प्यायला भरपूर असतांना चांगला निवास व उत्तम कपडेलत्ते असतांना आजचा माणूस हा काळजीने ग्रासला आहे. अशा ह्या बदलांच्या परिस्थितीने व्यक्तिंना ह्या नव्या पध्दतीत मूलभूत आध्यात्मिक सत्य कसे कार्यान्वित करावे याकरिता पुन:मार्गदर्शनाची वा परत एकदा सूचना देण्याची आवश्यकता असते आणि म्हणूनच मानवाला माणूसकी जपण्यासाठी धर्माची आवश्यकता असते. जेव्हा जेव्हा धर्म आणि त्याचे उद्दिष्ट ह्यांची सांगड घातली गेली तेव्हा तो मनव जातीला वरदानच ठरला. ह्या उलट दुर्दैवाने जेव्हा तो धर्म संकुचित होऊन माझा धर्मगुरु माझा पवित्र ग्रंथ माझी धार्मिक कर्मे ह्या अट्टाहासात गुंतला तेव्हाच तो समाजात दुफळी माजविणारा व काही लोकांकरीता झाला त्याची व्यापकता नाश पावली आणि म्हणूनच

धर्माला जर तत्वज्ञानाचा पाया नसेल तर तो धर्मभोळेपणा होईल आणि तत्वज्ञानाला धर्माचा आधार नसेल तर तो वेडगळपणा ठरेल. हिंदु धर्म हा मानव धर्मावर जास्त भर देतो तो असे जोरदार पणे सांगतो की, मानवाने आपल्या मूळ ईश्वरी दिव्य स्वरुपाला अनुसरुन हिंदु धर्माबाबतचे प.पू. गुरुदेवांचे विस्तृत विचार पहिल्या प्रकरणात स्वामी चिन्मयानंद आणि धर्म ह्या मुद्यांतर्गत दिलेले आहेत.

हिंदु धर्माची होणारी पडझड गुरुदेवांकरिता अत्यंत वेदनादायी बाब होती. त्यांनी ह्या ऱ्हासाची अनेक कारणे दिली आहेत.

''आपण हिंदु होऊ या!'' हे गुरुदेवांचे पहिले प्रवचन ह्या प्रवचनात त्यांनी हिंदु धर्म संकल्पना, हिंदु धर्माबाबत गैरसमज इत्यादी वर भाष्य केले आहे. हिंदु धर्माबाबतचा गैरसमज त्यांनी अत्यंत परखड शब्दात मांडला आहे. ते म्हणतात, ''हिंदुस्थानात हिंदु धर्म म्हणजे केवळ एक भोळसट पणाच्या चिंध्यांच गाठोडं आहे. अशी शंका मनात रुजू झाली आहे. याचाच अर्थ असा की, लोकांनी विशिष्ट पध्दतीचे कपडे वापरणे, सोवळ्यात स्वैपाक करणे, विशिष्ट अन्न खाणे म्हणजे जणू काही हिंदू धर्म अशी धर्माची संकल्पना झाली आहे. पण गुरुदेवांच्या मते ही धर्म संकल्पनेची अधोगती आहे. याचे कारण मिमांसा देतांना ते म्हणतात, की पारतंत्र्यात हिंदू धर्म हा अनाथ पोरासारखा वाढला.'' हिंदुंनीच राष्ट्राला अशी अवनत कळा येऊ दिली आहे, असा ते आरोपही करतात. हिंदु धर्म म्हणजे परिपूर्ण होण्याचे शास्त्र आहे. आज आपण आंधळेपणाने जो धर्म पाळतो आहोत तो खराखुरा प्रभावशाली हिंदु धर्म नव्हेच, खरा हिंदु धर्म उपनिषदातून सांगितलेला सनातन धर्म होय. अशीही ते हिंदु धर्माची व्याख्या करतात पण हिंदुत्वातून जर दुष्ट व्यापारी, दुकानदार, निर्दयी सावकार, पैसे खाणारे कारकून, हृदयशुन्य मालक, अविश्वासू नोकर निर्माण करीत असेल तर अशा हिंदुत्वाचा ते निषेधही करतात. अर्थात ही वृत्ती हिंदुत्वाची नाही हे ह्या ठिकाणी स्पष्ट करतात. भारतात केवळ दोन समाज आहेत. Those who were Hindus and those who are Hindus. Indian tradition is Hindu tradition. Strength of Hindus of strength of country. Glory of Hindus is Glory of Country.

हिंदु धर्माचे वैशिष्ट्य वर्णन करतांना An Enquiry into Peace ह्या पुस्तकात गुरुदेव म्हणतात, ''हिंदू धर्म हा कर्तव्य व जबाबदारी ह्यावर आधारीत आहे. तो अधिकारावर आधारीत नाही. In contrast the western way of thought has moulded it self upon the principle of right. Rights are to be taken to be aquired and to be preserved. A civilization based upon rights must necessarilly come to fight. In such a society the Instinects of acquiring hoarding and maintaining ultimately upset peace. On the other hand a culture build upon duties recognizes the right to do one duty as a fundamental privilege in life. A generation that understands such culture gets trained to demand of life ample chances to fulfill its duities. Duty there fore develops the spirit of giving . हिंदुंचा सनातन धर्म हिंदुने स्वत:चे कर्तव्यकर्म करणे ह्या हक्काला जीवनातील मूलभूत अधिकार समजतो. कारण कर्तव्य हे व्यक्तिमध्ये संचयलोभ किंवा राखण्याची चिंता ही वाढविण्यापेक्षा देण्याची वृत्ती जोपासते. हीच बाब तैतरीय उपनिषदाचे विवेचन करतांनाही व्यक्त केली आहे. धर्माची परिभाषा Spiritual Culture ह्या पुस्तकात गुरुदेवांनी केली आहे. ही परिभाषा अत्यंत व्यापक व सर्वसमावेशक आहे. त्यात ते म्हणतात, ''धर्म हा संस्कृत शब्द आहे. ह्याला इंग्रजीत पर्यायी शब्द नाही. कुणी ह्याचे भाषांतर Righteousness असे करतात. पण ह्यातून धर्माचा अर्थ अभिव्यक्त होत नाही.'' धर्म ह्याचे सर्वसमावेशक परिभाषा करतांना गुरुदेव म्हणतात, "It includes all those fundamental values of life that are universally good in all placess and at all times. It is the foundation of all efforts at moral rearmaments and ethical perfection encompassess the eternal duties of every person who want to give up to the full dignity of the human beings and strive consistently to grow in to his full stature as a God man in this very life translet Dharma as duty."

धर्म हे विज्ञान आहे ही बाब गुरुदेव ठासून सांगतात. गुरुदेव अशा धर्माचा विचार करतात जो धर्म व्यक्तिला आपली आंतरिक शक्ती शोधवयास मदत करतो वा ज्या योगे व्यक्ती आपल्या जीवनातील आव्हानांना सामोरे जाऊ शकेल. लोकांची सेवा करुन जीवन जगू

शकेल. बाह्य जीवनात सर्वार्थाने विश्वासाने जीवन जगू शकणे हाच खरा धर्म होय. जीवनाच्या पुनर्मूल्यांकनाचे विज्ञान म्हणजे धर्म आहे. वैज्ञानिकांनी केलेले प्रयोग हे प्रयोगशाळेतील असून ते बाह्य संसाराचे आहे पण प्राचीन ऋषींनी केलेले प्रयोग हे मानवाचे अनुभव व आंतरिक जग आहे. वैज्ञानिक जाणू इच्छितात जग म्हणजे काय व ऋषी जाणून असतात मानव म्हणजे काय. विज्ञान आणि धर्म ह्याचा सहसंबंध स्पष्ट करतांना ते म्हणतात, ''एकेकाळी धर्माने वैज्ञानिक संपादनाला मूल्य दिले नाही व विज्ञानाशी ताळमेळ ठेवला नाही. परिणामी धर्माचा विनाश झाला. आज विज्ञान तीच चूक करीत आहे. विज्ञानाने जाणीवपूर्वक धर्मापासून दूर राहण्याची घोषणा केली आहे. परिणामी भौतिकवाद अत्युच्च सिमेवर पोहोचला आहे व स्वत:द्वारा निर्मित दु:खाने व्याकूळ झाला आहे. धर्म व विज्ञान एकमेकांपासून वेगळे राहून समाजाला सुखी बनवू शकत नाही. मानवाचे व्यक्तिमत्व बहरुन येण्यास आणि अधिक चांगल्या व आनंदमय जीवनाचा उपभोग होण्यास धर्म मानवाला सहाय्यभूत होतो. मानवाच्या आंतरिक व्यक्तिमत्वाचे सुनियंत्रण करणाऱ्या धर्माज्ञांचे सुजाण व सुयोग्य आकलन ह्यामुळेच त्याला उच्च आदर्शाची स्फुर्ती मिळते आणि ते त्याला जीवनाची विशाल दृष्टी देत असतात. मानवाचा आंतरिक विकास जसजसा वाढीस लागेल तसतसे त्याच्यामधील क्षुद्र प्रवृत्ती आपोआप गळून पडत असतात. उच्चतर मूल्यांच्या आकलनाचा परिणाम म्हणून केलेल्या निम्नस्तर मूल्यांचा त्याग म्हणजे मनाचे उदात्तीकरण होय. खरा धर्म आणि परधर्म ह्या दोन संकल्पनांवर हिंदू धर्माच्या अवनत अवस्थेच्या अलीकडील काळात अगदी चुकीच्या अर्थाने समजल्या जातात. ह्या संकल्पना गुरुदेवांनी अधिक स्पष्ट करुन सांगितल्या आहेत. ते म्हणतात, ''जुन्या मताच्या लोकांनी जातीव्यवस्थेचे संकुचित वर्गीकरण कायम टिकविण्यासाठी ह्या दोन शब्दांना खाली खेचून अगदी मर्यादित अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्यावर प्रचंड अशी भाष्ये लिहिली आहेत. स्वधर्म म्हणजे एखाद्या जातीत जन्मल्यामुळे व्यक्तिच्या वाट्याला आलेले कर्म नव्हे. खऱ्या अर्थाने येथे व्यक्तिचा धर्म म्हणजे त्याच्या अंत:करणात त्याला आढळून येणाऱ्या वासनांचा प्रकार होय. प्रत्येक व्यक्तिने स्वत:च्या सहज व जन्मजात प्रवृत्तीप्रमाणे कर्म करणे होय. शांती, सुख, यश व समाधान यांनी जीवन जगण्याचा मार्ग आहे. आपल्या स्वत:च्या मूळ वासना विरुध्द वागणे म्हणजे परधर्म. मानवाच्या नेमका धर्म कोणता? ह्यावर विवेचन करतांना गुरुदेव म्हणतात, जगातील प्रत्येक पदार्थाला दोन प्रकारचे गुणधर्म असतात.

१) आवश्यक, २) अनावश्यक. अनावश्यक गुणाच्या अभावी पदार्थ राहू शकतो. परंतु आवश्यक गुणधर्माशिवाय तो राहू शकत नाही. ज्योतीचा रंग, ज्वालांची लांबी, रुंदी हे सर्व अग्नीचे अनावश्यक गुणधर्म आहे पण त्याचा आवश्यक गुणधर्म उष्णता हा आहे. पदार्थाच्या ह्या गुणधर्माला त्याचा धर्म म्हणतात. मग मनुष्याचा नेमका धर्म कोणता? कातडीचा रंग, भावनांची व विचारांची अगणित असिम विविधता, थोडक्यात स्वभाव, शरीर, मन, बुध्दी यांची स्थिती व क्षमता हे सर्व त्या सर्वांच्याद्वारा व्यक्त होणाऱ्या चैतन्य तत्वाच्या दिव्य जाणीवतत्वाच्या स्पर्शाशी तुलना केली असता मानवी व्यक्तिमत्वातील ते अनावश्यक घटक आहेत. आत्मतत्वाशिवाय मनुष्य अस्तित्वात राहू शकत नाही. तेच अस्तित्वाला आधार देते. म्हणून मनुष्याचा आवश्यक धर्म त्यांच्यातील अस्तित्वाचे दिव्य स्फुल्लिंग अनंत परमात्मा हा आहे. धर्म ही संज्ञा अशा रितीने समजल्यावर केवळ नितीचे व सदाचाराचे नियम जीवनातील सर्व कर्तव्ये, परिस्थितीविषयी आपल्या सर्व जबाबदाऱ्या, आपले प्रेम, आदर, दयाशीलता, सौजन्य सर्व भावना आपल्या ग्रंथामधून धर्म म्हणून मानल्या गेल्या आहेत. त्या सर्व गोष्टी आणि ह्या संज्ञेतील फरक आपल्या नीट लक्षात येईल. अशा ह्या शारीरिक, मानसिक व बौध्दिक कर्मात व कर्माद्वारा मनुष्य आपल्या खऱ्या धर्माची अभिव्यक्ती म्हणजेच सर्वव्यापी आत्मतत्व म्हणून असलेली त्याची दिव्य योग्यता प्रगट करील. आत्मतत्व म्हणून खऱ्या अर्थाने जगणे आणि आपल्या सर्व कृतीमधून व बाह्य जगाशी असलेल्या आपल्या सर्व संपर्कामधून त्याचे अनंत परिपूर्णत्व व्यक्त करणे म्हणजे आपल्या धर्माचा पुनर्शोध घेणे होय.

## हिंदू धर्माच्या अवनतीची कारणे :-

हिंदू धर्माची होणारी पडझड ही गुरुदेवांकरिता अत्यंत वेदनादायी बाब होती. हिंदु धर्माच्या पडझडीची अनेक कारणेही त्यांनी आपल्या विविध विवेचनात दिले आहे. गीता आध्याय १० चे विवेचन करतांना ते म्हणतात, ‘‘जे परकीय धर्म प्रचारक ह्या देशात गुपचुपपणे शिरले त्यांनी आपल्या वैदिक परंपरेचे चुकीचे आधार देऊन चुकीचे अर्थ लावले. कारण त्यांचे लज्जास्पद अज्ञान किंवा कदाचित ह्या अतुलनीय कल्पनांचे आकलन करण्याची त्याची जीवशास्त्रीय दृष्ट्या असलेली असमर्थता गेल्या दोनशे वर्षातील आपल्या देशाच्या लोकात इतिहासाने आमच्या पुरातन संस्कृतीच्या भंजकांना आमच्या समाजात मानाचे स्थान दिले

आणि परकीय राज्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष आश्रयाखाली त्यांनी आमच्या मुलांचे शिक्षण होण्यासाठी धडपड केली. धर्मप्रचारकांची महाविद्यालये व विद्यालये म्हणजे नकली शिक्षित हिंदुंना टाकसाळी प्रमाणे बाहेर काढण्याची धोकादायक गुप्त स्थळे होती. सध्याचे आम्ही जे आहोत ते आपल्यातील फसव्या विद्याधनाचे प्रतिनिधी आहोत की जे दुरुन पाहिले असता शिक्षणासारखे दिसते. परंतु काळजीपूर्वक केलेल्या विश्लेषणानंतर व्यवहारासाठी ते निश्चित पणे निरुपयोगी ठरते. गीता अध्याय ६ च्या विवेचनात प.पू. गुरुदेव म्हणतात, हिंदु पारंपारिक विचारधारेमध्ये जाणूनबुजून घुसविलेल्या उपद्रवी गैर समजूतीमुळे हे उदात्त हिंदु तत्वज्ञान विकृत झाले आहे. अध्याय ३ मध्ये ते म्हणतात, ''जेव्हा विदेश संस्कृतीचे लोक त्याच्या स्वाभाविक उत्साहाने हिंदु धर्माचा विचार करतात तेव्हा तो धर्म समजण्यास कठीण जातो. जेव्हा ते नानाविध मार्गाचे आणि वर वर विरोधी दिसणाऱ्या उपदेशाचे वाचन करतात तेव्हा त्यांच्या मनावर दडपण आल्यासारखे वाटते पण एवढ्यावरुन हिंदु धर्म हा अशास्त्रीय आहे असे म्हणणे घोडचूक आहे.''

आजपर्यंत अविचारी अभ्यासकांनी व अप्रबुध्द अनुयायांनी चुकीचे अर्थ लावल्यामुळे उतरतीकळा लागलेल्या हिंदु धर्माचे पवित्र ज्ञान प्रदुषित झाले. कोणत्याही धर्माचा ऱ्हास होतांना अप्रबुध्द लोकांकडून धर्मग्रंथाचा उलटसुलट चुकीचा अर्थ लावला जातो. कारण ती महान व अमर श्रृतीवचने व्यवस्थित समजावून घेण्यास त्यांना योग्य असे मार्गदर्शन मिळालेले नसते. एखादे तत्वज्ञान जसे कितीही श्रेष्ठ असले तरी त्यात मांडलेल्या कल्पना व तत्वे बुध्दीच्या निकषावर घासून घेतल्या गेल्याशिवाय ते तत्वज्ञान लोकांसाठी उपयुक्त ठरु शकत नाही.

तैतरीय उपनिषदाच्या शिक्षावल्लीचे विवेचनात हिंदु धर्माच्या अवनतीची कारणमिमांसा करतांना गुरुदेव म्हणतात, धर्मप्रसार कण्याच्या दुर्दम्य उत्साहाने खदखदत असलेल्या अभ्यासी जीवनाची तेजस्वी प्रेरणा गतकाळात कोठेतरी आपणास सोडून गेली आणि शापित काळापासून पुढे विनाशकाली क्षयाकडे नेणारा हिंदु धर्माचा ऱ्हास सुरु झाला. धर्ममार्तंडांनी या शब्दाचा चुकीचा अर्थ काढण्यास आणि ज्ञानाची मक्तेदारी आपणाकडेच आहे असा गैरवाजवी हक्क सांगण्यास शिकले. त्यांच्या थोर देशांच्या सांकृतिक वारशाचा त्यांनी दुराचाराने व्यापार केला. मुख्यत: विपर्यास करणाऱ्या अविवेकामुळे तसेच सत्ता आणि प्रतिष्ठा यांच्या दृष्य आकर्षणामुळे बहुतांश उत्तेजीत झाल्याने बहुसंख्यांकापासून विद्या काढून घेणे आणि

ती आपसात वाटून घेणे त्यांना जास्त सोयीचे वाटले आणि त्याप्रमाणे त्यांनी विशेष ज्ञान आणि म्हणून विशेष राजाश्रयांनी संपन्न असा बुध्दीजीवींचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण केले. त्यावेळी सुरु झालेला हा दु:खद ऱ्हास बुध्दाच्या काळात भेडसावू लागला. त्यावेळी निरस अशा कर्मकांडाच्या अतिरेकामुळे भारत मातेच्या शांत आणि प्रसन्न चेहऱ्यावर भयानक घाव घातले गेले होते आणि बुध्द जो ह्या संस्कृतीचा पुत्र होता तो अस्तित्वात असलेल्या उणीवाविरुध्द बंड करुन उभा झाला आणि त्याने त्या विरुध्द आपली मोहिम सुरु केली. दुर्दैवाने त्याच्या अनुयायांनी त्या प्रेषिताच्या शांतीचा उपदेशाचा चुकीचा अर्थ लावून त्या पिढीची दिशाभूल केली. सनातन धर्माला पुन्हा पुनर्स्थितीत आणण्यासाठी आद्य शंकराचार्य पुढे झाले. पण तत्ववेत्यांच्या कार्याचा आणि महात्म्यांचा धर्म ग्रंथाचा त्यांच्या काळाचा संदर्भ सोडून अर्थ लावल्यामुळे पुढची पिढी संभ्रमात पडते. ही शोकांतिका मोठ्या प्रमाणात शंकराचार्याच्या शिष्याबाबत घडून आली. सध्याच्या काळी जेव्हा हिंदू धर्म त्याच्या अवनतीच्या ओहटीच्या अवस्थेत बुडून गेला आहे जेव्हा परकीय कल्पना विचारप्रणाली ह्या पध्दतशीरपणे ह्या देशत झीरपत आहेत आणि लोकांच्या मनाची पकड घेत आहेत आणि जेव्हा ह्या शोचनीय जखमांचे व्रण हिंदु संस्कृतीच्या अस्मितेचा खात्रीपूर्वक शेवट करीत आहेत. अशावेळी जर आपण उपनिषद सत्याचे सामर्थ्य ह्या पिढीमध्ये आणि समाजामध्ये, परिस्थितीची जितकी निकड आहे. तितक्या कळकळीने जर निर्माण केले नाही तर हिंदुच्या वरील संकट खरोखर अटळ आहे.

हिंदु धर्माच्या अवनतीचे आणखी एक कारण वर्णव्यवस्थेची काढलेली चुकीची अर्थनिष्पत्ती. पहिल्या अध्यायाच्या विवेचनात गुरुदेवांनी ह्यावर विस्तृत भाष्य केले आहे ते म्हणतात, ''वर्ण ह्या शब्दाचा विपरीत अर्थ केल्यामुळे आधुनिक काळात सुशिक्षितांकडून त्यावर खूप टिका झाली आहे. जर वर्ण ह्याचा अर्थ खरोखरच आज आपण करतो तसाच असता तर ती टीका समर्थनीय आहे. पण जातीच्या नावाखाली आज आपण जे भोवताली पाहतो ते म्हणजे जीवन जगावे कसे हे शिकविणाऱ्या हिंदुधर्माची अवनती आहे. त्या काळामध्ये जात ही व्यक्तीव्यक्तीच्या बौध्दिक व मानसिक मनसामर्थ्यानुसार समाजामध्ये उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाची योजनापूर्वक केलेली सुबुध्द अशी विभागणी होती. जे बुध्दीवादी होते आणि संशोधन करण्याची ज्यांना तळमळ होती ते ब्राम्हण म्हटले गेले. ज्यांना नेतृत्व करण्याची राजकीय महत्वाकांक्षा होती, देशात शांती व समृध्दी राखण्याचे तसेच देशाचे आंतरिक व बाह्य

आक्रमणापासून संरक्षण करण्याचे जोखीमीचे काम ज्यांनी पत्करले होते त्यांना क्षत्रिय असे संबोधले गेले. जे शेती व व्यापाराद्वारे देशाची सेवा करीत होते ते वैश्य होते व शेवटी जे वरीलपैकी कोणत्याच प्रकारात मोडत नव्हते आणि समाजात सेवाकार्य निर्माण करण्यासाठी श्रम करणे हे ज्यांचे कर्तव्य होते त्यांना शुद्र असे म्हटले जात होते.

हिंदु ऋषिमुनींनी सर्व मानवजात व्यक्तिच्या मानसिक प्रकृती धर्मानुसार चार वर्णामध्ये विभागली आहे. आंतरिक, मानसिक स्वभावाचे नियमन करणारी शक्ती जर काटेकोरपणे कार्य करीत नसेल तर आचारात गोंधळ चारित्र्यात अस्थिरता निर्माण होईल. वर्ण ह्या शब्दाचा अर्थ चुकीचा लावल्यामुळे नेमकी कशी परिस्थिती उद्‌भवली ह्याचे स्पष्टीकरण गीतेच्या पहिल्या अध्यायाच्या विवेचनात गुरुदेवाने केले आहे.

गीता अध्याय ४ था मधील विवेचनात ह्याबाबत गुरुदेवांनी विस्तृत विवेचन केले आहे. ते म्हणतात, ''अलीकडच्या काळात जातीव्यवस्था ह्या स्वरुपाचा सामाजिक गुन्हा उचलून धरणाऱ्या कडून वर्ण ह्या शब्दाचा गैर उपयोग केला जात आहे. वर्ण ह्याचा अर्थ रंगाच्या निरनिराळ्या छटा. मानवात जे तीन गुण आहेत त्याचे तीन वेगवेगळे रंग आहेत. सत्व गुणांचा रंग पांढरा, रजगुणाचा रंग तांबडा, तमगुणाचा रंग काळा! असे समजण्यात येते. मनुष्य जसे विचार बाळगतो तसा तो असतो. व्यक्तीव्यक्तीमधील विचार सकृदर्शनी जरी सारखे दिसत असले तरी प्रत्येकाच्या नैसर्गिक स्वभावानुसार त्यांच्यात काही स्पष्ट फरक आढळतात. ह्या स्वभाविक गुणविभाजनानुसार आध्यात्मिक जीवनाच्या अभ्यासाच्या दृष्टीने सर्व मान जात चार वर्णात विभागली जाते. सुबुध्द माणसांनी बाळगलेल्या विचाराच्या दर्जावर (गुण) जातीत चार नावे संबोधिली जातात. समाज निकोप राहण्यासाठी सर्व जाती हे स्पर्धात्मक घटक न राहता सहाय्यक असावेत. ते परस्पर पूरक असावेत. वर्ण ह्या शब्दाची संपूर्ण व्याख्याच आपले सध्याचे गैरसमज दूर करते. मनुष्य केवळ जन्माने ब्राम्हण असत नाही तर चांगले ध्येय व सद्‌विचार मनात रुजल्याने आपण ब्राम्हणत्व मिळवू शकतो. ज्याचे आचार व विचार सात्विक आहेत तोच खरा ब्राम्हण. ज्याचे विचार व आचार राजस आहेत तो क्षत्रिय आणि शुद्र म्हणजे ज्याचे विचार केवळ तामसी असतात असे नव्हे तर जो आपल्या भोगलालसा पशुवासना भागविण्यासाठी शुद्र कर्माचे जीवन जगतो. वास्तविक पाहता हे चैतन्य तत्वच

अर्थात आत्मा हा स्वत:च्याच मायेने जणू मानसिक व बौध्दिक जीवनाच्या तीन अवस्थांमधून स्वभाव वैचित्र्यामुळे प्रगट होतो. ते म्हणजे १) सात्विक कर्म (unactivity), २) राजस कर्म (activity), ३) अकर्म (inactivity) ह्या तीन अवस्थांच्या मार्गातून वाहणारे चैतन्याचे प्रगटीकरण शरीरधारी जीवाचे निरनिराळ्या विचार विक्षेप व कर्म ह्या अवस्थातून व्यक्त होत असते.

## वर्ण व्यवस्था :-

पूर्वीच्या काळी केव्हा ती निकोप वर्णव्यवस्था खालावण्यास सुरवात झाली व ती साचेबंद होऊन जातीचे विच्छेदन झाले आणि समाजाची एकसंघ वाढ खिळखिळी झाली आणि धर्म हा समाजाच्या एका विभागाच्या स्वामित्वाखाली आला. लवकरच ह्या वर्गाचे त्याची नैतिकता आणि बौध्दिक निष्ठा ह्या बाबतीत अजाणतेपणी इतके अध:पतन झाले की, ते वर्ग धर्मग्रंथाचा अर्थ गैरसमजुतींनी संरक्षण देईल आणि त्याच्या मक्तेदारीला कायमची हमी मिळते असा लावू लागला. आज अस्तित्वात असलेली असंख्य, बहुसंख्य भाष्ये त्याकाळी प्रचारात असलेला हा खोटा अर्थ प्रतिध्वनीत करतात. धम म्हणजे काही स्थुल शरीराची वाढ करणारी पध्दती नव्हे किंवा भौतिक शरीराच्या द्वारा साध्य करण्याची ती कलाही नव्हे स्थूल शरीराची स्थिती आणि अवस्था ह्यांचा धर्माने आपल्या उपदेशातून उत्क्रांतीच्या प्रगतीचे जे ध्येय दाखविले आहे त्याच्याशी काहीही संबंध नाही. मन आणि बुध्दी पूर्ण परिपक्व होऊन स्वत: गळून पडून

हिंदु धर्माच्या विशाल इतिहासामध्ये कर्मकांडात्मक भागात रुतून पडलेल्या पिढीला फटकारुन त्यातून बाहेर काढण्यासाठी व आत्मपूर्णत्वाच्या न बदलणाऱ्या साधनेचा बुध्दीप्रमाणे अंगीकार करावयास लावण्यासाठी अनेक थोर महात्मे होऊन गेल्याचे आपण वाचतो. काही शतकापूर्वी अतिरेकी कर्मकांडाविरुध्द बुध्दाने आवाज उठविला. त्यानंतर निखळ कर्मकांडात्मक तत्वज्ञान मोडून काढण्याकरिता श्री शंकराचार्य अवतरले. ज्युचे कर्मकांड जेव्हा निव्वळ औपचारिक स्वरुपाचे व महागडे झाले तेव्हा बहुसंख्य गरिब लोकांना त्यावेळेच्या धर्माचे पालन करणे अशक्य झाले आणि म्हणून त्या काळी ख्रिस्ताचे आगमन झाले. फारसीच्या क्लिष्ट कर्मकांडापेक्षा भक्तीपूर्वक प्रांजल शरणागती आकाशातील पित्याला स्विकारार्ह आहे असे ख्रिस्ताने उघडपणे सांगितले. अर्जुन हा त्याकाळातील हिंदु समजाचा एक नमुनेदार घटक होता.

शास्त्राच्या गर्भितार्थाविषयी त्याच्या मनात अनेक गैरसमजुती होत्या. त्या गैरसमजुती कोणत्या थरापर्यंत पोहोचल्या होत्या हे पाहिल्यावर श्री. व्यासांनी गीतेच्या रुपात धर्मशास्त्रे परत लिहावीत व त्यायोगे हिंदु धर्माचे पुनरुज्जीवन करावे असे त्याकाळी वाटले असावे. अशा हिंदु पुनरुज्जीवनाच्या चळवळीची ज्योत गीतेने पेटविली. पण हिंदु धर्म हा एकट्या दुकट्या प्रेषितांची निर्मिती नाही तर साक्षात्कारी महात्म्यांच्या अनुभूती घेतलेल्या अंत:करणातून उंचबळणाऱ्या त्या विद्रत उक्ती आहेत. की ज्यांना शिष्य वर्गाच्या पिढ्यांनी पुढे अधिक उजाळा दिलेला असतो. जे सत्य तपासून घेतले आहे आणि भावी अनेक पिढ्यांना जीवन परिसावर घासून योग्य असल्याचे आढळले आहे केवळ तेच सत्य आर्य भक्तांनी स्विकारले आहे.

## हिंदु धर्म आणि आधुनिक काळ :-

आजच्या आधुनिक युगात हिंदु धर्माबाबतचे अनेक प्रवाद समाजात ऐकावयास मिळतात. ह्यातील एक प्रवाद म्हणजे हिंदु धर्म हा एक मृतप्राय असा धर्म आहे. ह्या प्रवादावर भाष्य करतांना गुरुदेव कठोपनिषदाच्या प्रस्तावनेत एका उदाहरणाच्या माध्यमातून विवेचन करतात. ते म्हणतात, "हिंदू धर्म हा मृतप्राय झालेला धर्म आहे हे म्हणतांना अर्वाचीन टिकाकार हे त्याची तुलना वठलेल्या वृक्षाशी करतात. पण वास्तविक पाहता त्या वठलेल्या वृक्षा जवळ गेल्यास लक्षात येते की, त्यावर एखादे बांडगुळ अजूनही जीवनरस घेत आहे. त्यासाठी पूर्ण वृक्ष उपटून काढण्याची आवश्यकता नसते. जीवंत झाडाच्या रसावरच बांडगुळे वाढू शकतात. त्याचप्रमाणे आपला धर्मवृक्ष त्यास हिरवा पर्ण समोर न फुटल्यामुळे फुलोऱ्यांनी न बहरणारा आणि आसपास फलसंपत्ती न देणारा असल्यामुळे तो सकृतदर्शनी मृत आहे आणि तरीही तो आपल्या सर्वांशावर अंधश्रध्दा, चमत्कार, जादू आणि निव्वळ फसवेगीरे यांचे रानगवत बेफाटपणे वाढू देत आहे. तर तो वृक्ष अद्याप मृत नाही असाच आपण निष्कर्ष काढू शकतो. अशा वृक्षाचे आपण पुनरुज्जीवन करु शकतो. अंधश्रध्दांचे भोंदूगीरीचे अफाट रानगवत कसे काढून टाकायचे हे आपल्याला समजेल आणि त्या आदरणीय पुरातन वृक्षास त्यानंतर समृध्दी निष्ठा आणि सुबुध्द आकलन यांचे निर्भेळ खतपाणी दिले तर आपण हिंदु धर्माचे पुनरुज्जीवन करु शकू. विशेषत: हिंदू धर्मामध्ये ते एका ठराविक संप्रदायाशी कधीच बांधून न राहिल्यामुळे एखादा सर्वात जास्त गोंधळात पडतो. जगात आज जे धर्म म्हणून उपलब्ध आहेत. त्यांच्याशी

तुलना करता हिंदू धर्मास धर्म म्हणून सुध्दा संबोधता येणे शक्य नाही हिंदू धर्मास फार तर ज्यामध्ये सर्व व्यक्तिंना सदाचारी जीवन आणि नैतिक परिपूर्णता यांच्या निकोप वातावरणात शक्य आहे. तेवढे जास्तीत जास्त विकसन साधता येईल. इतपत पूर्ण स्वातंत्र्य मान्य केले आहे. असा एक प्रगतीशील आणि एकसारखा विकसित होणारा धर्म संप्रदाय म्हणता येईल.

आपणास नवीन परंपरा स्विकारावी लागली तरी ती आपण स्विकारायला हवी आणि आपल्या आजच्या युगाच्या नवीन सामाजिक गरजांना सामावून घेतले पाहिजे, असे करणे म्हणजे बंड करणे असे नाही. हिंदू धर्माचा इतिहास हा क्रांतीचा इतिहास आहे. ज्यात समाजाच्या गरजेनुसार वेळोवेळी आणि ठिकठिकाणी विकसन होत गेले. हिंदु संस्कृती ही स्पष्टपणे इतर सर्वांहून वेगळी आणि जगातील इतर सर्व लोक किंवा देश यांच्याशी तुलना करता ती लक्षात भरण्याइतपत परिपूर्ण आहे. युगायुगाच्या गरजानुसार नव्या परंपरा किंवा रुढी स्विकारण्याची तत्परता हिंदु धर्माला अशा प्रकारच्या दीर्घ ऐतिहासिक अस्तित्वाची शाश्वती देणारी निकोप खूण आहे. आज सुध्दा हा धर्म विनाशात्मक ऱ्हासाच्या इतक्या खोल गर्तेत आला असूनही अद्याप जीवंत आहे. ह्याचे कारण धर्माची श्रेष्ठ तत्वे ही जीवनपध्दतीशी इतक्या सुंदररितीने एकमेकात गुंफलेली आहेत की निष्ठावान साधक फक्त आध्यात्मिक क्षेत्रातच नव्हे तर दैनंदिन भौतिक जीवनातही अधिक सुखाचा वाटा निर्माण करु शकतात. धर्माची जीवनापासून फारकत झालेली आहे असे समजणे म्हणजे धर्माबाबतच्या अज्ञानाची कबुली देणे. खरा धर्मा हा जीवनातून अंकुरीत होतो. जीवनात स्थीत होतो व त्याची परिपूर्ती जीवनातच समाविलेली असते. जीवनापासून फारकत घेतलेला धर्म हा जीवंत माणसाठी धर्म नव्हेत. ''पण आज धर्माचा धर्म संकल्पनेचा जो विपर्यास झाला आहे त्यावर टिका करतांना गुरुदेवांनी अत्यंत मार्मिक उद्‌गार काढले आहेत. ते म्हणतात, ''हिंदूंनी आपल्या संस्कृतीचे थडगे जे उघडे केले आहे ते शाश्वत धर्माच्या याच आचारपध्दतीच्या कुदीने राष्ट्र म्हणून सुध्दा जर आपणाजवळ स्पष्टपणे अधर्मी म्हणून घेण्याचे निर्दय पशुसम धैर्य असते. तर कदाचित आपण आपल्या भौतिक जीवनात तरी अधिक चांगले झालो असतो. धड धर्माच्या मार्गावरुन चालण्याचे आध्यात्मिक ध्यैर्य आपल्याजवळ नाही ना धड अधर्मी होण्याचे प्रबळ धैर्यही. स्त्रिसुलभ भित्रेपणामुळे, स्वत:शी तडजोड करीत अधर्मासारखा धर्म आणि धर्मासारखा अधर्म असे दोन निरनिराळे

आदर्श जगण्याचा आपत्तीचा खेळ आपण खेळत आहोत.'' खरा हिंदु तोच आहे ज्याने आपल्यास्वत:च्या आप्ताविषयी ह्या कर्तव्याची परिपूर्ती तसेच ज्या पिढीत तो राहतो त्या पिढी विषयीच्या कर्तव्याचीही परिपूर्ती त्याने केल्यावरच तो आपल्या मुकतीचा प्रयत्न करतो. धर्माचार हा परिपूर्ण समाज आणि जाती जीवनाला अडथळा असू शकत नाही आणि होणारही नाही. आपल्या भोवताली असलेल्या विश्वातील मानवाच्या गरजा व दु:खे ह्याच्यापैकी पूर्णपणे जागरुक असण्याऱ्या पैकीच धार्मिक व्यक्ती असतो. समाजात अनेक मानसिकतेचे अनेक व्यक्ती असतात त्यांचे स्वत:चे एक तत्वज्ञान असते. धर्माबाबतचे त्यांचेही स्वत:चे तत्वज्ञान असते. प्रामुख्याने समाजातील धर्माबाबतची भावना म्हणजे शिखर, गोपूर घुमट ह्यांच्या खाली आढळणारा धर्मवेडेपणा इतकाच असतो. ह्या प्रवृत्तीवर गुरुदेवांनी कडाडून हल्ला केला आहे. ह्या प्रवृत्तीला त्यांनी धर्मवेडेपणा व धर्म संघर्ष असे संबोधले आहे. धर्माच्या तत्वज्ञानाला जे आज कर्मकांडाचे रुप प्रदान झाले आहे ह्याच्याही ते विरोधात होते असे आपणास इशावास्य उपनिषदाच्या प्रस्तावनेतील त्यांच्या विचारावरुन आढळते. त्यामुळे समाजाच्या आजच्या स्थितीचे वर्ण करतांना ते म्हणतात, ''खरा बलशालीपणा आणि जीवनदायी गतिमानता यांच्या अभावी आजकाल फार थोड्यांच्या हातात सापडलेला धर्म हे एक संपूर्ण पिढीला हतबल करणारे आणि फसव्या भावना, धर्मवेडे भयगंड आणि संघर्ष पोसणारा धर्मवेडेपणा यांनी त्या पिढीला पुष्ट करणारे एक क्रुर अमानवी यंत्र बनले आहे.'' मग प्रश्न उद्‌भवतो की स्वयंधर्म कोणता. वास्तविक धर्मामध्ये मानवी जीवनाची व नितीमूल्यांची शास्त्रशुध्द मांडणी असते. जगातील सर्व धर्मांनी प्रत्येक पिढीची सेवा केली आहे. त्यायोगे मानव समाज अतिविकसित झाला पण हा अतिविकसित आजचा मानव समाज हा धर्माची उपयुक्तता समजून घेण्यास असमर्थ ठरला. काळानुसार धर्म संकल्पनाबाबत बदलता हा दृष्टिकोन अतिशय मार्मिक शब्दात गुरुदेवांनी इशावास्य उपनिषदाच्या प्रस्तावनेत वर्णन केला आहे. ते म्हणतात, ''आदीवासी संघ जीवनापासून जाती प्रधान जीवन पध्दतीपर्यंत राष्ट्रीय आकांक्षापूर्तीपासून ते आंतरराष्ट्रीय तणावापर्यंत त्यांच्या सर्व शक्ती संघटना आणि त्यांची असंतुलने यासह मानव त्यांच्या संघटनाच्या गुंतागुंतीच्या बाबतीत आणि गरजांच्या प्रकार वैचित्र्याच्या दृष्टीने संख्येने वाढतच गेला आहे. इतिहासाची ही काळाच्या बोळा बोळातून घोडदौड चालू असतांना शासन संस्थेने धर्माला आपली सहचारिणी करुन यात्रा चालू ठेवली. पण मध्ययुगाच्या सुमारास केव्हातरी यंत्रयुगाच्या

उपन्याबरोबर एक बुध्दीमान तरुणी शास्त्र स्वरुपात त्या मंडळींना भेटली अर्थात राज्याची सेवा करण्याच्या त्याच पवित्र हेतूने परंतु वैतागलेली मत्सरी आणि जवळ जवळ क्रोधोत्तेजक झालेली धर्म माता घोडदौडीत मागे पडली. आज धर्म हा चर्च, मशिदी आणि मंदीरे यांच्या आवारात अद्यापही रेंगाळत आहे. हातात ॲटमबॉम्ब घेतलेल्या नव्या पिढीने बाह्य जगतात नवनवी क्षेत्रे शोधत संसदेत प्रवेश केला आहे. पण आंतरिक जगतात दु:खेच हस्तगत केली आहेत'', असे अंतर्गत दु:खाने ग्रस्त असणारे जग आजी धर्माकडे आशेने पहात आहे. पण आज व्यक्ती आणि धर्म ह्यामध्ये खूप मोठी दरी निर्माण झाली आहे. पण धर्माला पुन्हा मुळ रुप प्राप्त करुन द्यायचे असेल तर ज्यातून त्याची निर्मिती झाली त्या उगमस्थानापासून त्याला पुन्हा शोधावे लागेल. कारण धर्म हे जीवनाचे शास्त्र आहे. पशुकरिता धर्म नसतो. जीवनात सर्वोत्कृष्ट लागले असून मानवास वाटणारी अशांती यावर धर्म म्हणजे इलाज आहे. ह्या अफाट विश्वास मानवी जीवनाचे मानवाचे नक्की स्थान काय हे जाणून घेण्याची धर्म ही एक पध्दती आह. श्रीमंताच्या दृष्टिकोनातून भौतिकवादाच्या दृष्टिकोनातून धर्म संकल्पना विषद करतांना ते म्हणतात, ''धर्म म्हणजे श्रीमंताची उधळपट्‌टीची चैनीची वस्तु होय. असा जे दावा करतात त्या भौतिकवाद्यांना त्याची अंतर्यामी स्पष्ट गरज वाटत नाही आणि म्हणून त्यांना त्यांच्यातील वातावरण किंवा दैवी प्रयत्न यांची त्यांना गरज वाटत नसते. आपले व्यकितगत जीवन जगत असतांना आपले जीवन समग्रपणे निरीक्षण करण्याची त्यांच्यात बौध्दिक कुवत आहे. त्यांना जीवनातील अपूर्णता जर असतीलच तर त्या अनुभवण्याचा विवेक आहे आणि ज्यांना ज्यांना अधिकतर आणि समाधानी पूर्णत्वाचा शोध घेण्याकरिता आणि ते मिळविण्याकरिता पुरेशी शक्ती आहे अशा उत्क्रांत व्यक्तिंना धर्माचा उपयोग होतो. बाह्य जगात आणि स्वत:मधील आंतरिक जगात दु:खमय परिस्थितीबद्दल त्या व्यक्तिला वाटणारी चिंता आणि तळमळ तीव्र असल्याखेरीज तिला दु:खद परिस्थितीतून विकसित होण्याचा मार्ग शोधून काढता येणार नाही. धर्म आत्मपूर्णत्वाचे परिपूर्ण शास्त्र आहे.''

## धर्माचा सार्वभौम आशय :-

धर्म ह्या संकल्पनेने अखिल मानवी जीवन व्यापले आहे. धर्म हा शब्द मानवाच्या श्वासोच्छसाशी निगडीत आहे. ह्याचा आशय व्यक्त करतांना केनोपनिषदाच्या

प्रस्तावनेत गुरुदेवांनी नमूद केले आहे की, "धर्म म्हणजे मानवाचा विशेषाधिकार आहे. जनावरांची उपजत बुध्दी नव्हे. मानवाला जीवनात अन्न, वस्त्र, निवारा, करमणूक सर्व मिळाले तरी तो खूष नसतो, समाधानी नसतो. ह्यापेक्षा अधिकतर साध्य शोधण्यासठी तो उत्कंठीत असतो. ज्यांचे स्वत:ला पूर्ण उत्क्रांत मानव बनविले आहे. त्याचे जीवन ह्या प्रश्नाने भारावून जाते. मी कोठे जात आहे? मी का जन्माला आहो? जीवनाला काही ध्येय आहे का? जीवनाला काही कार्य करायचे आहे का? खरा धर्म असे प्रश्न पडणाऱ्या व्यक्ती साठीच असतो. आज धर्माच्या दोन अंगापैकी फक्त कर्मकांडात्मक बाजूचाच विचार लोक अधिक करतात. त्या मानाने धर्माची तात्विक बाजू दुर्लक्षित केली जाते. ह्याबाबत गुरुदेवांनी नाराजी व्यक्त केली आहे. ह्या दोहोंचे एकमेकांविना स्थान हे अपूर्ण असते. तत्वज्ञानाशिवाय आचरलेला कर्मकांडात्मक औपचारिक धर्म म्हणजे अंधश्रध्दा होय. धर्म विरहीत तत्वज्ञान उजाड असते, असे परखड मत त्यांनी मांडले आहे.'' जीवनाचे ध्येय आणि त्याचे स्वरुप याचे स्पष्ट विवरण हा धर्माचा त्याच्या पूर्ण अभिप्रायाच्या दृष्टीने गाभा असतो. जे आचार अनुसरुन सर्व स्तराचे लोक उत्क्रांतीच्या त्याच्यापुढे ठेवण्यात आलेल्या ध्येयांच्या यात्रेला सुरवात करु शकतात. अशा आचरण पध्दतीचे वर्णन त्यात असते. ह्यासाठीच गुरुदेवांनी धर्माचे विस्तृत भाष्य केले आहे ते म्हणतात, "धर्म हा काही विषयवस्तुच्या स्वरुपात किंवा निरनिराळ्या परिस्थितीतील त्याच्या रचनेच्या आराखड्यात जादूचे बदल घडवून आणण्याचे अभिवचन देत नाही. जग आहे तसेच राहणार आहे. परिस्थितीचे स्वरुप शाश्वत नियमाप्रमाणे कार्यान्वित राहणार. विश्वास ठेवणाऱ्यांना धर्म जीवनाला उत्साहाने तोंड देण्यास शक्ती देता आणि व्यक्तिला मनोवैज्ञानिक समतोल आणि आध्यातिमक समचितत्व देऊ करतो. सर्व धर्मांनी पुरस्कारीलेले मार्ग एकच आहेत. मिथ्या अहंभावाचा आणि त्याच्या परिणामी होणाऱ्या भिन्न स्वरुपाचा धिक्कार करा. दु:खे आणि उसासे ही त्या अहंकाराच्या मायावी दृष्याच्या लागू असतात. त्यांना परमेश्वर चरणी अर्पण करा. अविरत चिंतनात अहंकाराला उन्नत करा. आपल्या स्वभावातील सर्व अपप्रवृत्तीचा नाश करुन आणि खऱ्या दिव्य जीवनाच्या शक्तीशाली विधायक मूल्यांनी स्वत:ला करुन त्यायोगे घडवून आणलेल्या आंतरिक क्रांतीने अहंभावाचे दैवीकरण करा. धम्रचा दावा आहे की आपले खरे स्वरुप शुध्द ज्ञानाचे शुध्द परमानंदाचे आहे. धर्म हा आपल्याला निरपेक्ष ज्ञानतत्वाचे मार्गदर्शन करीत असल्याने ते सर्वशास्त्राचे शास्त्र आहे. हे परिपूर्ण आकलन

केल्याशिवाय आपल्याला खरे स्वरुप कळून येणार नाही. हल्ली आपण आपले जीवन स्वार्थ आणि अहंकार ह्यांच्या अशा मिथ्या मूल्यांनी जोपासत आह्मेत की आपण खरी शांती मिळविण्यात अपयशी ठरत आह्मेत. आज खऱ्या अर्थाने आध्यात्मिक क्रांतीची गरज आहे. स्वयंपूर्णताच केवळ विश्वाच्या पूर्णतिचा मार्ग सुकर करील. सभोवतालाचे जग स्वत: जड प्रकृती आहे. आपल्या स्वयंपूर्णतिच्या जोरावर आपण त्यात प्राण ओतला पाहिजे. ही कल्पना प्रत्येक सुशिक्षित माणसाच्या मनावर बिंबवली पाहिजे. आपल्या स्वत:च्याच स्वार्थी वृत्तीने निर्माण केलेल्या या घृणेतून असेल तर हीच आज काळाची एकमेव गरज आहे. आज खऱ्या धर्माचा आशय दुर्लक्षित होत आहे. ह्याबाबत गुरुदेवांना अतिशय खंत होती. खराधर्म या लेखात ते म्हणतात, ''धर्म हे जीवन शास्त्र आहे. त्यापासून जीवनाला आवश्यक श्रेष्ठ मूल्ये मिळू शकतील. त्या मूल्यांवरच आपल्या दैनंदिन जीवनाची शहाणपणाने फेररचना केली पाहिजे. धर्माबाबतचा लवचिक दृष्टिकोन ह्या लेखात गुरुदेवांनी मांडला आहे. ते म्हणतात, ''जर प्रचलीत धर्म अतिशय जुनाट कालबाह्य व अप्रचलीत झाला असेल आणि त्यात पुरस्कारीलेली आचारभूत जीवनमूल्ये आपल्या दैनंदिन समस्या सोडवू शकत नसतील तर जराही वाईट वाटून न घेता ही सर्व मूल्ये आपणास टाकून द्यावी लागतील आणि योग्य जीवनाची नवीन तत्वे व नियम शोधून काढण्यासाठी आपणास प्रयास करावे लागतील. धर्म म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनाशी थोडाही संबंध नसलेला अप्रतिबंध सत्तेचा तो केवळ जाहीरनामा असेल आणि आपल्या निकडीच्या समस्या तो जर सोडवू शकत नसेल तर आपणास जुना धर्म तडीपार करावा लागेल आणि एखाद्या नव्या संस्कृतीचा व अधिक स्पष्ट धर्मोपासनेचा स्विकार करावा लागेल. मानव हा लौकिक जीवनाशी संबंधी असतो.'' धर्माबाबतचा हा लवचिक दृष्टिकोन ह्यापूर्वी खचितच कोणी मांडला असेल. खरा धर्म हा नष्ट होत नाही. हा ठाम आत्मविश्वास त्यांच्या लेखनात आपणास वारंवार आढळतो.

## ८) मन आणि मानसशास्त्र :-

मानवाच्या व्यक्तिमत्व विकसात मानवी मनाचे स्थान अनन्यसाधारण आहे. ह्या दृष्टिकोनातून मानवी मन व मानसशास्त्र ह्यावरील प.पू. गुरुदेवांचे भाष्य म्हणजे वास्तविक पाहता संशोधनाचा एक वेगळा विषयच होईल. परंतु त्यातील काही निवड भाग ह्या ठिकाणी देण्यात येत आहे.

गुरुदेवांनी मनाची परिभाषा करतांना मन म्हणजेच मनुष्य अशी परिभाषा केली आहे. जसे मन तशी व्यक्ती असते. मन अस्वस्थ असेल तर व्यक्ती अस्वस्थ असते. मन चांगले असेल तर व्यक्ती चांगली असते. मनाच्या दोन भिन्न बाजू असतात. बाह्य जगातील येणाऱ्या संवेदनाकडे बहिर्मुख झालेले एक मन व दुसरे त्या संवेदनावर प्रतिक्रिया करणारे अंतर्मुख मन. बहिर्मुख असलेल्या मनाला दृष्यनिष्ठ (Objective Mind) म्हणतात. संस्कृतमध्ये त्याला मनस म्हणतात आणि दुसरे अंतर्मुख असणारे मन त्याला आत्मनिष्ठ मन (Subjective Mind) असे म्हणतात. संस्कृतमध्ये त्याला बुध्दी म्हणतात. तोच मनुष्य निकोप आणि सुदृढ म्हणता येईल ज्याच्या मनाच्या बहिर्मुख व अंतर्मुख दोन्ही बाजू एकोप्याने काम करतात व मनाच्या दोलायमान अवस्थेत बहिर्मुख मन सहजच अंतर्मुख मनाच्या शिस्तीच्या नियंत्रणाखाली येते. पण दुर्दैवाने थोडी माणसे सोडली तर आपल्यापैकी बहुसंख्य जणांची मने दुभंगलेली असतात. बहिर्मुख व अंतर्मुख मनातील हे विभाजन मुख्यत्वेकरुन त्या व्यक्तिमधील अहंकार युक्त इच्छांच्या स्तरामुळे झालेले असते. मनाच्या दोन बाजूतील अंतर जितके जास्त तितका त्या व्यक्तीमधील आंतरिक गोंधळ जास्त. तितका त्या व्यक्तिचा अहंकार व क्षुद्र इच्छा ही जास्त दिसून येतात. जेव्हा आंतरिक मन व बाह्य मनाचे ऐक्य प्रस्थापित होते तेव्हा त्यानंतर मनाचे समत्व साधलले योगी कर्मामध्ये कुशल होतो आणि तो बाह्य मनाद्वारे बाह्य सेवंदनावर सुबुध्दपणे योग्य त्या प्रतिक्रिया व्यक्त करतो आणि जी कर्म त्याच्या आंतरिक मनामध्ये आधीच असलेल्या वासनांचा नाश घडवून आणतात. ह्याप्रमाणे विचारपूर्वक केलेल्या कुशल कर्माच्या द्वारा मनुष्य आपल्या असलेल्या वासना नाहिशा करु शकतो आणि अखेर आपल्या आंतरिक मनातील खरबरीत पणा बराचसा दूर करुन ते अधिकाधिक स्वच्छ करु शकतो.

अर्थात मानवाच्या आंतरिक व बाह्य मनाच्या कार्यात सुसंवाद निर्माण करणे ही बाब मानवी व्यक्तित्व विकासाच्या दृष्टिकोनातून महत्वाची ठरते. बऱ्याचदा आपल्या आयुष्यात कित्येक क्षणी आपण जाणूनबुजून आपल्या पुष्कळशा क्षणिक भावना दडपत असतो. परंतु दैनंदिन व्यवहारात आपण कित्येक मुरलेले मनोभाव नकळत दाबून टाकत असतो. ह्या दडपलेल्या भावनांमध्ये फार मोठी सुप्तशक्ती असते. ती प्रगट होण्याची संधी शोधत असते. जर योग्य दिशा दिली नाही तर त्या व्यक्तिचा नाश करण्यासाठी त्या बुमरैग सारख्या येतात. अर्थात केवळ आंतरिक मन व बाह्य मन त्यांच्यात सुसंवाद स्थापन करणे हे तर महत्वाचे आहेच. पण त्यासोबतच मनाच्या आंतरिक शक्तीला योग्य वाट देणेही आवश्यक आहे.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचे विवेचन करीत असतांना प.पू. गुरुदेवांनी मनाला कारकुनाची उपमा दिली आहे ते म्हणतात, "मन हे सर्वसाधारणपणे आवकजावक कारकुनाप्रमाणे कार्य करीत असते. ज्ञानेंद्रियांकडून आलेल्या संवेदना ते स्विकारते व त्या नीट क्रमवार लावून बुध्दीने तिच्या निर्णयासाठी पाठविते. बुध्दी तिच्या पूर्वी साठविलेल्या स्मृतीच्या संदर्भात निर्णय घेते व ते निर्णय मनाकडे कार्यवाहीसाठी पाठविल्या जातात. त्यावर मग योग्य ती कृती करण्यासाठी मन कर्मेंद्रियांना योग्य त्या आज्ञा देते. जागृत अवस्थेमध्ये बाह्य विषय वस्तुमध्ये आपण वावरत असतांना आपल्या बौध्दिक स्तरावर हे सर्व प्रत्येक क्षणी घडत असते. ज्या व्यक्तिमध्ये ही उपकरणे एकमेकांच्या सहकार्याने हातात हात घालून संघ भावनेने काम करीत नाही ती व्यक्ती स्वत: विस्कळीत झाली असते. ती आयुष्याला तोंड द्यायला असमर्थ ठरते.

अर्थात मन आणि बुध्दी ह्यांयातील सहकार्य व समन्वय वाढावयास हवा. आयुष्याला तोंड देण्याचे सामर्थ्य प्रयेक यक्तीमध्ये हवे. मन व बुध्दी ह्यांच्यात समन्वय निर्माण करणे म्हणजे शिक्षण ह्यांच्या असमतोलतून निर्माण झालेला व्यक्तिमत्वातील विस्कळीतपणा दूर करणे म्हणजे पुन:संस्करण मनाचे पुनसंस्करण होणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे पण मनाचे पुनसंस्करण करणे, तेही तात्विक व मनोवैज्ञानिक पध्दतीने हे अद्याप पाश्चात्यांना शोधावयाचे आहे. आपण व्यक्तिमत्वाच्या प्रत्येक स्तरावर जीवनाकडे विशिष्ट दृष्टिकोनातून पहात असतो आणि त्यानुसार वस्तुभागाबद्दल आपले निष्कर्ष काढतो. ते आपण आपल्या मानसिक स्तरावर रेखाटलेल्या भावनिक चित्रापेक्षा अगदीच निराळे असते आणि तसेच आपण

बुध्दीच्या स्तरावरुन जीवना विषयी जी कल्पना बांधतो ती वरील दोन्हीपेक्षा अगदीच वेगळी असते. मानसिक आव्हानामध्ये मानसिक समतोल हाच एक घटक आयुष्यात यश मिळवून देतो. दिलेल्या क्षेत्रात काम करीत असतांना मन खुले ठेवले म्हणजे जीवनाचे युध्द लढत असतांना अंत:करणातील वासनांचा क्षय होतो. जेव्हा एखादी व्यक्ती सुख व दु:ख ह्या द्वंद्वांनी अस्वस्थ होऊ लागते तेव्हा तिचा अहंकार प्रगट होतो. समतोल राखण्याचा प्रयत्न करणे हणजेच अहंकारापासून अलिप्त होणे. जो कोणी सर्व परिस्थितीत पूर्णपणे समतोल राखत असतो तो निश्चित बुध्दीच्या स्तरावर सुख दु:ख मनाच्या स्तरावर धनाची लाभाची भिती, शारीरिक स्तरावर यश अपयशाचे दु:ख ह्यापासून दूर अशा आपल्या स्वत:च्याच विश्वात राहतो.

विवेक चुडामणी ह्या ग्रंथात गुरुदेवांनी मन आणि आत्मा ह्यातील भेद स्पष्ट केला आहे. शिवाय मनाची शांती भंग का होते ह्याची कारण मिमांसा स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, ''मन जेव्हा अन्यत्र व्यग्र असते तेव्हा विषय वस्तु जरी आपल्या ज्ञानेंद्रियांच्या टप्प्यात येत असली तरी त्याचे आपण इंद्रियांनी ग्रहण करु शकत नाही कारण ज्ञानकेंद्रे मनाची असतात. ज्ञानेंद्रिय व मन मिळून बनलेला मनोमय कोष हा मी आणि माझे ह्या दोन भिन्न भावना निर्माण करीत असतो. त्याच्यामुळे मन आंतरिक शांतीचा नाश करीत असते. वृत्तीमुळे आंतरिक शांतीचा मम् भावनेमुळे बाह्य शांतीचा नाश करीत असते. मन आणि आत्मा ह्यातील फरक पुढीलप्रमाणे आहे.''

| **मन** | **आत्मा** |
|---|---|
| ० मनाला आदी व अंत असतो. एखाद्या निद्रेतून जागा होतो तेव्हा मनच कार्यरत असते. मन क्षणभंगुर आणि अनित्य असते. | आदी अंत हे तत्व लागू नाही. आत्मा शाश्वत आहे. |
| ० मन जेव्हा भानावर असते तेव्हा ते सदा विकारवान असते. ते क्षणाला दु:खी तर क्षणात आनंदी असते. क्षणात शांत तर क्षणात विक्षेपित होते. | शाश्वत आनंद हे आत्म्याचे रुप आहे. |

| | |
|---|---|
| ० दु:ख आणि क्लेश ही मनाची घडण असते मन आनंदी असते. तेव्हा त्याच्या आनंदी रुपासोबत परिवर्तनाचीही भीती असते | आत्मतत्व हे अपरिवर्तनीय आहे. |
| ० मन हे सर्व विषयवस्तुचे कारण असते. ज्या अर्थी विषय सतत बदल असतात त्या अर्थी मनही बदलत जाते. कार्य हे अन्य स्वरुपात कारणच असते. मन हे दृष्य वस्तुप्रमाणे मानले जाते. | आत्मतत्व हे कशाचेही कार्य वा कारण नसते. |

मनाच्या व्याप्ती वरुन ''मानव म्हणजे त्याचे मन'' अशी मानावाची परिभाषा कठोपनिषदाच्या आपल्या विवरणात केली आहे. आपण आपल्या मनाची जशी मशागत करु आणि ते जसे सुसंस्कृत करु तसे आपण होऊ. आपल्या मनास जीवनाच्या नकारात्मक अनित्य मूल्यांचे वळण लावा की झाले. आपण भावनाशून्य दोन पायाचे पशु! प्रेम, सहिष्णुता, करुणा इत्यादी उच्चस्तर आणि नित्य मूल्यांच्या भाषेत विचार करा आणि मनाला असे वळण लावा की आपण सुसंस्कृत होऊ आणि आपल्या भविष्यातील आपल्या प्रारब्धाचे विधीलिखित होऊ.

मनाच्या उपपत्तीबाबत त्यांनी केठोपनिषदाच्या विवरणात मार्गदर्शन केले आहे. माणसाच्या शुध्द चारित्र्यासाठी मनाची संकल्पना माहित असणे आवश्यक आहे. आधुनिक मनोवैज्ञानिकांच्या मते मन म्हणजे केवळ वासनाचे गाठोडे आहे. मन म्हणजे स्वभाव होय. पण भारतीय शास्त्रानुसार मन म्हणजे विचारांचा कधी न संपणारा प्रवाह आहे. मनाचे स्वरुप म्हणजे विचार होय. न थांबता एकामागून एक येणाऱ्या अतिवेगात वाहणाऱ्या विचारप्रवाहाला मन असे म्हणतात. हा प्रवाह थांबला तर मनाचे कार्यही थांबते. मनातील विचारांचा प्रवाह ओळखण्यासाठी आपल्याला प्रकाशाची जरुरी आहे. विचार हे स्वयंप्रकाशी नाही. स्थूल शरीरापेक्षा विचार अधिक सूक्ष्म आहे व ह्या विचारांचा प्रवाह म्हणजे मन आहे. ह्या विचाराच्या प्रवाहाला जो प्रकाशित करतो त्या प्रकाशाला ''चित'' म्हणतात. ह्या प्रकाशामुळेच मनाला अस्तित्व मिळते. आपण आपल्य विचारांचीच निर्मिती आहोत. जसा आपण विचार करु तितके आपण अधिक उत्कृष्ट बनू. विचारांचा प्रवाह थांबला तर मनाच्या मागील शक्तीचे ज्ञान

आपल्याला होते. मनाचा प्रवाह थांबविण्याचे कार्य हे किंवा ध्यानसाधनेने साध्य होते. विचारांचा प्रवाह थांबल्यास स्वभाव बदलविण्यास ते कारणीभूत ठरतात. शास्त्रानुसार विचार म्हणजे मनाची अभिव्यक्ती आहे तर मन हेच विचार प्रवाह चालू असतांना निर्माण झालेली भ्रांतमय स्थिती आहे, काही नाही असे. विचारांचे अखंड सातत्य म्हणजे मन होय. मन आपणास वारंवार धमक्या देत असते. नव्हे आपल्यावर हुकमत गाजवीत असते. आपल्या क्षुद्र मागण्या पशुवृत्ती आणि दुष्टप्रेरणा यांनी छळवाद किंवा काही वेळा उच्चतर दिव्य मागण्या आणि आध्यात्मिक प्रेरणांनी पाठपुरावा करते. अशा ह्या मनाचे संस्करण करणे म्हणजे व्यक्तिमत्व विकसन होय असे गुरुदेव मानतात. ह्या मनाला संयमित करणे म्हणजे व्यक्तिमत्व विकसनाचे रहस्य होय. जो आपल्या मनाला जिंकतो तोच जग जिंकतो. आज समाजात राष्ट्रात ह्यांच्या नेमके विरुध्द घडते आहे. आज व्यक्तिचे समाजाचे मन नियंत्रणात नाही. अशा वेळी जग जिंकण्याचे स्वप्न हे व्यर्थ आहे. हेच मानवाच्या, समाजाच्या राष्ट्राच्या अपयशाचे कारण आहे. मानवाच्या मनाची दु:खद स्थिती म्हणजे त्याची दु:खांतिका आहे. पॅसिफिक समुद्रामध्ये नुकताच फेकलेला अणुबॉम्ब स्फोट मानवाच्या आंतर जगतात घडून आलेल्या प्रचंड स्फोटाचा ध्वनी आहे. मानवाचे मन आज विघटीत झाले आहे. ह्या विघटनाचे कारण म्हणजे क्षुद्र जीवनमूल्यांचा किरणोत्सर्ग आहे आणि ह्या किरणोत्सर्गात मानवी मन नाश पावत आहे. पण हे मन निकोप बनविण्याची योजना धर्माजवळ आहे. अशा ह्या मनाचे संयमन करणे म्हणजेच मनाचे संस्करण आहे. मनाचे संयमन म्हणजेच विचार प्रवाहाचे संयमन होय. मानवाचा हा अनुभव आहे की जेव्हा विचारामुळे मनात कमी विक्षेप निर्माण होतात तेव्हा मानव जास्तीत जास्त सुखी असतो. व हा विचारांचा पूर जेव्हा वादळी, तितके मानवाचे मन प्रक्षुब्ध बनते. ह्या विचारांना शांत करुन मन शांत करता येते. दुर्दैवाने तसे घडत नाही. कारण मानवाच्या कामनांच्या दारातून विचारांचा ज्वालामुखी बाहेर पडतो. कामना असल्याशिवाय विचार उद्‌भवत नाहीत. हा विचार म्हणजेच त्या मागे असणारी कामना होय. ही कामनाच स्वत: विचाराच्या रुपात अभिव्यक्त होत असते. म्हणूनच मानवाच्या कामना क्षुद्र असतील तर त्याचे विचार क्षुद्र व त्यानुसार त्याचे कर्मही क्षुद्र बनते. म्हणून ह्या कामनांचे अनुशासन करावयास हवे. ह्या कामना आपल्या बाबतच्या अज्ञानातून उद्‌भवतात. मानवाची कामना म्हणजेच मानवाची बुध्दी पूर्णत्वाची भावना प्राप्त करुन घेण्याची पध्दती सुचवित असते. त्यांनाच आपण कामना

म्हणतो. अर्थात मानवाची कामना म्हणजे पूर्ण सुख शोधण्याचा त्याच्या बुध्दीने केलेला प्रयत्न असतो. पण अज्ञानामुळे बुध्दीत्वात हा प्रयत्न कधीच यशस्वी होत नाही आणि म्हणूनच ह्या ठिकाणी गुरुदेवांनी वैचारिक ब्रह्मचर्याचा मार्ग सुचविला आहे. शिवाय मानसिक शुध्दता महत्वाची आहे. आपले मन ह दिव्यत्वाचे चांगल्या विचारांचे निवासस्थान बनवायचे असेल तर ते शुध्द केले पाहिजे. चांगले होण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. ओतप्रोत वाहणारे पशुतुल्य मनोविकार, अंध करणारे क्रोध आणि लोभ ह्याचा पार निचरा केला पाहिजे. चांगले होण्याच्या सतत प्रयत्नाने सर्व विघातक मूल्ये टाकून दिली पाहिजे आणि प्रेम सौंदर्य आणि सत्य या विधायक मूल्यांनी मन पुन्हा भारुन टाकले पाहिजे. मगच दिव्यत्व वास करु शकेल. ह्याकरिता मानवाचा दृढनिश्चय आवश्यक आहे. मानसिक दोषांचा केवळ निषेध महत्वाचा नाही तर ह्या मनाला सत्कार्यात विधायकतेत गुंतविणे तितकेच महत्वाचे आहे. मशागत केलेल्या भूमीत इष्ट बीजे पेरल्या गेली पाहिजेत. पीकाला दक्षतापूर्वक पाणी दिल्या गेले पाहिजे. फलोत्पत्ती ही निसर्गाप्रमाणे येतेच. विधायक गुणवत्तेची बीजे पेरली गेली नसतील तर नको ते सर्व प्रकारचे तृण लवकरच उगवेल आणि योजनाबध्द फुलबाग होण्या ऐवजी त्या ठिकाणी जंगल माजेल. मन जर विधायक मूल्यांनी उन्नत केले गेले नाही तर ते दडपले जाते. हे दडपले गेलेले मन ही धोकायदायक बाब असते. एखाद्या बेसावध क्षणी त्याचा स्फोट होऊ शकतो. विधायक मन हे सतत कर्मशील राहते असे विधायक मन हे मत्सरापासून दूर राहते पण ते इतरांच्या उत्कर्षापासून आनंदी होते. विधायक मन उन्नतीच्या कार्यक्षम साधनांनी सुसज्ज असते. असे मन परिस्थितीचा गुलाम होत नाही तर ते परिस्थितीवर आरुढ होते. मनाला विधायक बनविण्याची ही प्रक्रिया ध्यान आणि जीवन ह्या अंकाम अतिशय प्रभावीपणे देण्यात आली आहे. मनाच्या विकसनासाठी मन प्रक्रियेवर गुरुदेवांनी विशेष भर दिला आहे.

मानवी व्यक्तिमत्वाच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेत मनाचे ध्यान गुरुदेवांनी महत्वाचे मानले आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे मानवाच्या व्यक्तिमत्वाचे दोन भाग असतात. स्थूल व्यक्तिमत्व व सूक्ष्म व्यक्तिमत्व हे व्यक्तिमत्वाचे गाभाभूत घटक होय. मन आणि बुध्दी हे सूक्ष्म व्यक्तिमत्व आहे आणि हे व्यक्तिमत्व सतत बदलणारी व्यक्तिमत्व आहे. मन हे सर्व भावभावनांची बैठक असून त्यायोगे मानव वाईट काय चांगले काय? असत्य कोणते? सत्य कोणते?, नित्य कोणते अनित्य कोणते असा फरक करु शकतो. व्यक्ती आपल्या दैनंदिन

जीवनात ह्या उपकरणाचा वापर नियमीत करतो जेवढा इतर व्यक्तिच्या संपर्कात येतो म्हणजे तो मन आणि बुध्दीच्या संपर्कात येतो आणि आज जगामध्ये मानवाच्या व्यक्तिमत्वातील हाच भाग दुर्लक्षित राहिलेला आहे. ह्यासाठी धर्म संकल्पनांच्या आकलनावर गुरुदेव भर देतात. मानवाचे खरे स्वरुप दाखविणारा धर्म हा आरसा असतो. स्वत:च्या भावनांना वळण लावून मानव आनंदी जीवन जगू शकतो. व्यक्तिमत्वाच्या गुणवत्तेत मनाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. मानवी मनाच्या रचनेवरुन मानवाच्या व्यक्तिमत्वाचा पोत निश्चित होतो. मनाच्या उत्क्रांतीमध्ये धर्माचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. ह्या सर्व बाबींचा अंतर्भाव जीवनज्योत ह्या पुस्तकात गुरुदेवांनी केला आहे. व्यक्तिमत्व विकसनाच्या ह्या मनोरंजनेचा अभ्यास महत्वाचा ठरतो. शरीररचनेतील त्याचे स्थान व रचानाकार्य ह्याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. कारण ते म्हणतात, मन ही सर्व प्रेरणांची आणि भावनांची बैठक असून ती सर्व सजिव प्राण्यामध्ये सारखीच असते. जनावारांना देखील मन असते जेव्हा ती जगताच्या संपर्कात येतात तेव्हा त्यांच्या मनातही अंतप्रेरणा व भावना निर्माण होत असतात आणि त्या त्यांच्या तद्नुषंगिक कृतीमधून प्रत्यक्षपणे व्यक्त होत असतात. मानवाच्या मनात जेव्हा जेव्हा भावना निर्माण होतात. तेव्हा तेव्हा त्यासंबंधी विवेक करुन त्यांचे विश्लेषण करण्याची आणि क्षणिक अंत:प्रेरणांनी व भावनांनी वाहून न जाता आपल्या कृतीला विवेकाच्या बळावर मार्गदर्शन करण्याची आणि त्यांना वळण देण्याची क्षमता मानवामध्येच असते. पण ह्या उपकरणाकडे जेव्हा दुर्लक्ष होते तेव्हा मात्र मानव पशुवत वर्तन करु लागतो. मनाच्या कार्यात बुध्दीचे सहकार्य हे महत्वाचे मानण्यात आले आहे. जसे नदी म्हणजे पाण्याचा प्रवाह त्याचप्रमाणे विचारांचा प्रवाह म्हणजे मन अशी मनाची व्याख्या केली जाते. नदीचे दोन्ही किनारे तिच्या प्रवाहाला वळण व दिशा देत असतात. जर नदीचा किनारा निश्चित पक्क नसेल तर पाणी दिशाहीनतेने धावते. त्याप्रमाणे मानवाची बुध्दी दृढ व निश्चयी नसते तेव्हा मन हवे तसे कार्य करते. अशा ह्या मन व बुध्दीची जडणघडण वासनेवर अवलंबून असते व ह्या वासना व्यक्तिच्या प्रतिसाद व प्रक्रिया ह्यावरुन ठरतात. म्हणून जेव्हा व्यक्तिच्या वासना व प्रवृत्ती जोशपूर्ण असतात तेव्हा आपले विचार व कृती सुध्दा जोशपूर्ण व निर्मितीक्षम असतात. म्हणून मानवी वासनांना योग्य वळण लावणे ही बाब महत्वाची ठरते. मानवाच्या वासना किंवा मन:प्रवृत्ती ह्या सर्व कामना व कर्म ह्यांच्या सूत्रधार असतात. प्रत्येक व्यक्तिच्या वासना ह्या भिन्न असतात. व्यक्ती हे

त्या वासनाचेच रुप असते आणि म्हणूनच माणूस जेव्हा वासनामुक्त होते तेव्हा तो मनोविक्षेपाच्या अतीत होतो. व ह्यासाठी धर्म शिक्षण महत्वाचे आहे. बाह्य जगावर नियंत्रण असेल तर प्रथम मानवाला स्वत:च्या मनावर नियंत्रण मिळवावे लागेल.

मानवाची मानसिक जडणघडण हीच सर्व त्रासाचे कारण आहे. मानवी मन हे तीन विचार व अवस्थांमध्ये कार्यरत असते. ह्यालाच सत्व, रजस व तम अवस्था म्हणतात. मनाच्या ह्या तीन अवस्थांच्या निरनिराळ्या प्रमाणात होत असणाऱ्या संमिश्रणावरुन त्या त्या व्यक्तिचे व्यक्तिमत्व ठरत असते. हे तीन घटक ज्या प्रमाणात संमिश्र झाले असतील त्यावरुन माणसाच्या स्वभावातील व आचरणातील उदात्त अनुदात्त व तुष्णीभाव ठरत असतात.

ह्या मनाला एकाच विचारधारेत खिळवून टाकण्याकरिता गुरुदेवांनी जपयोगाचा मार्ग सांगितला आहे. कारण जप हे असे संस्करण आहे की ज्या योगे सतत नृत्य करणाऱ्या मनातील विचार शलाकांना एका विशिष्ट क्रमात आणि तालात वागणे भाग पाडले जाते. जपसाधना करतांना मनाची एकाग्रता होत असते. जपयोगाने संस्कारीत झालेले मन अल्पावधीतच उंचीवर जाते. ह्या दृष्टिकोनातून जप हे मनाचे संस्करण ठरते. ह्या संस्करणातून अंत:करणाची स्तब्धता अनुभवणे ही बाब महत्वाची ठरते. ह्या मनाच्या व्यवस्थापनाचे महत्व अनन्य साधारण आहे. ह्याचे अत्यंत प्रभावी वर्णन गुरुदेवांच्या वाड्मयात आढळते. मन हे आपण संग्रहित केलेल्या वासनांचा परिणाम आहे. आपल्या मागील सर्व जन्मामध्ये आपण प्रत्येक क्षणाला अखंड अनुभव घेऊन जीवन व्यतीत केलेले असते. त्याचा परिणाम म्हणून आपल्या मनोमय कोशावर काही संस्कार बिंदू उमटलेले असतात. व मनामध्ये विक्षेप निर्माण होत राहतात. जेव्हा चांगले आणि वाईट दोन्ही समोरासमोर येतात. तेहा त्या ठिकाणी तणाव आणि क्रिया यांचे क्षेत्र निर्माण झालेच पाहिजे. हा शाश्वत नियम आहे मानसिक दृष्ट्या त्या दोन्ही भावनापासून आपणास निसटता येत नाही आणि म्हणून त्यांच्याशी तादात्म्य झाल्यामुळे त्यापासून परिणामत: होणाऱ्या वैफल्यामुळे आपणच नि:सत्व होतो. एक क्षण असा होतो की त्यावेळी आपणात जे चांगले असते. त्याच्या हाकेशी आपल्यातील लहान आणि मृदु आवाज एकरुप होतो आणि आपली इच्छा नसतांनाही गुन्हेगार दुष्ट पापी माणसासारखे वागण्याचा आपल्याला मोह अनावर होतो. पण दुसऱ्याकाही प्रसंगात आपली सैतानी वृत्ती असूनही आपणास

प्रकरण ४ थे

# संकलीत माहितीचे विश्लेषण
# व अर्थनिर्वचन



***Sky is limit Prepare your self to face all situation and challenges with excellence on your part.***

चांगले कर्म करण्यात यश मिळते. आणि आपण आनंदी होतो. हा संघर्ष आपल्या मनात सतत सुरु असतो. पण आपल्यातील निम्नस्तर व्यक्तित्वाविरुध्द ह्या संग्रामात जय मिळवायचा असेल तर मनाच्या डावपेचाचे संपूर्ण ज्ञान आणि ज्यायोगे मनास आपण एकाग्रतेच्या बिंदुशी पुन्हा खेचू शकू असा आपल्या स्वत:वर संपूर्ण ताबा मिळविणे आवश्यक आहे. अशा शुध्द आणि पवित्र मनाने उच्च मूल्यांचे अनुकरण केल्यास मनाची दुर्बलता दूर होते.

मनाचे व्यवस्थापनाचे अनेक तंत्र आहे. मानवी मनाला त्रास देणारे जे षड्रिपू आहेत त्यावर मात करायला हवी ही मात करण्यासाठी त्या प्रत्येक षड्रिपंच्या ठिकाणी उच्च मूल्यांची स्थापना करायला हवी ती पुढील प्रमाणे

काम - मनाची व्यस्तता ही उच्च आदर्शात ठेवणे

क्रोध - Cultivating the habit of forgivness

लोभ - Lead to santosha, satisfaction

मोह - Right knowledge and Right thinking

अहंकार - rite down the contribution of others in your success

मत्सर - Substitute with admiration

शिक्षणाचे एक महत्वाचे उपकरण म्हणून मन ह्या संकल्पनेचे विवेचन हे महत्वाचे ठरते.